शनिवार । १४ जून १९८० । ७५ पैसे

# माणूस

## पंचतारांकित वर्तुळे आणि झोपडपट्टी ही दोन टोके एकत्र आली आणि....

श्री. ग. मा.

“ विमानपळवे, मटका–जुगार–अड्डे चालविणारे लोक, स्मगलर्स जर निवडून येणार असतील तर या लोकशाहीला काही अर्थ आहे का ? माझी खात्री झाली आहे की यापुढे केवळ लोकशाही मार्गाने काम करून इंदिरा पक्षाचा पराभव करणे अशक्य आहे. ”...नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत विजयी झालेले एक विरोधी पक्ष उमेदवार आपली विजयानंतरची पहिली प्रतिक्रिया सहज बोलता बोलता व्यक्त करीत होते. त्यांच्या बोलण्यातली तळमळ जाणवत होती. विजय होऊनही आनंद वाटत नव्हता. स्वपक्षाचे, इतर विरोधी पक्षांचे चांगले चांगले कार्यकर्ते नामोहरम झाल्याचे दुःखच त्यांच्या बोलण्यातून वरचेवर व्यक्त होत होते. ‘ दहा-दहा, वीस-वीस वर्षे लोकांची लहानमोठी कामे करून, अनेक आंदोलनात भाग घेऊन, अनेक वेळा तुरुंगवास पत्करूनही लोक निवडणुकीच्या ऐनवेळी अशा निष्ठावंत समाजकार्यकर्त्यांना दूर सारून मटकेवाल्यांच्या, गुन्हेगार प्रवृत्तीच्या उमेदवारांच्याच मतपेटीत मते टाकणार असतील तर करायची तरी कशासाठी लोकांची कामे ? लोकसेवा वगैरे सगळे शब्द आता निरर्थक आणि कालबाह्य झाल्यासारखे वाटतात ! ” अशी विजय मिळूनही तो कडू वाटायला लावणारी या यशस्वी उमेदवाराची प्रतिक्रिया होती आणि लोकशाही हवी म्हणणाऱ्या सर्वांनीच तिचा वेळीच विचारही करायला हवा. भाई वैद्य पडले आणि समजा काँग्रेसचा किंवा कम्युनिस्टांचा तसाच एखादा तोलामोलाचा कार्यकर्ता निवडून आला तर खिलाडूपणे जयपराजय स्वीकारून मोकळं होता येते; पण लोकसेवेचा गंधही नसणाऱ्यांकडून ह्यातभर सार्वजनिक हितासाठी झटणाऱ्यांचा पराभव व्हावा हे विचित्र आहे, विसंगत आणि धोकादायकही आहे! इंग्लंडसारख्या लोकशाही असलेल्या देशात हुजूरपक्ष आवडला नाही तर लोक मजूरपक्षाला सत्तेवर आणतात. मजूरपक्ष नकोसा झाला तर हुजुरांकडे लोकमत वळते. दोन्ही पक्षात सत्तेसाठी चुरस असते; पण ही चुरस दोन कारखानदारांमधील किंवा दोन व्यापाऱ्यांमधील चुरशीप्रमाणे ठराविक सहितेप्रमाणे, ठराविक गुणवत्तेनुसार चालू असते. एकाच स्पर्धात्मक समाजव्यवस्थेची ही दोन अंगे आहेत. ज्याला संपत्ती प्रिय असते तो व्यापारात--कारखानदारीत जातो, अधिकाधिक नफा कमवीत राहतो. ज्याला सत्ता हवी असते तो राजकारणात वरची वरची स्थाने पटकावतो; पण खेळातील स्पर्धेप्रमाणेच याही राजकीय वा आर्थिक क्षेत्रातील स्पर्धेचे नियम, गुणावगुण ठरलेले असतात. क्रिकेटच्या खेळात कुणी फ्री स्टाइल कुस्त्यांचे डावपेच वापरत नाही. मजूरपक्षासारखा एखादा पक्ष, स्थापना होऊन पन्नास-पन्नास वर्षे उलटली तरी सत्तेपासून वंचित राहतो. तरीपण तेथे पक्षांतरे सहसा होत नाहीत. समांतर पक्ष काढून सत्तेवर टुण्णकन उडीही कुणी मारत नाही. आपला कार्यक्रम लोकांसमोर ठेवून जो तो, पक्षसंघटनेच्या आधारे सत्तेसाठी वैध मार्गाने प्रयत्नशील असतो. उपटसुंभगिरीला तेथे फारसा वाव नसतो. श्रीधर माडगुळकरांचे आता-

मुखपृष्ठ २ वर

पर्यंतचे राजकीय–सामाजिक कार्य काय? उलट पोपटराव खिलारेंनी नुकताच पुण्यातला मोलकरणीचा संप संघटित करून आपल्या या क्षेत्रातील कार्याची प्रचीती दाखवली होती; पण ज्याना संघटित करून पगारवाढ, कामाच्या सोयी–सवलती खिलारेंनी मिळवून दिल्या त्या मोलकरणींनीही पजाकडे धाव घेतली! खिलारेंना मांडगूळकरांपेक्षाही कमी मते एरवी पडायचे कारण नव्हते. व्यथा ही आहे. जनसंघ व्यापाऱ्यांचा आहे असे म्हटले जाते. विक्रीकरआंदोलनात जनसंघवाल्यानी व्यापाऱ्यांसाठी खूप धडपड केली, शिष्टमंडळे नेली, बदनाम झालेल्या व्यापारीवर्गाची बाजू शासनासमोर-समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला. मग या व्यापारीवर्गाने तरी आपली मते जनसंघ–भाजपच्या पेटीत टाकली का? मुळीच नाही! नाही तर मुंबईत भाजपला एवढा दणका बसला नसता. पुण्यातल्या अगदी बालेकिल्ला म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कसबा मतदार संघातही डॉ. अरविंद लेले यांचे मताधिक्य किती? चार हजारही नाही. भाई वैद्याचा पराभव समजू शकतो पण तो अमीनुद्दिन पेनवाल्यासारख्या व्यक्ती कडून व्हावा हे न समजू शकणारे आणि समजले तरी न पटू शकणारे वास्तव आहे. विरोधी पक्षाचा नाकर्तेपणाचा, उणीवांचा पाढा वाचणे सोपे आहे. बहुतेक वृत्तपत्रानी हे आपल्या निवडणुकीनंतरच्या लेखातून वगैरे तत्परतेने व चोखपणे केलेलेच आहे; पण मग सत्तेवर येऊ घातलेल्याचे कर्तृत्वही तपासावे लागेल आणि तेही हिशोब फारसा काही चांगला नाही. दुखण्याचे खरे मूळ काही तो पक्ष, हा पक्ष, हे नाही मूळ आहे जुने आदर्श, संकेत कालबाह्य झाले आणि नवे रूढ झालेले नाहीत, हे. भाडवलशाही देशात चालते तसे पूर्ण व्यावसायिक राजकारणही नाही व जुने टिळक-गांधीजींचे सेवेचे किंवा भगतसिंग-सावरकरांचे क्रान्तिकारक उठावाचे राजकारणही नाही, अशी मधलीच चमत्कारिक स्थिती सध्या आपल्याकडे आहे. यामुळे निवडणुका म्हणजे लाटा असे समीकरण रूढ होत आहे कार्यक्रम, पक्ष, उमेदवार याच्या गुणवत्तेवर निवडणुकांचे यशापयश न ठरता कुठली तरी हवा निर्माण होते आणि जमिनीवरचा पालापाचोळा वर उडतो आणि प्रचंड विस्ताराचे वटवृक्ष कोसळून पडतात. लाटाकडून लाटांकडे आपण फेकले जातो. ७७ साली जे निवडून आले त्यात सगळे थोडेच आपल्या कर्तबगारीच्या बळावर निवडून आलेले होते? त्याही वेळी लाटाजीरावांचे प्रमाण कमी नव्हते. ८० सालची लाट वेगळी आहे, एवढेच. जोवर पक्षसंघटना मजबूत होत नाहीत, पक्षकार्यक्रम, उमेदवार पाहून जोवर बहुतांश मतदान होत नाही तोवर आपली लोकशाही ही लाटात गटांगळ्या खात राहणार व चांगल्या चांगल्या कार्यकर्त्यांस निराश होण्याची पाळी येत राहणार हे उघड आहे. आघाड्यांचे अस्थिर राजकारण जोवर विरोधीपक्ष खेळणार आहेत तोवर निवडणुका या जुगारच राहणार आहेत व जुगार म्हणजे लाखाचे बारा हजार आणि हजाराचे लाख झालेच. उशीर लागला तरी चालेल पण पक्षपद्धती खोलवर रुजली गेल्याशिवाय या लाटांच्या राजकारणाला पर्याय नाही. अगदी इंग्लंड-अमेरिकेसारखे दोन नाही तरी तीन-चार पेक्षा अधिक पक्षही या देशाला न परवडणारे आहे. येत्या १०–२० वर्षांत तरी या दृष्टीने आपल्या राजकारणाची बांधबंदिस्ती व्हायला हवी. अशी ती जोवर होत नाही तोवर विजयी उमेदवारांनाही वाटत राहणार की, आपण जरी विजयी झालो असलो तरी हा विजय टिकावू नाही, उद्या एखादा स्मगलर-मटकेवालाही आपला पराभव करू शकेल. मग कशाला लोकसेवेचो आणि जनआंदोलनाची मगजमारी करा? कशाला पोलिसांच्या लाठ्या खा, उपोषणाला बसा? कुठली लाट येते आहे ते पहावे आणि स्वतःला त्यात झोकून द्यावे... एक कलमी कार्यक्रम .....!

¤

पक्ष संघटना मजबूत नसताना आणि गेले चार महिने सत्ता असूनही आर्थिक व इतर आघाड्यांवर कुठलीही दमदार उपाय योजना केली गेली नसतानाही लोकांनी केंद्राप्रमाणेच राज्याराज्यातूनही इंदिरा गांधींना सत्ता बहाल केली यावरून अव्यवस्था, अराजक, बेवदशाही याची आपल्या लोकाना किती धास्ती वाटते, बळकट व स्थिर सरकारची येथील जनतेला किती आवश्यकता भासते, हेच दिसून येते. तसे पाहिले तर जे ८७ नंतर ७८ साली जनता सरकारांच्या बाबतीत जे घडले त्यापेक्षा आता काही वेगळे घडलेले नाही. दिल्लीत ७७ साली जनता शासन होते राज्यातूनही ७८ सालच्या निवडणुकात, कमी मताधिक्याने का असेना, लोकानी जनता शासनाचीच निवड केली. सुसंवाद हवा अशीच या मागची भावना तेव्हा होती व आताही आहे पण सुसंवादाबरोबर प्रगतीही हवी. आणि ध्येयवादी, प्रामाणिक कार्यकर्त्यांची संघटना असल्याशिवाय केवळ नोकरशाहीच्या बळावर व लोकप्रियतेच्या भांडवलावर ती साधता येणार नाही मागील दशकाचा हाच अनुभव आहे, बांगला देशच्या युद्धानंतर ७१-७२ साली जी स्थिती होती तीच आज आहे. इंदिरा गांधीजवळ त्या वेळी सर्व सत्ता, लोकप्रियता आणि शिवाय न फुटलेला कॉंग्रेस


## साप्ताहिक माणूस

वर्ष : विसावे
अंक : दुसरा
१४ जून १९८०
किंमत : ७५ पैसे

संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन.



अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही
राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यानी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.
**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी ४४३४५९

पक्ष, ही सर्व आयुधे होती. पण दोनच वर्षांत ही आयुधे बोथट ठरली. प्रथम गुजरात पेटला. नंतर बिहार उठला आणि आणीबाणी पुकारल्यशिवाय हा सर्व असंतोष इंदिरा गांधींना दडपता येणे अशक्य झाले. ही सर्व पुनरावृत्ती याही दशकात होणे अशक्य नाही. शेवटी राजकारणाचीही एक लय असते. स्वातंत्र्यपूर्व काळापासून अगदी १९७७ पर्यंत दर दशकात सत्तेचे केंद्रीकरण आणि लोकांचे उठाव असे द्वंद्व झडत आलेले इतिहासावरून आपल्याला ध्यानात येते. कर्झन उदयाला आला की टिळक अवतरतातच! आणीबाणी पुकारली की या अंधारातून प्रकाशाकडे वाट दाखविणारा कुणी तरी नारायण प्रकट होतोच. अकटोविकट प्रयत्न करून इंदिरा गांधींना आर्थिक आणि इतर आघाड्यांवर काही दमदार आणि प्रभावी उपाययोजना राबवता आली तरच हे दशकादशकात फिरलेले चक्र, ही राजशक्तीची आणि लोकशक्तीची विशेष संवादी विरोधी लय थांबवता किंवा बदलता येईल. मागील दशकात निदान ध्येयवादाची ओढ असणारा, टिळकगांधींच्या त्यागपूर्ण लोकसेवेचे धडे गिरवू पाहणारा मध्यमवर्ग तरी इंदिरा गांधींच्या मागे होता. बुद्धिवंतांनीही इंदिरा गांधींना पाठिंबा व्यक्त केला होता. एस्. एम्. जोशीसारखे नेते, तरुण तुर्क त्या वेळी इंदिरा गांधींना अनुकूल होते. रजनी पटेल मुंबईत हजार-हजार बुद्धिमंतांचे उत्स्फूर्त मेळावे इंदिरा गांधींच्या स्वागतासाठी भरवू शकत होते. हा सगळा वर्ग आज उदासीन व अलिप्त आहे. प्रामुख्याने दोन टोकाचे वर्गच इंदिरा गांधींच्या मागे आज उभे आहेत. शहरातील अती श्रीमंत, पंचतारांकित वर्तुळात वावरणारा, किंवा या वर्तुळाचे आकर्षण असणारा वरिष्ठ श्रीमंत वर्ग–ज्यात सगळे नोकरशहा, बडे भांडवलदार आहेत. आणि दुसरा खेड्यापाड्यातला आणि झोपडपट्टीतला गरीब वर्ग. या दोन्ही वर्गांना परंपरेचे आकर्षण नाही. त्यामुळे लोकशाही राहिली काय, मेली काय, त्याचे सुखदुःख त्यांना नाही. महात्मा गांधींशीही त्यांना कर्तव्य नाही, मग कोण टिळक आणि कुठले सावरकर! लोकशाही, स्वातंत्र्य, उदारमतवाद, समाजसेवा वगैरे मुख्यत: मध्यमवर्गीय मल्ये आहेत आणि यासाठी त्याग करायला बहुतांश याच वर्गातून लोक पुढे येत असतात. भाकरी आणि स्वातंत्र्य या दोन्हींना जीवनावश्यक गरजा मानणारा हा वर्ग आहे. इंदिरा गांधींच्या तेजस्वी व्यक्तिमत्त्वाबद्दल आकर्षण असणारा पण त्याचबरोबर त्यांच्या विधिनिषेधशून्य आणि तत्त्वविचारांचा अभाव असलेल्या राजकारणामुळे त्यांच्यापासून चार हात लांब राहणारा हा वर्ग त्यांनी आपलासा केल्याशिवाय, ध्येयवादी पक्षकार्यकर्त्यांचे बळ त्यांच्यामागे कसे उभे राहणार? गेल्या दशकात हा वारसा त्यांना थोडा तरी लाभलेला होता. आणीबाणीमुळे हा त्यांनी गमावला. आज मुख्यत: अती श्रीमंत आणि अती गरीब वर्ग त्यांच्यामागे आहेत. या वर्गांना घाई आहे त्यामुळे वर्षा-दोन वर्षात काही नेत्रदीपक घडले नाही तर ते अस्वस्थ होणार हे उघड आहे. म्हणूनच या अस्वस्थतेला लोकशाही आणि उदारमतवादाच्या चौकटीत राहून वाट काढून देणारा, परंपरा आणि प्रगती यांची सांगड घालू शकणारा, विवेकसंपन्न व ध्येयवादी कार्यकर्त्यांचा वर्ग आवश्यक असतो जो आज तरी इंदिरा काँग्रेसजवळ नाही. तो सगळा विरोधात विखुरला गेलेला आहे. मुख्यत: दोन गटात-साम्यवादी आणि भाजपवादी या दोन गटांनी आपापल्या तत्त्वज्ञानानुसार आपले कार्य निष्ठापूर्वक चालू ठेवणे आणि योग्य संधीची वाट पाहणे एवढेच सध्या शक्य आहे. इंदिरा गांधींना सूर सापडलेला आहे. त्यांची लय मात्र केव्हा बिघडेल सांगता येत नाही. अशा वेळी सुराचे आणि लयीचे भान असणारा प्रतिपक्ष, पर्यायी जनसंघटन खडे असेल तर भारतीय लोकशाहीचे भवितव्य अगदीच काही चरणसिंग म्हणाले तसे काळेकुट्ट नाही. इंदिरा गांधींना जनतेने कोरा चेक दिला आहे असे नानासाहेब गोरे म्हणाले तेही पूर्ण खरे नाही. चेकवर तारीख टाकलेली आहे. तारीख असलेला चेक विशिष्ट मुदतीत वटवला गेला नाही तर रद्द होऊ शकतो. गरज आहे विमानपळवे, अड्डेवाले निवडून येतात म्हणून खंत न करत बसता 'पुनश्च हरि ॐ' म्हणण्याची, लोकशाही पद्धतीने पक्षबांधणी करण्याची, पर्यायी जनसंघटन उभारण्याची. इंदिरा गांधींना आंधळा विरोध नको तसेच सत्तेपुढे लोटांगणेही नकोत. कुटुंबनियोजनाचा, झाडे लावण्याचा किंवा जमीन वाटपाचा वगैरे कार्यक्रम समजा इंदिरा गांधींनी– संजय गांधींनी हाती घेतला तर सर्वांनी सहकार्य द्यायला हवे. आसामच्या प्रश्नाबाबत त्यांनी काही गडबड केली तर विरोधही हवा. यालाच प्रतियोगी सहकारिता असे टिळक म्हणत असत. लोकशाहीतील विरोधी पक्षाला याच वाटेने जात राहण्याशिवाय सध्यातरी तरणोपाय नाही. □


वीस व्यक्तिशोधांचा संग्रह

**देवाघरचा पाऊस**

लेखक : रवींद्र पिंगे

आवृत्ती : दुसरी

किंमत : १० रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे

# आता आघाड्या नकोत विरोधी पक्षबांधणी हवी !

विजय कुवळेकर

नऊ राज्यांच्या मुदतपूर्व विधानसभा निवडणुकांनी देशाच्या राजकारणाची गाडी पुन्हा १९७७ पूर्वस्थितीवर आली आहे, असं म्हणायला हरकत नाही. किंबहुना भारताची हीच राजकीय प्रकृती आहे की काय आणि मध्यंतरीच्या दोन-अडीच वर्षांमध्ये दिसलेली काही वेगळी चिन्हं हा अपघात होता की काय, अशी शंका येण्यासारखी परिस्थिती या निवडणुकांनी निर्माण केली आहे.

नगण्य, दुर्बल विरोधी पक्ष आणि प्रबळ प्रभावी सत्ताधारी पक्ष असं भारताचं १९७७ पर्यंतचं राजकारणातलं चित्र दिसतं. प्रादेशिक पातळीवरचे द्र. मु. क. किंवा अकाली दलासारखे काही अपवाद सोडले तर लोकशाहीत अंतर्भूत असलेला आणि लोकशाहीसाठी आवश्यक असलेला विरोधी पक्ष भारतात राष्ट्रीय पातळीवर कधीही निर्माण झालेला नाही ! स्वातंत्र्योत्तर कालखंडात प्रारंभापासूनच 'एकपक्ष प्रभुत्वसंपन्न' अशीच इथली राजकीय परिस्थिती होती. (अर्थात् त्या वेळी विरोधक संख्येनं थोडे असले तरी गुणवत्तेनं प्रभावी होते ! आज त्याबाबतीतही निराशाजनकच स्थिती आहे, हा भाग वेगळा.) विरोधी पक्षाच्या संवर्धनासाठी पोषक असं वातावरण सत्तारूढ पक्षानं (प्रारंभीच्या काळात पं. नेहरूंच्या व्यक्तिमत्त्वाच्या प्रभावामुळे निर्माण होऊ दिलं नाही आणि विरोधी पक्षाचे नेतेही ते कधी निर्माण करू शकले नाहीत. त्यामुळे इथले विरोधी पक्ष नाममात्रच राहिले. खऱ्या अर्थानं त्याचं संवर्धन झालं नाही. विरोधी पक्ष म्हणून जनमानसात प्रभावीपणे ते रुजू शकले नाहीत. स्पष्ट आर्थिक, सामाजिक, राजकीय कार्यक्रम आखून ठाम तत्त्वांवर ते कधी उभे राहिले नाहीत. म्हणूनच 'सत्तारूढ पक्ष करेल त्या सर्वाला विरोध करणारे ते विरोधी पक्ष' अशीच त्यांच्या एकूण कार्यामुळे जनतेची धारणा झाली.

अशा स्थितीतही विरोधी पक्षांना थोड्या थोड्या प्रमाणात जनसमर्थन लाभत होतं आणि नंतरच्या काळात एकत्रितरीत्या ते सत्तारूढ पक्षाला लाभलेल्या पाठिंब्यापेक्षा जास्त प्रमाणात होतं; परंतु विभागणीमुळे सत्तारूढ काँग्रेसचं प्रभुत्व कायम रहात होतं. विरोधकांनी एकत्र येण्यानंच काँग्रेसचा पराभव करणं शक्य होईल, हा विचार डॉ. राममनोहर लोहिया यांनी यामुळंच मांडला. सातत्यानं ते तो मांडत राहिले. पुढे त्याच्या सत्यतेची प्रचीतीही आली; पण दुर्दैवानं वास्तवातले त्याचे प्रयोग मात्र फारसे फलदायी ठरले नाहीत, ही वस्तुस्थिती आहे.

## ६७ ते ७७

लोहियांच्या या विचाराचा पहिला ठळक प्रयोग १९६७ साली चरणसिंग आदी मंडळींनी एकत्र येऊन केला. तेव्हा काही राज्यांमध्ये एकत्रित विरोधी पक्षाची संयुक्त आघाडी काँग्रेसचा पराभव करून सत्तेवर आली; परंतु उत्तर प्रदेशासारख्या राज्यातही चौधरी चरणसिंगांना आपलं मंत्रिमंडळ फार काळ टिकवता आलं नाही. संविद आघाडी फक्त मतांच्या एकत्रित टक्केवारीमुळे काँग्रेसवर मात करू शकली होती; पण एकजिनसीपणा आणि कार्यक्रमाबातची एकवाक्यता यांचा पुरेसा अभाव आघाडीतल्या पक्षांमध्ये होता. त्यामुळे ती कोसळून पडायला फार काळ लागला नाही.

त्यानंतर जवळजवळ दहा वर्षं १९७७ पर्यंत–पुन्हा पक्षांच्या छोट्या छोट्या राहुट्या आणि काँग्रेसचा एक भव्य तंबू असंच चित्र दिसत होतं. अलाहाबाद उच्च न्यायालयाचा इंदिरा गांधीविरुद्धचा निकाल आणि त्यानंतर निर्माण झालेली परिस्थिती यातून जयप्रकाश नारायण यांनी पुन्हा एकदा विरोधी पक्षांच्या ऐक्याचा विचार मांडला. त्यानंतर आलेली आणीबाणी आणि इंदिरा गांधी सरकारनं लादलेली विविध नियंत्रणं, धरपकड आदीमुळे देशाची लोकशाही संपुष्टात येते की काय, अशी भीती निर्माण झाली आणि विरोधी पक्षांचं अस्तित्वच धोक्यात आलं. आणीबाणीतच इंदिरा गांधींनी लोकसभा–निवडणूक जाहीर केली. विरोधी पक्षांनी पूर्वीप्रमाणे स्वतंत्रपणे ती लढविणं आत्मघातकी ठरलं असतं, स्वत.चं अस्तित्व स्वत.च पुसून टाकण्यासारखं ठरलं असतं. हे ओळखून परिस्थितीच्या रेट्यातून, जयप्रकाशजींच्या पुढाकारानं विरोधी पक्ष एकत्र आले आणि आघाडी स्थापन न करता जय–प्रकाशजींनी सांगितल्याप्रमाणे 'जनता पक्ष' हा एक पक्ष त्यांनी निर्माण केला. चौधरी चरणसिंगांचाही त्यात मोठा पुढाकार होता, नानासाहेब गोऱ्यांसारख्या नेत्यांनी त्यासाठी प्रयत्न केले होते. "जनता पक्ष ही १९६७ च्या बड्या आघाडीचीच पुनरावृत्ती आहे. परस्परविरोधी विचारांच्या पक्षांची ही खिचडी आहे. आवळ्या – भोपळ्याची ही मोट फार काळ एकत्र नांदू शकणार नाही!" असं श्रीमती गांधी तेव्हा सातत्यानं सांगत होत्या. आणि 'मतभेद विसरून आम्ही एकत्र आलो आहोत, एकजिनसीपणा यायला काही काळ लागेल, पण आम्ही पुन्हा वेगळे होणार नाही !' असं जनता पक्षातल्या सर्वच घटक

पक्षाचे नेते वारंवार सांगत होते. जनतेनं जनता पक्षाला सत्ता दिली. नंतर जनता पक्षानं काही राज्याच्या विधानसभा विसर्जित करून निवडणुका घेतल्या. त्यातही जनता पक्षाला बहुमत मिळालं; पण जनता पक्षाचं प्रभुत्व निर्माण झालं तरी विरोधी पक्ष नगण्य आणि नामशेष झाला नाही. कॉंग्रेस (आय)च्या रूपानं बरंच बळ लाभलेला विरोधी पक्ष उभा राहिला आणि प्रथमच देशाचं राजकारण द्विपक्ष-पद्धतीकडे वाटचाल करण्याची आशा निर्माण झाली; पण दुर्दैवानं इंदिरा गांधींचं भाकित लवकरच खरं ठरलं. जनता पक्षनिर्मितीत उत्साहानं पुढाकार घेणाऱ्या चरणसिंगांसारख्या नेत्यांनी पक्ष फोडण्यात त्याहून उत्साहानं पुढाकार घेतला. मधू लिमये, राज नारायण, जॉर्ज फर्नांडिस आदि मंडळींनीही त्यांच्या प्रयत्नांना हातभार लावला.

मोरारजीभाई देसाईंची काही बाबींमधली हटवादी भूमिका, जनसंघाच्या संख्याबळाचा वर्चस्ववादी धोका आणि जगजीवन राम यांच्यासारख्या नेत्याची सत्ताध महत्त्वाकांक्षा या साऱ्यांनी पक्षावर घाव घातले. पक्ष-उभारणासाठी प्रयत्न करणाऱ्या नानासाहेब गोऱ्यांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी अखेरचा घाव घातला. दरम्यानच्या काळात जनता सरकार कोसळून लोकदल–कॉंग्रेस आघाडीचं सरकार आलं आणि ते हंगामी ठरून लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत कॉंग्रेस (आय) पक्ष प्रचंड बहुमतानं केंद्रात सत्तेवर आला. अशा प्रकारे अवघ्या अडीच–तीन वर्षांत कुठल्याही राजकीय विरोधाच्या आव्हानामुळे नव्हे, तर अंतर्गत परस्पर-विरोधामुळे जनता पक्ष फुटला आणि विरोधी पक्षांना तीस वर्षांनी लाभलेली एक संधी वाया घालवून या पक्षांनी जनतेचा दारुण अपेक्षाभंग केला. विरोधी पक्षांच्या ऐक्याचा लोहियांचा आणि जयप्रकाशजींचा विचार वास्तवात उतरण्यासारखा नाही, हेच त्यातून सिद्ध झालं.

मात्र यात जनता पक्षाच्या किंवा त्यातल्या कुठल्याही घटक पक्षाच्या नेत्यांना फार दोष देण्यातही अर्थ नाही. इंदिरा गांधी म्हणत होत्या तेच खरं आहे, 'परस्पर विरोधी विचारांच्या पक्षांची ही आवळ्या-भोपळ्याची मोट' ठरली. थोड्या वेगळ्या स्वरूपात जनता पक्ष ही सुद्धा १९६७ सारखी 'बडी आघाडी'च ठरली. यातल्या घटक पक्षांमध्ये आर्थिक, सामाजिक, राजकीय ध्येय-धोरणांबद्दल परस्पर विरोधी असे मतप्रवाह होते. वैचारिक विरोधाबरोबरच व्यक्तित्वातले भेदही त्याला कारणीभूत होते. अशी रस्सीखेच सर्वजणच करीत होते. जनता सरकारनं पुन:प्रस्थापित केलेलं नागरी स्वातंत्र्य आणि लोकशाही हक्क या साऱ्यांचं श्रेय या अंतर्गत ओढाताणीतच वाहून गेलं आणि लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीत जनतेनं जनता पक्षाला झिडकारलं.

वैचारिक साधर्म्य नसलेले, परस्पर विरोधी वैचारिक धारणा असलेले आणि अत्यंत भिन्न प्रकृतीचे नेते लाभलेले पक्ष एकच एक एकजिनसी पर्याय निर्माण करू शकत नाहीत, हाच धडा प्रथम १९६७ च्या बड्या आघाडीनं आणि नंतर पुन्हा एकदा १९७७ च्या जनता पक्षानं दिला आहे. **लोहियांचा विचार सैद्धांतिकदृष्टया योग्य असला तरी वास्तवात त्याचा प्रयोग दीर्घकालीन यश मिळवू शकत नाही, हेच या दोन्ही प्रयोगांनी सिद्ध केलं आहे.**

शरद पवारांसारखा प्रभावी सूत्रधार आणि गौणस्थान स्वीकारणारे इतर घटक असणारी पु. लो. द. सारखी एखादी आघाडी सोडली तर सत्ताही अशा प्रवाशांना फार काळ एकत्र बांधून ठेवू शकत नाही, हे यातून प्रत्ययाला आलं आहे. अत्यंत प्रभावी असं सत्तेचं सूत्रही निष्फळ ठरलं, तिथे बाकीच्या सूत्राचा विचारच नको.

स्वतंत्र विचाराचा आणि कार्यक्रमाचा पाठपुरावा करणं, हाच विरोधी पक्षउभारणीचा खरा मार्ग आहे, हा निष्कर्ष या दोन अनुभवांमध्ये सामावलेला आहे. 'पर्यायी पक्ष' म्हणजे केवळ 'पक्षाला पक्ष' असं आजचं चित्र दिसतं. त्याला अर्थ नाही. आपल्या सर्वच पक्षांचे सामाजिक, आर्थिक कार्यक्रम गुळगुळीत शब्दांनी एकच आशय मांडणारे आहेत. कल्याणवादी मूळतत्त्वं नेहमीच सारखी असणार हे गृहीत धरलं, तरी त्याच्या कार्यवाहीचं काय? 'गरिबांचं कल्याण' सर्वांनाच करायचं असतं, पण ते कसं करणार? त्याचा कार्यक्रम काय? याला महत्त्व आहे. आजच्या राजकारणात कार्यक्रमाच्या आखणीच्या' आणि कार्यवाहीच्या पद्धतीला जास्त महत्त्व आलेलं आहे. हे ओळखून 'पर्याय' देता आला पाहिजे.

'पर्यायी पक्षा' ची उभारणी या अर्थानं व्हायला हवी. उगाच देवराज अरस यांच्यापासून जॉर्ज फर्नांडिस यांच्यापर्यंत सर्वांनी 'विरोधकांनी एक व्हावं' चा पुकारा करण्यात अर्थ नाही. 'समविचारी पक्ष' हेही एक असंच अस्पष्ट छाप असलेलं नाणं आहे-सर्वच जण महात्मा गांधीच्या विचाराचा वारसा सांगणार आणि 'गरिबी हटाओ'ची भाषा करणार! त्यातले 'समविचारी' कुठले हे शेवटी राजकीय सोयीनंच ठरविले जाणार ना? सर्वसामान्य जनतेलाही आता या असल्या पुकाऱ्याची उबग आली आहे. अशा घोषणांचं आणि त्यातून उभ्या राहणाऱ्या आघाड्यांच राजकारण लोकांनी झिडकारलं आहे. ठाम भूमिका आणि स्पष्ट कार्यक्रम घेऊन स्वत:च्या ताकदीवर सामोरा येणार पक्ष लोकांना हवा आहे. हाच कौल लोकसभा–निवडणुकीनं आणि नऊ राज्यांच्या विधानसभा–निवडणुकांनी दिला आहे.

'विरोधी पक्ष विभागलेले असल्यामुळे कॉंग्रेस (आय) ला लाभ मिळाला' असं जणू काही नव सत्य, नवा सिद्धांत सांगत असल्यासारखं, फर्नांडिस–चरणसिंग आदी मंडळी आता पुन्हा सांगत आहेत. लोकसभेच्या मध्यावधी निवडणुकीनंतरही यांचा ताजा

अनुभव दिला होताच की ! असं असताना विधानसभा निवडणुकात 'भारतीय जनता पक्षाशी आम्ही युती करणार नाही', अशी राजकीय अस्पृश्यतेची भूमिका याच मंडळींनी घेतली होती. तेव्हा त्यांना हा विचार सुचला नाही. इतर विरोधी पक्षांचं सोडून देऊ, पण जनता, जनता एस–चरणसिंग आणि भाजप यांनी समझोता केला असता तरी राजस्थान, गुजरात, मध्यप्रदेश, बिहार आणि काही प्रमाणात महाराष्ट्र या राज्यांमध्ये आजच्यापेक्षा विरोधकांचं चित्र वेगळं दिसलं असतं, हे मतांची आकडेवारी पाहिली की दिसून येतं; पण तेव्हा कुणालाच हा विवेक सुचला नाही किंवा सुचूनही सोयीचा वाटला नाही आणि आता पुन्हा 'विरोधी पक्षांनी लोकशाही रक्षणासाठी एक पक्ष स्थापन करावा! असा पुकारा फर्नांडिसांनी करण्यात काय अर्थ आहे?' एक पक्ष करायचा, मग तो फोडायचा आणि मग पुन्हा एक पक्ष कशासाठी हवा? पुढच्या निवडणुकीपर्यंत फोडत बसण्यासाठी काही तरी हवं म्हणून? असा एक पक्ष स्थापन करण्याच्या फंदात विरोधी पक्षांनी पुन्हा अजिबात पडू नये, त्याला आता लोकांची सहानुभूती अजिबात लाभणार नाही ते केवळ टक्केवारीचे हिशेब ठरतील !


## उत्तम बांधणी

विरोधी पक्षाची उत्तम बांधणी करण्याकडे विरोधकांनी आजपर्यंत बव्हंशी दुर्लक्ष केलेलं आहे. त्याकडेच आता त्यांनी वळलं पाहिजे. आगामी पाच वर्षांत प्रत्येक विरोधी पक्षानं हेच आव्हान मानलं पाहिजे. आपापला पक्ष ठाम वैचारिक आणि कार्यक्रमाची बैठक असलेला आणि सुस्पष्ट भूमिका असलेला होण्यासाठी झटलं पाहिजे. समविचारी पक्षांना एकत्र आणण्याच्या प्रयत्नांपेक्षा या ध्येय-धोरणांचा आणि विचारकार्यक्रमांचा लोकांमध्ये प्रसार करून आपली सुस्पष्ट आणि स्वतंत्र प्रतिमा निर्माण करण्याचा प्रयत्न या पक्षांनी केला पाहिजे; ते करत असताना, विरोधी पक्ष – चळवळीला पूरक म्हणून परस्परांशी संघर्ष टाळण्याचं कार्य सर्वांनी केलं तरी पुरेसं आहे. व्यापक एकमताच्या प्रश्नांवर संयुक्तपणे आणि मतभेदाच्या प्रश्नांवर स्वतंत्रपणे, पण विरोधकांतर्गत संघर्ष टाळून त्यांनी सत्तारूढ पक्षाशी लढा दिला पाहिजे. अशा समन्वय-सहकार्याचीच भूमिका यापुढील काही काळ तरी उपकारक ठरेल. नाही तर जनता पक्षानं भाजपचे आणि भाजपनं जनता पक्षाचे पाय ओढायचे, असे प्रकार झाले तर विरोधक आपलंच बळ आपणच खच्ची करून घेतील. त्यासाठी इंदिरा गांधींना विशेष काही करावं लागणार नाही.

समन्वय–सहकार्य हेही मर्यादित प्रमाणातच शक्य आहे, हे खरं आहे. पण आघाड्या उभारणं आणि मोडणं यापेक्षा तेच आज विरोधी पक्ष चळवळीला जास्त पोषक आहे. अशा पद्धतीनं उभ्या ठाकणाऱ्या पक्षांबद्दलच लोकांना विश्वास आणि जवळीक किंवा किमानपक्षी आदर तरी वाटेल नाही तर तात्कालिक आघाड्या करणं म्हणजे लोकांना राजकारणापासून अधिकाधिक दूर नेण्याचा प्रयत्न करणं ठरेल. त्यातून बहुमत विरोधकांपासून आणि एकूणच राजकारणापासून दूर, उदासीन राहील आणि अल्पमताची लोकशाही नांदायला लागेल.

हा बोध आमचे विरोधी पक्ष घेणार का? की पुन्हा एकदा 'एकाधिकारशाही विरुद्ध लोकशाही आणि 'विरोधकांनो, एक व्हा' च्या आरोळ्यांच्या गदारोळात ते भरकटत जाणार आहेत, हाच प्रश्न विरोधी पक्ष चळवळीबद्दल प्रेम असणाऱ्या माझ्यासारख्या असंख्य हितचिंतकांपुढे आज उभा आहे. □


**गांधी खून घटनेवर वेगळा प्रकाश**




**लेखक : पु. ल. इनामदार । मूल्य : २० रुपये । राजहंस प्रकाशन, पुणे ३०**

# मतदारांच्या उदासीनतेची लाट

वा. दा. रानडे

निवडणुकाची आणखी एक फेरी पूर्ण झाली. त्यासंबंधी विश्लेषण करताना आपल्या निवडणुकांसंबंधी काही मूलभूत विचार पुनः एकदा माडणे आवश्यक वाटते. मतदार हा सारा या निवडणूकपद्धतीचा पाया. त्याने व्यक्त केलेल्या मताचे प्रतिबिंब आपल्या लोकप्रतिनिधि-सभामध्ये खरोखर कितपत पडते? निरनिराळ्या पक्षांना पडलेल्या मतांचे प्रमाण आणि जागांचे प्रमाण यात खूप तफावत अगदी पहिल्या १९५२ च्या निवडणुकीपासून आढळून आली आहे तरीहि ही सदोषपद्धती आपण बदललेली नाही. नुकत्याच झालेल्या नऊ राज्यांच्या विधानसभा-निवडणुकीतही हेच दिसून आले. इंदिरा काँग्रेसला एकाही राज्यात ४८ टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळालेली नाहीत; पण जागा मात्र कोठे दोनतृतीयांश, कोठे तीनचतुर्थांश, तर कोठे त्यापेक्षाही अधिक मिळाल्या आहेत. राजकीय पक्षाना मिळालेल्या जागापेक्षा त्यांना पडलेली मते हाच लोकमताच्या पाठिंब्याचा खरा निकष मानायला हवा. सर्वच राज्यांतील पक्षवार मतांच्या टक्केवारीचे आकडे हा लेख लिहीपर्यंत उपलब्ध झाले नव्हते. पण काही विभागाचे आकडे पुढीलप्रमाणे आहेत. महाराष्ट्रात– मुबई शहरात इंदिरा काँग्रेसने ३४ पैकी २६ म्हणजे ७५ टक्के जागा मिळवल्या; पण मते मात्र ४५.५ टक्के मिळाली. महाराष्ट्रात त्या पक्षाला ४२ टक्के मते मिळाली. राजस्थानात हे प्रमाण ४२.९६ टक्के व मध्यप्रदेशात ४६ टक्के आहे.

पक्षवार मतदानाचा विचार करण्यापूर्वी एकूण मतदानाचा विचार करायला हवा. मतदानाबद्दल फक्त तामिळनाडूमध्ये उत्साह दिसून आला. तेथे ६५ ते ७० टक्के मतदान झाले. इतर सर्व राज्यांत ते पन्नास टक्क्यांपेक्षा कमी आहे. नऊपैकी आठ राज्यातले बहुसख्य मतदार जेथे मतदानास जात नाहीत ती कसली प्रातिनिधिक निवडणूक आणि तेथील निकालाना लोकमताचा कौल म्हणून कसले महत्त्व द्यावयाचे? या निवडणुकीत इंदिरा लाटेपेक्षाही खरी लाट होती ती मतदारांच्या उदासीनतेची. बहुसख्य मतदार मत देत नाहीत ही लोकशाहीच्या भवितव्याचे दृष्टीने चिंताजनक घटना आहे.

ही उदासीनतेची लाट शहरी सुशिक्षित मध्यमवर्गीयांच्या पुरतीच मर्यादित होती ग्रामीण भागात कोठे उदासीनता होती? तेथे चागले मतदान झालेले आहे असा दावा इंदिरा काँग्रेसच्या काही नेत्यांनी केला आहे. सर्व मतदार संघातील मतदाराची तपशीलवार छाननी केल्यानंतरच या दाव्यातील तथ्य अजमावता येईल. शहरापेक्षा अधिक मतदान काही ग्रामीण भागात झालेले दिसून येते. पण त्यावरून निर्णायक निष्कर्ष काढता येणार नाही. तसेच १९७८ पेक्षा कमी मतदान झाल्याचे सर्वसाधारणपणे आढळून येईल.

कमी मतदान थाबविण्यासाठी मतदान सक्तीचे करावे अशी एक सूचना माडली जाते. पण कोणतीही सक्ती लोकशाहीशी विसंगत आहे तसेच सक्तीने झालेले मतदान हे खरे मतदान नव्हे. तेव्हा मतदानहक्काबद्दलची जागृती वाढवून मतदान जास्तीत जास्त व अचूक होईल असा प्रयत्न करणे हाच योग्य मार्ग होय.

मतदानातून प्रातिनिधिक लोकमत व्यक्त होण्यासाठी मतदान पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त झाले पाहिजे आणि विजयी उमेदवारास पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मते मिळाली पाहिजेत या दोन अटी ठेवायला हव्यात, ही सूचना यापूर्वीही अनेक वेळा मी केलेली आहे. जेथे या दोन अटी पुऱ्या होत नसतील तेथील निवडणूक रद्द समजावी. अशा जागांची फेरनिवडणूक घेणे योग्य ठरेल; पण हा दुबार निवडणुकांचा खर्च या देशाला परवडणारा नसल्याने या जागा पुढच्या सार्वत्रिक निवडणुकीपर्यंत रिकाम्या ठेवाव्यात. ज्या पक्षाना मताच्या प्रमाणापेक्षा कमी जागा मिळाल्या असतील त्याना त्या प्रमाणात प्रतिनिधित्व मिळण्यासाठी या रिकाम्या जागा त्या पक्षानी सादर केलेल्या यादीतून भरण्यात याव्या ही पूर्वी मांडलेली सूचनाच पुनः मांडीत आहे. पन्नास टक्क्यांपेक्षा कमी मतदान झाल्यास निवडणूक रद्द होते याची एकदा जाणीव झाल्यावर मतदार अधिक संख्येने मतदान करतील.

या निवडणुकीत मतदारामध्ये उदासीनतेची लाट दिसून आली. त्याबद्दल मतदारांना दोष देता येणार नाही आपला मतदार काही नेहमीच उदासीन नसतो. १९६७ मध्ये त्याने सर्वात जास्त ६१ टक्के मतदान करून सहा राज्यात काँग्रेसला सत्तेवरून पदच्युत केले होते. १९७७ मध्येही ६० टक्के मतदान करून केंद्रातील काँग्रेस सत्ता त्याने हटविली होती. याउलट १९७१–७२ व १९८० च्या निवडणुकांत तो उदासीन का राहिला याचा विचार राजकीय पक्षानी विशेषतः विरोधी पक्षांनी– करायला हवा. कारण कमी मतदान हे त्याच्या पराभवाचे एक महत्त्वाचे कारण असून त्याचा फायदा इंदिरा काँग्रेसला मिळाला. मतदानाला न गेलेले बहुसंख्य मतदार इंदिरा काँग्रेस विरोधी होते. प्रभावी पर्यायी पक्ष असो नसो काँग्रेस विरोधी कौल नोदविण्याचा उत्साह १९६७ च्या निवडणुकीत त्यानी दाखविला होता. विरोधी पक्ष आता एकत्र आले नाहीत तरी परिस्थिती त्यांना एकत्र आणील अशी आशा त्यांना वाटत होती. त्याप्रमाणे जेथे काँग्रेसने बहुमत गमावले तेथे विरोधी पक्षानी संयुक्त आघाड्या करून सरकारे स्थापली; पण आपसातील भाडणामुळे या आघाड्या स्थिर सरकारे देऊ शकल्या नाहीत. संयुक्त आघाड्याचा हा प्रयोग फसल्यानंतर १९७१–७२ च्या निवडणुकीत मतदार उदासीन झाला. १९६७ पेक्षा मतदान साडेसहा टक्क्यानी घटले. त्याचा फायदा

इंदिरा गांधींच्या पक्षाला मिळून तो सत्तारूढ झाला. त्यानंतर १९७७ मध्ये पुन: चित्र बदलले. आणीबाणीविरुद्ध तीव्र असंतोष तर होताच पण जनता पक्षाच्या रूपाने विरोधी पक्षाचा कॉंग्रेसला प्रभावी पर्याय प्रथमच उभा राहिलेला मतदारांना दिसला आणि त्यांनी त्याला सत्तेवर आणले; पण जनता पक्षानेही मतदारांची निराशा केली. मूलभूत हक्कांवरील निर्वंध, दूर करून, त्याने लोकशाहीची पुन: स्थापना केली ही त्याची मोठी कामगिरी यात शंका नाही. त्यानंतर हा पक्ष घटकपक्षांच्या भांडणातच एवढा गुरफटला गेला की आर्थिक कार्यक्रम तो परिणामकारकपणे अंमलात आणू शकला नाही. अखेर भांडणातून पक्ष फुटला, सत्ता गेली आणि जानेवारी १९८० च्या निवडणुकीत इंदिरा गांधींना पुन: सत्तेवर येण्याची संधी मिळाली !

या पराभवातूनही जनता पक्षाचे नेते काही शिकले नाहीत. पक्षात आणखी फूट पडली. जनता–चरण, जनता–राजनारायण, भा.ज.प, जगजीवनबाबूंचा गट आणि उर्वरित जनता पक्ष अशी त्याची पाच शकले झाली. पुन: एकीकरण तर नाहीच! पण विधानसभा निवडणुकीपुरता समझोताही ते करू शकले नाहीत; अर्स कॉंग्रेसही प्रभावी पक्ष होऊ शकला नाही. अखिल भारतीय पातळीवर डावी आघाडीही प्रभावी पर्याय होऊ शकला नाही. दोन–तीन राज्यातच या आघाडीचे बळ होते. प्रभावी पर्याय नसल्याने इंदिरा कॉंग्रेस विरोधी मतदार स्वाभाविकच उदासीन झाला.मतदारांना प्रभावी पर्याय या वेळी फक्त तामिळनाडूमध्ये दिसला आणि त्यांनी इंदिरा कॉंग्रेस – द्रमुक आघाडीला झिडकारून अण्णा द्र. मु. क. कडे पुन: सत्ता सोपविली.

विधानसभा निवडणुकांत इंदिरा कॉंग्रेसने मिळविलेले यश १९७२ च्या निवडणुकांत कॉंग्रेसने मिळविलेल्या विजयापेक्षा कोठे कमी कोठे जास्त आहे. तसेच विरोधी पक्षाच्या बळात कोठे विशेष घट झाली, कोठे ते तग धरून राहिले याची कल्पना येण्यासाठी १९६७ च्या निवडणुकाचा तुलनात्मक विचार करायला हवा.

**विधानसभा निवडणुका : कॉंग्रेसला मिळालेल्या जागा**

| राज्य | १९६७ | १९६९ | १९७१ | १९७२ | १९७४ | १९७५ | १९८० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| पंजाब | ४८ | ३७ | – | ६६ | १६ | – | ६३ |
| राजस्थान | ८९ | – | – | १४५ | – | – | १३३ |
| उ. प्रदेश | १९९ | २११ | – | – | २१५ | – | ३०६¤ |
| बिहार | ९२८ | ११८ | – | १६७ | – | – | १६३¤ |
| ओरिसा | ३० | – | ५१ | – | ६९ | – | ११७ |
| मध्यप्रदेश | १६७ | – | – | २२० | – | – | २४६ |
| गुजरात | ९३ | – | – | १३९ | – | ७५ | १४० |
| महाराष्ट्र | २०३ | – | – | २२२ | – | – | १८६ |
| तामीळनाडू | ५० | – | – | – | – | – | ३० |

¤ उत्तर प्रदेश ४२१ जागाचे निकाल बिहार ३१० जागाचे निकाल

चार निवडणुकांच्या तुलनात्मक अभ्यासावरून असे दिसते की, उत्तर प्रदेश, ओरिसा, मध्यप्रदेश व गुजरात या राज्यात इंदिरा कॉंग्रेसला १९६७ पासून यापूर्वीच्या तीन निवडणुकात कॉंग्रेसने मिळविलेल्या जागापेक्षा अधिक जागा मिळाल्या आहेत. पंजाबमध्ये इंदिरा कॉंग्रेसला १९७२ पेक्षा तीन जागा कमी मिळाल्या आहेत. तेथे त्या पक्षाला अवघे चार जागांचे बहुमत असून थोडे सभासद फुटल्यास तेथे अस्थिरता येण्याचा संभव आहे. राजस्थानमध्येही इंदिरा कॉंग्रेसला १९७२ पेक्षा बारा जागा कमी मिळाल्या आहेत. उत्तर प्रदेशात इंदिरा कॉंग्रेसने तीनचतुर्थांश जागा जिंकून मोठे यश मिळविले असले तरी १९५२ च्या निवडणुकीत कॉंग्रेसने मिळविलेल्या यशाला मागे सारता आलेले नाही. त्या निवडणुकीत कॉंग्रेसला ४३० पैकी ३९० जागा मिळाल्या होत्या. बिहारमध्ये इंदिरा कॉंग्रेसला १६३ जागा मिळून जेमतेम बहुमत मिळाले आहे १९७२ पेक्षा चार जागा कमी मिळाल्या. निर्णायक बहुमत आपण मिळवू याची खात्री नसल्यानेच इंदिरा कॉंग्रेसने बिहारमध्ये झारखंड मुक्ति मोर्चाशी समझोता केला होता. त्या पक्षाला बारा जागा मिळाल्या; पण या प्रादेशिक पक्षाचा पाठिंबा ठाम म्हणता येणार नाही त्याने पाठिंबा काढून घेतला व काही थोडे सभासद फुटले तर बिहारमध्ये अस्थिरता येऊ शकेल. ओरिसा, मध्यप्रदेश व गुजरातमध्ये इंदिरा कॉंग्रेसने पूर्वीच्या सर्व निवडणुकात मिळविलेल्या यशास मागे सारले आहे, महाराष्ट्रात १९७२ पेक्षा ३६ जागा कमी मिळाल्या.

तामिळनाडूमध्ये कॉंग्रेसला पहिला मोठा हादरा १९६७ च्या निवडणुकांनी दिला. त्या निवडणुकीत कॉंग्रेसला अवघ्या ५० जागा मिळाल्या व द्रविड मुन्नेत्र कळघम या प्रादेशिक पक्षाच्या हाती सत्ता गेली. या पक्षाशी समझोता करून तामिळनाडूमध्ये आपले बळ वाढविण्याचे धोरण इंदिरा गांधींनी यानंतर अनुसरले. १९७१ च्या लोकसभा निवडणुकीत आपण निर्णायक बहुमत मिळवू की नाही याची खात्री त्यांना वाटत नव्हती म्हणून द्र. मु. क. शी त्यांनी समझोता करून लोकसभेच्या ९ जागा तामिळनाडूत जिंकल्या; पण कॉंग्रेसने विधानसभा निवडणुका लढवायच्या नाहीत ही अट मान्य करून या समझोत्याची जबर किंमत इंदिरा गांधींना द्यावी लागली. या समझोत्यानुसार तामिळनाडूतील १९७१ च्या विधानसभा निवडणुका कॉंग्रेसने लढविल्याच नाहीत. ही आपली चूक इंदिरा गांधींनी नंतर कबूल केली. द्र. मु. क पक्षात पुढे फूट पाडून एम्. जी. रामचंद्रन यांनी अण्णा द्र. मु. क. पक्ष स्थापन केला. इंदिरा कॉंग्रेसने मार्च १९७७ च्या लोकसभा निवडणुकीत अण्णा द्र मु. क. शी युती केली होती; पण जून १९७७ च्या विधानसभा निवडणुकीचे वेळी ही युती मोडली.

लोकसभेची तंजावरची पोटनिवडणूक लढविण्याचा इंदिरा गांधींचा विचार होता. आमचा पक्ष तुम्हाला पाठिंबा देईल; पण निवडून येण्याची खात्री मी देऊ शकत नाही असे रामचंद्रन यांनी त्यांना सांगितले व तेव्हापासून एम्. जी. आर व अण्णा द्रमुकपक्षाशी त्यांचे बिनसले. १९८० च्या लोकसभा व विधानसभा निवडणुकांत इंदिरा कॉंग्रेसने द्र. मु. क. शी युती केली. लोकसभा निवडणुकीत ३९ पैकी ३७ जागा जिंकून या युतीत मोठा विजय मिळविला; पण विधानसभा निवडणुकीत मात्र अण्णा द्रमुकाला मोठे यश मिळाले. द्र. मु. क. चे नेते करुणानिधींवर भ्रष्टाचाराचे आरोप होते. सरकारिया कमिशनने काही आरोपांबद्दल त्यांना दोषीही ठरविले होते, अशा पक्षाशी इंदिरा कॉंग्रेसने युती करावी हे मतदारांना पसंत पडले नाही. तसेच राज्याच्या सत्ता प्रादेशिक पक्षाच्या हाती हवी. त्यांत अखिल भारतीय पक्षाचा सहभाग नको असा विचार करून

मतदारांनी अण्णा द्र मु. क. च्या हाती सत्ता सोपविल्याचे दिसते. इंदिरा काँग्रेसला फक्त ३० जागा मिळाल्या. १९६७ मध्ये काँग्रेसने ५० जागा जिंकल्या होत्या. तेवढ्यासुद्धा इंदिरा काँग्रेसला मिळवता आल्या नाहीत. तामिळनाडूमध्ये आपले पाय रोवण्याच्या दृष्टीने इंदिरा काँग्रेसची ही पीछेहाटच आहे. अण्णा द्र. मु. कने १२८ जागा जिंकल्या व त्याच्याशी युती करणाऱ्या मार्क्सवाद्यांना ११ व कम्युनिस्टाना १० जागा मिळाल्या. इंदिरा काँग्रेस–द्र. मु. क. मुस्लीमलीग आघाडीस फक्त ६ जागा मिळाल्या. द्रमुक ३८, इंदिरा काँग्रेस ३० व मुस्लीमलीग १ अशी त्याची विभागणी आहे. जनता पक्षाची तर फारच परवड झाली. त्याला अवघ्या २ जागा मिळाल्या. प्रादेशिक पक्षाचा प्रभाव घटविण्याइतका कोणताही राष्ट्रीय पातळीवरचा पक्ष प्रभावी नाही हाच तामिळनाडू निवडणुकीचा मुख्य निष्कर्ष.

विस्कळित व विघटित विरोधी पक्षामध्ये त्यातल्या त्यात प्रभावी पक्ष म्हणून कोणता पक्ष पुढे येत आहे? निरनिराळ्या राज्यात निरनिराळे पक्ष काही प्रमाणात प्रभाव टिकवून आहेत. मध्यप्रदेश व राजस्थानात भाजपक, उत्तर प्रदेशात व बिहारमध्ये लोकदल, पंजाबमध्ये अकाली दल, महाराष्ट्रात अर्स काँग्रेस, गुजरातेत जनता जेपी असे हे पक्ष आहेत. पण प्रभावी पर्यायी पक्ष होण्याइतके यापैकी कोणत्याही एका पक्षाचे बळ नाही. इंदिरा काँग्रेसला प्रभावी विरोध करण्यासाठी संयुक्त आघाडी उभारण्याशिवाय विरोधी पक्षापुढे दुसरा पर्याय नाही. पूर्वीच्या चुका सुधारून त्या दिशेनेच प्रयत्न करायला हवेत.

जानेवारी १९८० च्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात जनता पक्षाचा मोठा पराभव झाला; पण ६ पैकी ५ जागा जिंकून मुंबई शहराचा गड त्याने आपल्या हाती राखला होता; पण या वेळी तो गड ढासळला. इंदिरा काँग्रेसला ३४ पैकी २६ जागा मिळाल्या; पण मते फक्त ४५·५ टक्के मिळाली. भारतीय जनता पक्ष मुंबईत दुसऱ्या क्रमाकाचा पक्ष म्हणून निवडून आला. त्याला मते ३२·५८ टक्के मिळाली; पण जागा मात्र त्या मानाने फार कमी म्हणजे अवघ्या ५ मिळाल्या. जनता (जे. पी.) पक्ष तिसरा आला. त्याला २३ टक्के मते व फक्त २ जागा मिळाल्या. याचा अर्थ हे दोन पक्ष एकत्र असते, निदान त्यांनी आपसात समझोता केला असता तर मुंबईच्या बहुसख्य जागा ते मिळवू शकले असते. या दोन पक्षांना मिळून ५५ टक्के मते आहेत. पधरा मतदारसघात त्याना इंदिरा काँग्रेसपेक्षा जास्त मते आहेत. समझोता असता तर या जागा त्यांना सहज मिळू शकल्या असत्या. अर्स काँग्रेसला मुंबई शहरात काही स्थान नाही हे या निकालानी दाखवून दिले. त्या पक्षाला जागा तर एकही जिंकता आली नाहीच; पण मतेही अवघी २ टक्के मिळाली! त्या पक्षाला दुसऱ्या क्रमाकाची मते एकाही मतदारसंघात नसून ज्या जागा त्याने लढविल्या तेथे त्याला तिसरा, चौथा किंवा पाचवा क्रमाक मिळालेला आहे. मुंबईतील गुजराती समाजाची मते १९७७ लोकसभा, १९७८ विधानसभा व १९८० लोकसभा निवडणुकीत जनता पक्षाला मिळाली होती; पण त्या पक्षातील फुटीनंतर त्यांची मते भारतीय जनता पक्ष व इंदिरा काँग्रेसमध्ये विभागली गेली. गुजराती वस्तीच्या कादिवली, मलबारहिल, घाटकोपर मतदारसघात भाजपला दुसऱ्या क्रमाकाची मते असून सुमारे दोन हजार मतानी त्याने या जागा गमावल्या. देशातील पहिल्या क्रमाकाच्या या शहरात अवघे ३८ टक्के मतदान झाले. बासष्ट टक्के मतदार मतदानाला गेलेच नाहीत. ही केवळ उदासीनता नव्हती तर निवडणुकीत काही अर्थ नाही, राजकीय पक्षावर आमचा विश्वास नाही हेच त्यातून सूचित झाले. मुंबईतील बहुसंख्य मतदार इंदिरा काँग्रेसविरोधी आहे. पण लोकसभा निवडणुकीनंतर जनता पक्षाची जी आणखी फाटाफूट झाली त्यामुळे राजकारणाचाच त्याला उबग आला. केवळ सुशिक्षित मध्यमवर्गीय घरी बसले असे नव्हे तर झोपडपट्ट्यातूनसुद्धा या वेळी मतदान कमी झाले.

महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला १९८० च्या लोकसभा निवडणुकीएवढे तर नाहीच; पण १९७२ मध्ये सत्तारूढ काँग्रेसने मिळविलेल्या यशाइतकेही यश मिळविता आलेले नाही. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत २३७ विधानसभा क्षेत्रात इंदिरा काँग्रेसने आघाडी मिळविली होती. या वेळी थोड्या कमी जागा मिळाल्या तरी २२५ ते २३० जागा आम्ही जिंकू असे त्याच्या नेत्याचे अदाज होते; पण प्रत्यक्षात त्यांना १८६ पुढे मजल मारता आली नाही. १९७२ च्या विधानसभा निवडणुकीत सत्तारूढ काँग्रेसने २२२ जागा जिंकल्या होत्या. महाराष्ट्रातील काँग्रेसयशाचा तो सर्व निवडणुकीतील उच्चांक आहे. त्या वेळच्या इंदिरालाटेएवढे यश दुसऱ्या इंदिरालाटेत महाराष्ट्रात इंदिरा काँग्रेसला मिळाले नाही, याचे कारण १९७२ मध्ये काँग्रेसमध्ये दुसरी फूट पडलेली नव्हती, यशवंतराव चव्हाण व इंदिरा गाधी एकत्र होते आणि काँग्रेस यशात चव्हाणांचा वाटा मोठा होता. तरीही १९६९ च्या राष्ट्रपती-निवडणुकीपासून चव्हाणाबद्दल इंदिरा गाधीच्या मनात अविश्वास आणि संशय होता. काँग्रेसमधील दुसऱ्या फुटीनंतर महाराष्ट्र हा चव्हाणाचा बालेकिल्ला सर करण्याच्या हालचाली इंदिरा गाधींनी सुरू केल्या. १९७८ च्या विधानसभा निवडणुकीत चव्हाण काँग्रेसला ६९ व इंदिरा काँग्रेसला ६२ जागा मिळाल्या. म्हणजे महाराष्ट्र काँग्रेसचा अर्धा गड इंदिरा काँग्रसने सर केला आणि अल्पकाळ अधिकारावर असलेल्या दोन्ही काँग्रसपक्षाच्या सरकारमध्येही अर्धा वाटा मिळविला. त्यानंतर या वेळच्या विधानसभा निवडणुकीत १९७८ च्या तिप्पट जागा मिळवून इंदिरा काँग्रसने महाराष्ट्राची सत्ता निर्णायकपणे आपल्या हाती आणली.

शरद पवाराच्या काँग्रेसला १९७८ एवढ्या ६९ जागासुद्धा मिळविता आल्या नाहीत. त्या पक्षाला ४७ जागा मिळाल्या; पण लोकसभा निवडणुकीतील अपयशाच्या तुलनेने आपली स्थिती थोडी सुधारली असेच म्हटले पाहिजे. लोकसभा निवडणुकीत या पक्षाला फक्त चव्हाणाची एकुलती एक जागा मिळाली होती. १९७८ च्या तुलनेने पवार काँग्रसने ज्या २२ जागा गमावल्या त्यात मोठा पराभव म्हणजे नगर जिल्ह्याचे प्रभुत्व त्यानी गमावले. १९७८ मध्ये १३ पैकी ८ जागा या पक्षाने जिंकल्या होत्या. या वेळी फक्त एक मिळाली, इंदिरा काँग्रेसला ९ जागा मिळाल्या. साखरसम्राटाचा हा जिल्हा, १९७८ मध्ये पवार काँग्रसने ज्या आठ जागा जिंकल्या त्यापैकी सात उमेदवार साखरकारखान्यांशी निगडित होते, या वेळी त्याची पीछेहाट झाली. कोल्हे व तनपुरे हे इंदिरा काँग्रेसशी निगडित

साखरसम्राट मात्र विजयी झाले. श्रीरामपूरमध्ये गोविंदराव आदिक याचा बी. के. मुरकुटे या इंदिरा कॉंग्रेसच्या कार्यकर्त्याने २६ हजार मतानी पराभव केला. हे बदलत्या वाऱ्याचे निदर्शक होते. आदिक यांनी वैजापूरची जागा मात्र २८३० या अन्य बहुमताने जिंकली. मराठवाड्यात अर्स कॉंग्रेसने इंदिरा लाट बरीच थोपविली. या भागातल्या एकूण ४९ जागांपैकी २४ जागा इंदिरा कॉंग्रेसने व १७ अर्स कॉंग्रेसने जिंकल्या. बीड जिल्ह्यात इंदिरा कॉंग्रेसला एकही जागा मिळू शकली नाही. सातारा जिल्हा हा अर्स कॉंग्रेसचा बालेकिल्ला. लोकसभा निवडणुकीत तेथील १० पैकी ९ विधानसभा क्षेत्रात त्या पक्षाने आघाडी मिळविली होती. पण यावेळी १० पैकी ७ जागा त्या पक्षाने जिंकल्या व ३ जागा इंदिरा कॉंग्रेसला मिळाल्या. १९७८ मध्ये इंदिरा कॉंग्रेसला एकही जागा मिळाली नव्हती. चव्हाण पवार कॉंग्रेसला त्या वेळीही आताएवढ्या सातच जागा मिळाल्या होत्या. बाकीच्या तीन जागा जनता पक्षाने तेव्हा जिंकल्या होत्या त्या या वेळी गमावल्या. सांगली जिल्हा वसंतदादाचा बालेकिल्ला. तेथें इंदिरा कॉंग्रेसला त्यानी मोठ्ठा विजय मिळवून दिला. या जिल्ह्याच्या आठ जागांपैकी ६ इंदिरा कॉंग्रेसने जिंकल्या. अर्स कॉंग्रेसला १ व जनता पक्षाला १ जागा मिळाली. कोल्हापूर जिल्ह्यातही १२ पैकी ८ जागा इंदिरा कॉंग्रेसने जिंकल्या. अर्स कॉंग्रेसला २, व जनता पक्षास १ व अपक्ष उमेदवारास १ जागा मिळाली. सोलापूर जिल्ह्यातही इंदिरा कॉंग्रेसचाच प्रभाव दिसून आला. तेथे १३ जागांपैकी ७ इंदिरा कॉंग्रेसने जिंकल्या. अर्स कॉंग्रेस २, शे. का. पक्ष २, जनता (जे. पी.) १ व अपक्ष १ अशी इतर जागाची विभागणी झाली. दोन्ही खानदेश इंदिरा कॉंग्रेसकडे झुकल्याचे स्पष्टपणे दिसून आले. या दोन जिल्ह्यांमधील २२ जागांपैकी इंदिरा कॉंग्रेसला १६ व अर्स कॉंग्रेसला फक्त २ जागा मिळाल्या. जनता (जे. पी.) २ व अपक्ष २ अशी इतर जागाची विभागणी आहे.

सबंध महाराष्ट्राचा विभागवार विचार करता इंदिरा कॉंग्रेसच्या यशाची विभागणी पुढीलप्रमाणे करता येईल. पश्चिम महाराष्ट्र ८१, मुंबई २६, विदर्भ ५५, मराठवाडा २४, विदर्भाच्या ६६ जागांपैकी ५५ जिंकून तेथे इंदिरा कॉंग्रेसने सर्वांत अधिक यश मिळविले. त्या खालोखाल यश मुंबईत मिळाले. पश्चिम महाराष्ट्रात १४३ पैकी ८१ म्हणजे निम्म्यापेक्षा ९ जागा अधिक मिळाल्या तर मराठवाड्यात ४६ पैकी २४ म्हणजे निम्म्यापेक्षा एक अधिक मिळाली.

महाराष्ट्राच्या निवडणुकाचे बाबतीत आणखी एका प्रश्नाचा विचार करायला हवा. महाराष्ट्रांतील यशवंतराव चव्हाणांची पकड मुख्यतः मराठा समाजाचे पाठिंब्यावर आधारलेली आहे. ती मोडावयाची तर मराठा समाजाचे प्रभुत्व मोडले पाहिजे असे जाणीवपूर्वक धोरण उमेदवारनिवडीपासून इंदिरा गांधीनी महाराष्ट्राच्या बाबतीत स्वीकारले. इंदिरा कॉंग्रेसच्या उमेदवारात यावेळी मराठे बहुसंख्य नव्हते. हे धोरण पुढे मुख्यमंत्री निवडीतही, इंदिरा गांधीनी नेटाने पुढे चालविले व महाराष्ट्राच्या नेतेपदी ए. आर. अंतुले याची निवड केली. सत्तेवरील मराठा समाजाचे प्रभुत्व मोडण्याचा हा प्रयत्न स्वागतार्ह मानला पाहिजे. आम्ही जातीयवादी नाही असे म्हणावयाचे आणि सत्तेत मात्र एका जमातीचे प्रभुत्व ठेवावयाचे हे धोरण योग्य नव्हते व ते यापूर्वीच कळायला हवे होते. महाराष्ट्राच्या राजकारणावर याचे काय परिणाम होतील? मराठा समाज नाराज होईल. त्याला योग्य वाटा जरूर द्यायला हवा पण त्याचे प्रभुत्व नको. सत्तेवरील आपले प्रभुत्व गेल्याने वसंतदादाचा गट नाराज होणे स्वाभाविक आहे; पण तो तेवढ्यावरच न थांबता बंडखोरी करून बाहेर पडेल का आणि अर्स कॉंग्रेसशी सहकार्य करून सत्ता मिळविण्यासाठी आघाडी उभारील का? आताच यासंबंधी काही भाकित करता येणार नाही; पण या दृष्टीने प्रयत्न होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. त्यातून मराठे विरुद्ध बिगर मराठे असा नवा सत्तासंघर्ष महाराष्ट्रात सुरू होण्याचा संभव आहे. □

## विधानसभा निवडणुका १९८० : अंतिम पक्षबळ

| राज्य | जागा | इं. कॉं. | भाजप | ज.(जेपी) | ज.(चरण) | ज.(राज) | कॉं.(अर्स) | कम्यु. | मार्क्स | अकाली | द्र.मु.क | अ.द्र.क. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बिहार | ३२४ | १६३ | २१ | १३ | ३९ | – | १४ | २२ | ६ | – | – | – |
| गुजरात | १८२ | १४० | ९ | २१ | १ | – | – | – | – | – | – | – |
| मध्यप्रदेश | ३२० | २४६ | ६० | २ | १ | – | – | – | – | – | – | – |
| महाराष्ट्र | २८८ | १८६ | १४ | १७ | – | – | ४७ | २ | २ | – | – | – |
| ओरिसा | १४७ | ११७ | – | ३ | १३ | – | २ | – | – | – | – | – |
| पंजाब | ११७ | ६३ | १ | – | – | – | – | ९ | ५ | ३७ | – | – |
| राजस्थान | २०० | १३३ | ३२ | ८ | ७ | – | ६ | १ | १ | – | – | – |
| तामिळनाडू | २३४ | ३० | – | २ | – | – | – | १० | ११ | – | ३८ | १२८ |
| उत्तरप्रदेश | ४२५ | ३०६ | १० | ४ | ५८ | ४ | १३ | ७ | – | – | – | – |

उत्तरप्रदेशाचे निकाल ४२१ जागांचे व बिहारचे, ३१० जागांचे. इतर पक्षांना मिळालेल्या जागात महाराष्ट्रात शेकडा ९, बिहारमध्ये झारखंड मुक्तिमोर्चा १२, छोटे पक्ष व अपक्ष याना मिळालेल्या जागा येथे दिलेल्या नाहीत.

# एस. पी. कॉलेज ते कुयाहोगा !

## माधुरी बापट

अमेरिकेत आल्यापासून मनाला एक मोठी वाईट खोड लागलीय्. कुठल्याही बाबतीत सारखी तुलना करायची. इथं कसं आहे नि आपल्या तिकडे कसं असतं ? निसर्ग, समाज, राजकारण वगैरे वगैरे. आपला देश प्रगतिशील, हवामान उष्ण, तीसच वर्षांपूर्वी बंधमुक्त झालेला व एकंदरीत गरीब ! उलट हा देश प्रगत, श्रीमंत, थंड हवामानाचा, गेली दोन शतके इथे चालणारी बळकट लोकशाही— ह्यामुळं तसे फरक खूपच; परंतु मूलत: मनुष्यजात—स्वभाव हा शेवटी सारखाच; त्यामुळं काही गोष्टीत साम्यही जरूर !

त्यामुळं विद्यार्थी—शिक्षणक्षेत्र—तरुणपिढी ह्या गोष्टीचा विचार करू लागलं की मला शिक्षक म्हणून असलेल्या तोकड्या अनुभवाचं उथळ पाणी फारच खळखळू लागतं. तशातच पुण्याच्या एस. पी. मध्ये राजीनामा ठेवल्यावर दोन-अडीच महिन्यातच क्लिव्हलँडच्या कुयाहोगा कम्युनिटीत लेक्चरर म्हणून नेमणूक झाल्याने सर्व साम्यभेद अगदी प्रकर्षाने जाणवत होते.

सर्वात मोठा फरक जाणवला तो नेमणुकीच्या वेळीच ! एका जागेसाठी दहाबारा इच्छुक उमेदवारांचे इंटरव्ह्यू घेण्यात दोन-तीन तास घालवून, सर्वांना दोन-तीन आठवडे आशेवर ठेवून शेवटी एका भलत्याच व्यक्तीची नेमणूक करण्याचा आपल्या तिकडे प्रकार असतो. वाढत्या बेकारीमुळे इथेसुद्धा एकच जागा असली तरी शेकड्यांनी अर्ज येतात खरे—नुकतंच एका डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या ओपनिंगच्या वेळी केवळ वीस जागासाठी सात हजार अर्ज आलेले ऐकले ! तेव्हा ही गोष्ट इथंही नवीन नाही; पण इथं सर्वांचे इंटरव्ह्यू घ्यायची नाटकं नाहीत. तेवढा वेळच कुणाला असतो म्हणा ! म्हणजे नसतो असा आभास तरी असतो. रिग्रेटची पत्रंही पाठवतीलच असं नाही; पण सिलेक्टेड लोकानाच जेव्हा टेलिफोनवरच इंटरव्ह्यूला बोलावतात तेव्हा ती निवड जवळजवळ झाल्यासारखीच समजावी. मग इंटरव्ह्यू हा नावालाच असतो—एक केवळ फॉर्मेलिटी म्हणून !

त्यामुळं ज्याचं नावही अजून ऐकलं नव्हतं त्या कॉलेजच्या भौतिकशास्त्र प्रमुखाचा जेव्हा कॉल आला तेव्हा मी आश्चर्यात बुडून गेले. दुसऱ्याच एका कॉलेजमध्ये टाकलेला माझा रेझ्यूमे ह्या महाशयापर्यंत पोचला होता. कसा ? देव जाणे ! पण टेलिफोनवर त्याचे इंटरव्ह्यूचे आमंत्रण स्वीकारून मी मोकळी झाले.

ह्या वेळेपर्यंत खरं म्हणजे रेझ्यूमे ही काय भानगड आहे हेही कळत नव्हतं. ते एक मोठंच शास्त्र आहे नि नुसता Resume कसा लिहायचा हे शिकवणारे न्यूयॉर्कमध्ये क्लासेस असतात व त्या कोर्सची फी दोन दोन हजार डॉलर्स असते ! त्यामुळं माझ्या अर्जातली कुठली गोष्ट ह्या गोऱ्या फिजिसिस्टला आवडली ते मला उमजेना. 'मुलगी पसंत पडली की ती अप्सरा ठरते.' असं आमचे एक काका म्हणायचे तसा योग असला की दुर्गुणसुद्धा गुणात जमा होतात !

आता दुर्गुण कुठले म्हणाल तर परदेशी असणं, त्यात आशियाई नि ह्यात भारतीय नि त्यात मराठी ! अगदी शाकुंतलातल्या चौथ्या अंकातला चौथा प्रवेश, त्यातला चौथा श्लोक नि त्यातली चौथी ओळ—याची अगदी उलटी भाजणी म्हणा ना ! परंतु हा दुर्गुणसुद्धा त्या वेळेपुरता गुणच ठरला होता, कारण इथे Pay role वर दहा टक्के अल्प संख्य व स्त्रिया असणे हा कायदा ! आणि त्यातही निग्रो, स्पॅनिश, युरोपियन, जापनीजमध्ये शास्त्रशाखेत शिकलेल्या स्त्रियांच्यात Qualified असून Underemployed राहून मानेवर खडा ठेवून काम करणारी भारतीय-मराठी—स्त्रीच मेजॉरिटीत ! त्यामुळंच आपली वर्णी लागली ही मेख कळायला मात्र वर्ष जावं लागलं !

खरं म्हणजे ह्या वेळेपर्यंत अमेरिकन इंग्रजीही पुरेस समजत नव्हतं. त्यामुळं टी. व्ही. पाहाण्यात किंवा रेडियो ऐकण्यात मजा वाटणं बाजूलाच; पण ग्रोसरी स्टोअरमध्ये वगैरे लोकांचं बोलणं हे त्यांच्या ओठाच्या हालचालीवरून व चेहऱ्यावरील हावभावावरून समजून घ्यावं लागत होतं. असं असताना चाकासाहेबाचं टेलिफोनवरचं इंग्रजी समजलं कसं हेही एक आश्चर्यच होतं; पण सर्वसामान्य कामगारवर्गाच्या She *do* not know किंवा *Rain is falling* अशा इंग्रजीपेक्षा, सुशिक्षित विशेषत: शिक्षणक्षेत्रात काम करणाऱ्याचे इंग्रजी हे पुष्कळसे बरे असते. म्हणजे शुद्ध व स्पष्ट असते. तरीही आपल्या शुद्ध तर्खडकरी, मराठी—संस्कृत उच्चारित किंवा अगदी ऑक्सफर्डियन ब्रिटिश उच्चारित इंग्लिशच्या मानानं पुष्कळच पुसटसं !

घाईघाईत दोन दिवसांत इंटरव्ह्यूची तयारी पूर्ण केली. शहराच्या पूर्वभागातून Down Town ओलांडून मला पश्चिमभागात जायचं होतं. कार ड्रायव्हिंग ह्या गोष्टीचा त्या वेळेपर्यंत विचारही केलेला नव्हता. घरापासून एकदोन ठिकाणी बदलून का होईना पण कॉलेजपर्यंत पोचवणाऱ्या बसेसचे स्केजूल मिळवले. साडी की स्लॅक ह्या संघर्षात स्लॅकने विजय मिळवला नि N. C. C. ड्रेसशिवाय कधीही शर्टपॅंटचा विचारही न केलेली माझ्यासारखी बाळबोध मराठी मुलगी स्लॅकमध्ये तयार होणे ह्यावर माझाच विश्वास बसेना; पण म्हणतात ना, पाण्यात पडलं की आपोआप हातपाय चालू लागतात ! (प्रत्यक्षात मात्र पोहण्यापेक्षा माझी बुडण्याचीच तयारी असते )

बसेस चुकणार तर नाहीत ? पासून सिलेक्ट होऊ की नाही ? पर्यंत सर्व प्रश्नांचं मनावर बरेच दडपण होतं. 'कॉलेज आलं की सांगा बरं का' असं ड्रायव्हर कम् कंडक्टरला सांगून मी धडधडत्या

हृदयानं बसले होते. तेव्हा विश्वासानं कॉलेजचा स्टॉफही दाखवणारं नागपूरचं मराठी वयस्क जोडपंच बसमध्ये भेटलं. त्यानी दिलेल्या शुभा शीर्वादावर आभार मानून मी कॉलेजच्या आवारात शिरले.

लहानपणापासूनच जून महिना आला नि ते ढगाळ पावसाळी वातावरण असलं की शाळा–कॉलेजात जायच्या कल्पनेनं अजूनही मन नव्हंस होतं. एकीकडे हवंसं वाटणारं पण त्याच वेळी नकोसं वाटणारं ते वातावरण–त्यानं माझ्यातला विद्यार्थी–शिक्षक एकीकडे उदास होतो, त्याच वेळी उत्साहही प्रफुल्लित होतो. मनावरचं दडपण असण्या नि नसण्याच्या सीमारेषेवर येऊन एकदम दहा-पंधरा वर्षांनी लहान झाल्यासारखं वाटलं क्षणभर आपण इंटरव्ह्यू द्यायला आलो आहोत हेही विसरून गेले !

इंडियन टाइमचा पायंडा मोडून मी दिलेल्या वेळेवर वाका-साहेबांच्या ऑफिसमध्ये प्रवेश करती झाले. तेव्हा प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या मध्यमवयीन चष्माधारी गोऱ्या साहेबानं दारापर्यंत येऊन हाताला धरून स्वत: मला आसनस्थ केले. असाच अनुभव व्हिसाच्या इंटरव्ह्यूच्या वेळीही आला होता. कारण इथं सर्व समान समजले जातात. मालक–नोकर, बॉस–असिस्टंट, लहान–मोठा, गरीब–श्रीमंत हा फरक नाही–बाह्यत. तरी नाही. ह्याचा अगदी दाखलाच ! अशा प्रेमळ स्वागतानं मी काहीशी संकोचूनच गेले; परंतु माझी सर्टिफिकेट्स वगैरे पाहाण्याच्या विशेष भानगडीत न पडता मला माझं काम समजावून देऊन, मिळकतीची कल्पना देऊन माझी नेमणूक कधी केली हेही समजले नाही ! आवश्यक ती पुस्तके वगैरे घेत असताना मी पढवल्याप्रमाणे माझ्या अडचणींचं थोडक्यात वर्णन केलं. नुकतीच आलेली Immigrant, हवामान, इंग्रजीची सवय, बसवर अवलंबून राहाणे–वगैरे वगैरे. हो, इथे सर्व स्पष्टपणे सुरवातीलाच सांगितलेले बरे असते. उगाच झाकली मूठ ठेवून आपल्याच पायावर कशाला धोंडा ?

सर्व कॉलेज, कॉलेजमधील फॅसिलिटीज् दाखवून प्रोफेसर म्हणाले, 'We have got beautiful Campus' त्याच्या ह्या वाक्याला मी मान डोलावली खरी; पण पुणे विद्यापीठाचे कॅंपस सतत माझ्या डोळ्यासमोर येत होते.

## इथला विद्यार्थी

बाकी इथले विद्यार्थी आपल्याला एकदम पसंत ! म्हणाल, नसायला काय झाले ? चागले गोरेगोमटे ! गोरेगोमटे तर खरेच, कारण वर्गात जपानी, इराणी, अरब अशा नाना जाती–जमाती असल्या तरी निग्रो एकही नव्हता! खरं म्हणजे काही कारण नसतं; पण मनात एक उगीचच भीती असते त्यांच्याविषयी. त्याचं इंग्रजीही विचित्रच ! हल्ली तर Black English नावाची स्वतंत्रच भाषा रुळली आहे! तिचे व्याकरण वगैरे ही थोडंफार निराळंच असतं !

तशा इथे इंग्रजीच्या नाना तऱ्हा ! काही स्पॅनिश ओरिजिन तर काही जर्मन, फ्रेंच, इटालियन, जापनीज ओरिजिन. प्रत्येकाचा accent वेगळा. त्यातल्या त्यात मिडलईस्टवाल्यांची भाषा जरा आपल्याला जवळची वाटते. 'ट' च्या जागी 'त' उच्चार करणारे इराणी आपल्या तिकडे भली मिजास बाळगून असतात, कॉलेजमधून दादागिरी करतात. आपल्या तिकडे परीक्षेत कॉप्या करून सुपरवायझरला सळो की पळो करून सोडणारी ही उंटांची पिले ह्या देशात मात्र अगदी गरीब गायीसारखी वागतात !

गोरा, देखणा, उंच इराणी म्हणजे आपल्या तिकडे एक कुतूहल असते, तसं इथं नाही. इथं सगळेच गोरे, देखणे नि उंच ! रस्त्यावर Death to Shah अशा घोषणा लिहिणारे इराणी आपल्या तिकडे पोलिसानी दटावले की सुरा दाखवीत असत; पण इथे त्यांचेच भाईबंद भेदरून 'आमचा शहाशी संबंध नाही' म्हणतात. कारण त्याना ठाऊक आहे की अमेरिकेतून Deport केले की इराणमध्ये आयातोलाच्या राज्यात फाशी किंवा Firing Squad ठरलेलाच. एकाच देशातली माणसं दोन वेगवेगळ्या देशात– विशेषत: गरीब व श्रीमंत– कशी वागतात ह्याचं अगदी नमुनेदार उदाहरणच !

इथल्या हवामानामुळं, सकस विनाभेसळ अन्नामुळं नि एकूणच हेरिडेटरीमुळं, १६–१७ वर्षांची मुलं ही चांगली उंच नि धिप्पाड असतात. आपल्या तिकडे पी. डी. वर्गातही हाफचड्डीत येणाऱ्या मुलांच्या मानाने तर खूपच ! उंचीबरोबरच ह्या मुलांना मॅच्युरिटीही बरीच आलेली असते. नवा मास्तर पाहून हाईहुई करून त्याला सळो की पळो करून सोडायची त्याची वृत्ती नसते. अर्थात हे फक्त कॉलेजच्या विद्यार्थ्यांपुरतंच. कारण इथले शाळेतले विद्यार्थी नि शाळा ही एक डोकेदुखी बनलेली आहे; पण कॉलेजमध्ये वर्गात बसावं कि नाही हे त्याच्यावरच सोपवलेलं; त्याचबरोबर होमवर्क करणे, जर्नल्स लिहिणे ह्याचीही जबाबदारी त्यांच्यावरच असते. आपल्या तिकडच्या सारखे मागे लागून करून घेणे हा प्रकार इथे नाही. हुषारीबरोबरच सिनसिअॅरिटी, रेग्युलॅरिटीला मार्क्स जास्त !

आणि ही मुलं तेवढ्याच जबाबदारीनं ती पारही पाडत असतात. कारण स्वत:च्या पायावर त्याना लौकर उभं राहायचं असतं. कॉलेजमध्ये शिकणारी मुलं ही आपल्या आईवडिलांजवळ क्वचितच राहात असतात. व्यवस्थित कायदेकानू करून इथे समाजाची घडी पहा कशी बसवलीय. १८ वर्षांवरील मुलांचे टॅक्समध्ये एक्झमशन घेता येत नाही. सहाजीकच आईवडील ह्या मुलाना १८ वर्षांनंतर घराबाहेर पडायला प्रोत्साहन देतात. क्वचित् खूपच श्रीमंत आईबाप मुलाच्या शिक्षणाचा खर्च करतात. अन्यत: हुषार मुलं स्कॉलरशिपवर, गरीब मुलं अर्धवेळ नोकरी करूनच शिकत असतात. सैन्यात दोन वर्षं जाऊन आले की कॉलेजशिक्षण मोफत मिळते म्हणून हायस्कूलनंतर दोन वर्षं व्हेटरन म्हणून काम करतात नि मग कॉलेजला येतात. लहान वयात खरं जग पाहिल्यानं, लौकर जबाबदारी ओळखल्यानं ही मुलं मॅच्युअर्ड असतात. उलट आपल्या तिकडे मुलं २०-२२ वर्षांपर्यंत आईवडिलांच्या छत्राखाली राहतात. त्यामुळं जगाचा अनुभव, व्यवहारज्ञान ह्यात कमी पडतात.

अर्थात कितीही गरीब असला तरी आईवडिलांच्या आधारामुळं कॉलेजात फाटके कपडे घालून जायची वेळ त्याच्यावर येत नाही. इथे १८ वर्षांनंतर आईबाप मुलाना कसलीही मदत करत नाहीत, केलीच तर पै न् पै वसूल करतात. काही कारणाने एखाद्या मुलाला वा मुलीला २०–२१ वर्षांपर्यंत वेगळे बिऱ्हाड थाटणे जमले नाही तर त्यावर वाटेल तसे टोमणे मारायलाही कमी करत नाहीत. त्यामुळं बर्फात सुद्धा फाटक्या जीन्स, फाटके कोट घालून येणारी मुले पाहिली की जीव कळवळतो. त्याचबरोबर झकपक कपड्यात येणारीही कमी

नसत. एवढा विरोधाभास आपल्या तिकडे तरी जाणवत नाही.

नोकरीचा १ ला आठवडा तरी व्यवस्थित पार पडला. हो! कारण इथे कोणत्याही शुक्रवारी सोमवारपासून येऊ नका असं सांगण्याची पद्धत! Hire & Fire अशी पॉलिसी. आधी नोटिस वगैरे प्रकार नाही, ले ऑफ वगैरे शब्द इकडे आले कीच कळू लागतात. अशा वेळी आपल्या तिकडची पद्धत बरी वाटते. प्रथम नोकरी मिळतानाच काय ती यातायात पडेल; पण एकदा का मिळाली की मग निश्चिती.

इतर काही बाबतीप्रमाणं कॉलेजमधल्या नोकरीचा इथं हा एक फायदा म्हणा हवं तर! मुलांचं नुकसान होऊ नये म्हणून निदान एक टर्म तर शिक्षकाला नोकरीवर ठेवलं जातं. जसे दिवस जातील तसे रोज एका नवीन गोष्टीचा इथे उलगडा होऊ लागतो.

इथे मुलं वर्गातही पॉपकॉर्न खाणे, कोक पिणे, सिगरेटी ओढणे असे उद्योग करतात. तेव्हा आश्चर्य वाटे; पण अर्धवेळ नोकरी करून, २५–३० मैल दूरवरून कॉलेजला येणाऱ्यांना क्वचित् लंच घ्यायलाही वेळ मिळत नाही. अर्थात् प्रयोगशाळातून हा प्रकार पूर्ण वर्ज्यच असतो.

इथली आणखी एक पद्धत फार गमतीशीर वाटली. आपल्या तिकडे एकदा का पी. डी. ला एका कॉलेजात नाव घातले की साधारणपणे डिग्री मिळेपर्यंत सर्व वर्षे, सर्व विषय तो विद्यार्थी एकाच कॉलेजमध्ये शिकत असतो. इथे तो नियम नाही. वेगवेगळे विषय वेगवेगळ्या कॉलेजमध्ये शिकता येतात. म्हणजे एस. पी. मध्ये केमिस्ट्री चागले शिकवतात किंवा MES ला फिजिक्स लॅब चागली म्हणून ते विषय त्या त्या कॉलेजमध्ये शिकायचे किंवा एखाद्या कॉलेजची फी ही त्या विषयासाठी कमी असते म्हणून तिकडे जायचे. ह्या प्रकारामुळे मुलाची अर्थातच धावपळ फार होत असते.

परतु ही गोष्ट आपल्या तिकडच्या मुलाना अगदी पसत पडेल नाही? म्हणजे BMCC च्या मुलाना एस्. पी वर किंवा वालचंदच्या मुलाना विलिंग्डनवर माल पहायला जावं लागतं तसा हा प्रकार होणार नाही. इंग्रजीसारखे विषय अशा कॉलेजमध्ये शिकायलाच गेलं म्हणजे दोन्ही हेतू साध्य!

ह्यामुळे अथातच मुलं एकाच वर्गात असून एकमेकाला फारशी ओळखत नसतात. आपल्या तिकडे Class Spirit किंवा College Spirit, कॉलेजविषयी अभिमान वगैरे गोष्टी असतात त्या इथे नाहीत.

भारतात असताना उगीचच वाटत असे की इथले सर्वच विद्यार्थी हे आइनस्टाइनच्या पावलावर पाऊल टाकून जाणारे असावेत; पण प्रत्यक्षात मात्र इथल्या विद्यार्थ्यांचा I. Q. हा आपल्या तिकडच्या विद्यार्थ्यांच्या I. Q. एवढाच पाहून नवल वाटत. इथल्या मुलाना लहान वयातच समज आल्याने, एकूणच प्रगत देशात वाढल्याने सर्व आधुनिक गोष्टीविषयीचे ज्ञान व सर्व साधने वापरण्याची त्याची हातोटी ही कौतुकास्पद असते. १६–१७ वर्षांची मुलेही कॉम्प्युटर्स वापरतात; पण आपल्या तिकडे न्यूक्लिअर फिजिक्स शिकणाऱ्याना रिॲक्टर पाहायलाही मिळत नाही!

आर्टस्, कॉमर्स साइडकडे शिकणाऱ्यानाही कंपलसरी म्हणून सायन्सचा एक पेपर द्यावा लागतो. अशा मुलाना शास्त्र शिकवताना नाकी नऊ यतात. त्याच्यात एकूणच सायन्स शिकणाऱ्यासारखा पेशन्स हा प्रकार नसतो. त्यामुळं Music, Theatre अशा विषयात बी. ए. करणाऱ्यांना Sino पासून सर्व शिकवणं म्हणजे एक कसोटीच!

भारतात असतानाही इथल्या विद्यार्थ्यांविषयी बरंच ऐकलं होतं. विशेषत: इथल्या मुलांना तोंडी हिशोब राहू देत; पण साधे बेचे पाढेही येत नसतात; ह्या गोष्टीचा मात्र अगदी पुरेपूर पडताळा आला. वयाच्या ५ व्या–६ व्या वर्षापासून इलेक्ट्रॉनिक कॅलक्युलेटर्स वापरणाऱ्या ह्या मुलीना आउटकी–अडीचकी म्हणणारे आपले आजोबा–पणजोबा म्हणजे एक मिरॅकलच वाटेल.

आपल्या तिकडे पाश्चात्य देशाविषयी, लोकाविषयी जे एक कुतूहल, आकर्षण असते त्याच्या अनेक कारणात एक मोठं कारण म्हणजे इथे असलेले Sexual Freedom. १६–१७ वर्षांच्या मुलामुलीने एकदा तरी 'तो' अनुभव घेतलेला असतोच, वगैरे वगैरे गोष्टी जरी पूर्वी ऐकल्या होत्या तरीपण कॅरिडॉरमध्ये कोचावर किंवा रिकाम्या वर्गातून चालणारे मुलामुलीचे 'प्रेमळ चाळे' पाहून मी मात्र पुरती खलास होत असे. अर्थात् सुरुवाती-सुरुवातीलाच! पुढं सवयीनं नजरच मरते हो!

शिक्षक म्हणून मला इथला विद्यार्थी आवडायला आणखी कारण म्हणजे maturity बरोबरच ही मुलं वागण्यात अतिशय Shophisticated वाटतात. एखादी गोष्ट समजली नाही तर दणादण बाकं बडवायचा प्रकार कधीच होणार नाही. शातपणे शंकासमाधान करून घेतील.

आपल्या तिकडे प्रॅक्टिकल्स न करता बरोबर ऑब्झर्वेशन्स आणून दाखवणाऱ्या व ऑब्झर्वेशन्स चुकीची असूनही उत्तर बरोबर काढून दाखवणाऱ्या मुलाना तोंड देता देता नाकी नऊ येतात. तो प्रकार इथे नाही. साधी सरळ आकडेमोड कॅलक्युलेटर्स वापरूनही बरोबर करण्याची जिथे मारामर तिथे मॅन्युपिलेशन कसलं करताहेत! त्यामुळं ह्या बाबतीत मी निर्धास्त असे.

शिवाय परीक्षेच्या वेळी कॉपी करणे नि ती पकडणे हाही प्रकार इथे नाही. ह्या सगळ्या गोष्टीना मुळात एक मोठठं कारण आहे. इथं मुलं शिकायला येतात ती एका विशिष्ट ओढीनं! हौस म्हणून किंवा आईवडिलांच्या इच्छेखातर शिकायला येत नाहीत. सर्वसामान्याना न परवडणारा इथला कॉलेजचा खर्च व पुढील आयुष्यातली जबाबदारी ह्या गोष्टी त्याच्या डोळ्यासमोर सतत असतात.

## शिक्षक–परीक्षापद्धती

इथल्या काही गोष्टी मात्र मनाला जरूर खटकतात. आपल्या तिकडे शिक्षक हा विद्यार्थ्याला एका अधिकाराने काही सागू शकतो. 'गुरुदक्षिणा' ही कल्पना सुद्धा किती मगल आहे नाही? पूर्वीपेक्षा आता परिस्थिती थोडीफार बदलली असली तरी वर्गातल्या हुषार विद्यार्थ्यांचा पेपर किंवा एखादे उत्कृष्ट जर्नल शिक्षक स्वत:च्या *अधिकाराने ठेवून घेऊन इतर मुलाना मार्गदर्शनासाठी दाखवू शकतो.* ही गोष्ट मात्र इथे करता येत नाही. शिक्षक झाला तरी प्रथम त्या विद्यार्थ्याची परवानगी घ्यावी लागते व इतर मुलांना आपले कार्य दाखवायला बहुतेक वेळा तो नाराजच असतो.

इथला प्रायव्हसी ॲक्ट व एकूणच कायदेकानू फारच विचित्र व कडक! १०–१२ वर्षांच्या मुलामुलीच्या खोल्यातून प्रवेश करता-

नाही आईवडिलांना त्याची परवानगी घ्यावी लागते. प्रायव्हसी ॲक्ट, चाइल्ड ॲब्यूझ वगैरे कायद्यांमुळे आईवडील किंवा शिक्षक मुलाच्या अल्लड वयात त्यांच्यावर नियंत्रणे ठेवू शकत नाहीत; पण तीच मुलं पुढे alcoholic वा Drug Adicts झाल्यावर त्याचे खापर मात्र आईवडिलांवर फोडले जाते. अशी ही दुनिया !

कुठल्याही गोष्टीचा केवळ पैशातच त्याचा मोबदला समजणाऱ्या ह्या दुनियेत ऑनररी वगैरे शब्दही ठाऊक नसतात. मग एखादा हुषार मुलगा तरी स्वत:चे ज्ञान, कला विनामोबदला इतरांना कसा देईल? त्यामुळं वेळ संपल्यावरही शंकासमाधानासाठी जास्त वेळ थांबणाऱ्या माझ्यासारख्या बाईला आमचा लॅब असिस्टंट नक्कीच मूर्ख समजत असेल !

कारण इथं शिक्षक ठरलेल्या वेळेपेक्षा एक सेकंदही जास्त वेळ थांबणार नाही. मग पोर्शन संपण्यासाठी 'जादा तास' घेणे वगैरे गोष्टच सोडा ! कारण एक तर त्या जादा तासाचा overtime मिळणार नसतो व शेवटी परीक्षा तोच घेणार असतो. त्यामुळं थोडा पोर्शन राहिला काय किंवा संपला काय ?

सर्व वर्गांची मिळून एक परीक्षा किंवा सर्व कॉलेजची मिळून एक परीक्षा हा प्रकार इथे नाही इथे जो शिकवतो, तोच परीक्षा घेतो व रिझल्ट लावतो. त्या विषयाचे सर्वच्या सर्व गुण हे त्याच शिक्षकाच्या हाती ! ह्या पद्धतीचे जसे फायदे तसे तोटेही बरेच आहेत.

आता आपल्या तिकडेही सेमिस्टर पद्धती, इंटर्नल असेसमेंट वगैरे गोष्टी रुळल्या आहेत. पूर्वीच्या परीक्षापद्धतीमध्ये ऐनवेळी एखादा विद्यार्थी आजारी पडला की त्याचे सगळे वर्ष वाया जाई. आता काही प्रमाणात त्यावर आळा बसला आहे. तरीपण एका सार्वजनिक परीक्षेला महत्त्व असतेच.

एकाच शिक्षकाने तो विषय शिकवून त्याचा रिझल्ट लावण्यामध्ये जसे फायदे तसे तोटेही बरेच ! विशेषत: तो शिक्षक जर Biased असेल तर त्या विषयापुरते तरी विद्यार्थ्याचे खूपच नुकसान होते. त्यामुळे अशा पद्धतीत शिक्षक अगदी Impartial असणे महत्त्वाचे असते. शिवाय शिक्षकाने दिलेली ग्रेड म्हणजे दगडावरची रेघ असते. ब्रह्मदेवही ती बदलू शकत नाही !

मात्र ह्या पद्धतीमुळे आपल्या तिकडे विशेषत: मोठ्या शहरांतून क्लासेसची जी एक मोठी 'इंडस्ट्री'च निर्माण झाली आहे, तिला इथे आळा बसला आहे. नाही तर कुठल्याही गोष्टीचे धंद्यात रूपांतर व्हायला इथे काय वेळ ? परंतु अशा क्लासेसमधून सर्वसाधारणपणे युनिव्हर्सिटीच्या ठराविक साचाच्या पेपरची तयारी करून घेतली जाते; पण इथे शिक्षकागणिक पेपराचा नमुना वेगळा, परीक्षेची पद्धत वेगळी. कोणी Yes/No प्रकारचे प्रश्न काढतो तर कोणी open book ठेवतो; पण जेव्हा रिझल्ट लावतो तेव्हा विद्यार्थ्यांची वागणूक, हजेरी वगैरे गोष्टी लक्षात घेऊन ! अशाने विद्यार्थ्यांच्या नुसत्या बुद्धिमत्तेचे, ज्ञानाचे मूल्यमापन न होता त्याची 'माणूस' म्हणून असलेल्या गुणावगुणाची परीक्षा होते. म्हणूनच 'कॉलेज ग्रॅज्युएट' ह्या शब्दाला काही अर्थ प्राप्त होतो.

इथल्या पद्धतीमुळे जसे विद्यार्थी एकमेकांना विशेष ओळखत नाहीत वा फार जवळ येत नाहीत तसे एकाच कॉलेजमध्ये एकच विषय शिकवणारे शिक्षकही एकमेकांना फारसे ओळखत नाहीत. आपल्या तिकडे पेपरसेटिंग, पोर्शन वगैरेसारख्या मीटिंग्जमुळे तरी सर्व शिक्षक एकत्र येतात. इथे हा सर्व व्यवहार पत्रद्वारे वा टेलिफोनवरच होतो. त्यामुळे प्रत्यक्ष कुणाला–अगदी विभागप्रमुखालाही–भेटण्याची वेळच येत नाही.

## आणि हे साम्य !

विद्यार्थी, शिक्षक, परीक्षापद्धती वगैरे गोष्टींमध्ये जरी बरेच फरक आढळले तरी मूलतः जे साम्य आढळले त्याने अपरिमित आनंद वाटला.

विशेषत: शिकवायचा नेमलेला पोर्शन किंवा त्याची पातळी ही आपल्या तिकडच्यासारखीच वाटली ! प्रयोगशाळा जरी Ultra modern, well equiped असली तरी बेसिक थियरी तीच ! कुठेही गेले तरी न्यूटनचा नियम काही बदलेल का ?

तसेच शाळेतून कॉलेजात प्रथम आल्यावर त्या वातावरणात रुळेपर्यंत होणारी मुलांची धावपळ, गागरणे वगैरे गोष्टी इथेही अपवाद नाहीत. एखादे सबमिशन वेळेवर झाले नाही तर पडलेल्या चेहऱ्याने त्याचे कारण सांगणारी सिनसियर मुले सगळीकडे सारखीच !

एखादी क्लिष्ट थियरी शिकताना ती कळल्यावर होणारा आनंद पटकन चेहऱ्यावर दिसतो, मग तो विद्यार्थी कुठल्या देशातला, कुठली भाषा बोलणारा आहे, याला थोडेच महत्त्व राहाते ? एखादे नवे ॲपरॅटस् वापरताना असणारी उत्सुकता, होणारी धावपळ ही कुठेही गेले तरी सारखीच ! विद्यार्थ्यांच्या जातीवर, रंगावर ती थोडीच अवलंबून असते ?

हवामान, देश, परिस्थिती हे बाह्यत: वाटणारे सुभ जरी वेगवेगळे वाटले तरी बुद्धी, अंतर्मन, तारुण्याचा पीळ हा सर्वत्र एकच ! म्हणतात ना जगात कुठेही गेले तरी माणूस आनंदात हसतो नि दु:खात रडतो !

आणि ह्याडाच्या शिक्षकाला शिकवण्यातून मिळणारा आनंद, समाधान हे थोडेच समोर बसलेला विद्यार्थी उंच की बुटका, काळा की गोरा, मराठी की इंग्रजी बोलणारा यावर अवलंबून असते ? विषय समजल्याच्या आनंदात समोर बसलेल्या विद्यार्थ्यांचे लुकलुकणारे डोळे पाहूनच त्याला त्याच्या शिकवण्याचे चीज झालेले कळते ! मग ते एस. पी. त असो वा कुयाहोमात असो ! □


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

# महाडचा मुक्तिसंग्राम

लेखक : प्रा. रा. स. विवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

# गाझा ते गॅलिली

**लेखांक दुसरा । राजू पटवर्धन**



## आणि इस्त्राइलमध्येही ज्यू अल्पसंख्य ठरतील !

इजिप्त-इस्राइल शांतता-कराराला यंदाच्या मार्चमध्ये एक वर्ष पूर्ण झाले. त्यानिमित्त दोन्ही देशांत कराराच्या वाढदिवसाचे सोहाळे घोषित केले गेले. या सोहाळ्यांमध्ये फारसा उत्साह नव्हता. उलट 'पुढे काय होणार ?' अशी परस्पर-मिश्रित भीतीच व्यक्त होत होती. इस्राइलचे पहिले वकील इझालार हे इजिप्तमध्ये जाऊन पोहोचले, त्यानंतर आठ-दहा दिवस कोणीही वरिष्ठ इजिप्शियन अधिकारी त्यांना भेटायला आला नाही. 'मुस्लिम ब्रदरहूड' ही इजिप्शियन तरुणांची धार्मिक द्वेषावर पोसलेली संघटना इस्राइल-बरोबरच्या शांतता कराराविरुद्ध प्रचंड निदर्शन उभारीत आहे. इस्राइलबरोबर नव्याने आर्थिक हितसंबंध प्रस्थापित करू पाहणाऱ्या इजिप्शियन कारखानदारांना आणि व्यापाऱ्यांना समाजाने बहिष्कृत करावे असे 'ब्रदरहूड'चे म्हणणे आहे. इस्राइलमध्ये 'आम्हीच सगळे द्यायचे आणि कराराचा एक कागद तेवढा पदरात पाडून घ्यायचा' अशी निराशाग्रस्त वाक्ये ऐकू येऊ लागली आहेत.

म्हणजे अरब-इस्राइली संघर्षामध्ये अगदी अपूर्व गणल्या गेलेल्या इजिप्त-इस्रायल शांतताकराराने ही 'प्रगती' एका वर्षात केली आहे. ही प्रगती अपेक्षेपेक्षा कमी असली आणि भवितव्य स्पष्ट दिसत नसले, तरी या कराराचे ऐतिहासिक महत्त्व हे कधीही कमी होणार नाही, मग कितीही वेगवेगळ्या नजरांतून विविध पक्ष त्याकडे पाहोत.

१९६७ च्या सहा दिवसांच्या युद्धात इजिप्तचे अध्यक्ष नासर यांनी आपल्या कारकीर्दीची प्रतिष्ठा युद्धातल्या यशावर पणाला लावली होती. २२ मे १९६७ या दिवशी त्यांनी अकाबा व तिरान या दोन्ही सामुद्रधुन्या इस्राइली जहाजांना बंद केल्याचे जाहीर केले, म्हणजे इस्राइलची नाकेबंदी केली. २६ मेला 'इस्राइलचा पूर्ण नि:पात आम्ही करू' अशी घोषणा त्यांनी केली. ३० मे ला जॉर्डनचे राजे हुसेन- ज्यांचे आणि नासर यांचे साप आणि मुंगूस यांच्या-इतकेच सख्य होते - यांना नासर यांनी कैरोला यायला भाग पाडले आणि मैत्री व संरक्षणाचा करार केला. 'गाझा' मधून युनोच्या शांततादलाने नासर यांचा हुकूम येताच आपली पथके काढून घेऊन आपले 'शांतता-रक्षणाचे कर्तव्य' पार पाडले. (युनोच्या शांतता पथकांची ही कामगिरी हा जेरुसलेममध्ये चेष्टेचा विषय होतो तो याचमुळे.) सीरियाची सेना तयार होतीच. इराकच्या पलटणी सामील झाल्या.

अरबांनी इतकी सर्वंकष लष्करी व मानसिक तयारी करूनही इस्राइलचे सुप्रसिद्ध संरक्षणमंत्री मोशे दायान यांच्या नेतृत्वाखालील इस्राइलने सर्वच अरब राष्ट्रांचा ६ जून १९६७ पर्यंत दारुण पराभव केला. उदाहरणार्थ, केवळ २ तास ५० मिनिटांत इजिप्तच्या ३४० लढाऊ विमानांपैकी ३०० जमिनीवरच नष्ट केली. लागलीच २३ रडारकेंद्रे नष्ट केली. नंतर चार तासात सीरिया व जॉर्डन यांच्या विमानदलांचा नाश झाला. त्यानंतर एकूण सहा दिवसांत इस्राइली सेनेने संपूर्ण सिनाई द्वीपकल्प, गोलान हाइट्स्, जॉर्डनचा पश्चिम किनारा, पूर्व जेरुसलेम हे सर्व भूप्रदेश काबीज केले.

हा पराभव कदाचित आवश्यकतेपेक्षा जास्त प्रचंड झाला. कारण त्याचे परिणाम दूरगामी झाले. अध्यक्ष नासर यांना पराभव कबूल करायला सुद्धा शब्द नव्हते! एवढा धक्का त्यांना बसला. अरब सेना म्हणजे चर्चेचा व चेष्टेचा एक हास्यास्पद विषय बनल्या. अरब नेते म्हणजे वृथा वल्गनांचे उत्पादक अशा छद्मी उद्गारांनी पाश्चिमात्य वृत्तपत्रांनी अरबांची संभावना केली.

या सर्वांचा दुर्दैवी परिणाम असा घडला की, अरबांनी कधी नव्हे एवढी त्रिसूत्री नकारात्मक भूमिका इस्राइलबरोबर घेतली. ती म्हणजे १) इस्राइलला मान्यता नाही. २) इस्राइलबरोबर शांतता नाही आणि ३) इस्राइलबरोबर बोलणी नाहीत. नासर यांच्या नेतृत्वाखाली ऑगस्ट १९६७ मध्ये अरब नेत्यांच्या शिखर-परिषदेत ही घोषणा झाली. या नकारात्मक भूमिकेचा उगम १९६७ च्या पराभवात निर्माण झालेल्या अरब राष्ट्रांच्या न्यूनगंडाच्या व त्यातून निर्माण झालेल्या द्वेषाच्या भावनेत शोधला पाहिजे. इजिप्त सोडून सीरिया, इराक इत्यादी राष्ट्रे अजूनही इस्राइलबरोबर प्रत्यक्ष बोलणी करायला तयार नाहीत, याचे कारण हेच आहे. १९७७ मध्ये इजिप्तचे अध्यक्ष सादात ह्यांनी इस्राइलला जाऊन व पुढे इस्राइल-बरोबर प्रत्यक्ष बोलणी करण्याचे धैर्य दाखवले, याचे कारण १९७३ च्या युद्धात इजिप्शियन सैन्य १९६७ च्या मानाने फारच शौर्याने लढले. त्याने काही इस्राइली सैनिकांना युद्धकैदी म्हणून सुद्धा पकडले. ही एक ऐतिहासिक कलाटणीच म्हणायची. त्यामुळे जरी १९७३ मध्ये पुन्हा इजिप्तचा मोठा पराभव झाला, तरी इजिप्शियन सैनिक आणि नागरिक यांना वाटणारा न्यूनगंड नाहीसा झाला. बरोबरीने आपण इस्राइलशी वाटाघाटी करू शकू हा आत्मविश्वास सादात

यांच्यात निर्माण झाला.

१९६७ चा पराभव, त्यामधून निर्माण झालेली मानहानी व निर्माण झालेले लष्करातले व सरकारातले कूटप्रश्न यामुळे अध्यक्ष नासर यांची प्रकृती ढासळत गेली. १९७० मध्ये त्याचे निधन झाले. अमेरिकेने आस्वान धरणाला मदत देण्याचे नाकारल्यापासून रशियावर संपूर्ण अवलंबून राहून, इस्राइलविरुद्ध प्रचाराचा बेंडबाजा वाजता ठेवून आपली सत्ता गाजवणे, हे नासर याचे राज्यकारभाराचे गणित होते. ते त्याच्या निधनाने संपले !

नासर याच्यानंतर अन्वर सादात हे इजिप्तचे राष्ट्राध्यक्ष झाले. सादात आणि नासर याच्या विचारसरणीत आणि धोरणात जमीन-अस्मानाची तफावत होती. आपले समाजवादित्व सिद्ध करण्याची नासरसारखी त्याना गरज वाटली नाही. त्याचा ओढा प्रथमपासूनच अमेरिका व भांडवलशाही याच्याकडे अधिक. या विचारांना त्यांनी आपली कुशाग्र बुद्धी, कारस्थानी नजर आणि मुत्सद्देगिरी याची जोड देऊन इजिप्तच्या राजकारणावर आपला ठसा उमटवला.

अर्थात, नासर याचे व्यक्तिमत्त्व आणि व्यक्तित्व यांचा एवढा प्रचंड ठसा इजिप्त आणि अरब जनमानसावर होता की, पहिली काही वर्षे इस्राइलविषयक नासरांचीच नकारात्मक भूमिका चालू ठेवण्यावाचून सादातना गत्यंतर नव्हते. त्यातून, जवळजवळ पाकिस्तानप्रमाणेच, इजिप्तमध्ये नासर याच्या लष्करी हुकुमशाहीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेव आणि नोकरशाहीमध्ये लष्कराचे वर्चस्व एवढं जबरदस्त होते की, ते झुगारून देणे अशक्य होते. ( ते अजूनही सादात याना ग्रासतय्. ) यामुळे शक्यतो लष्कराला चुचकारून, काही वर्षे तरी नासराच्या प्रतिमेला धक्का न लावता, आपली स्वतंत्र विचारसरणी सिद्ध करीत करीत इस्राइलविरुद्धचा लढा त्यानी चालू ठेवला. इस्राइलविरुद्धचा लढा जो आता त्यानी १९७९ मध्ये शांतता-करार करून संपवला, तो सुरुवातीलाच का नाही संपवला असा प्रश्न पडेल. त्याचे उत्तर एवढेच आहे की, नासराच्या परराष्ट्रीय धोरणाचा हा गाभा सादातनाही सुरुवातीला उपयोगी पडला. इस्राइलचा बागुलबुवा सतत उभा केल्यामुळे राष्ट्रीय अर्थव्यवस्थेतील उणीवा, लाचलुचपत आणि स्वातंत्र्यावरची बंधने हे सर्व झाकले जात होते. याचा उपयोग स्थानिक विरोध दडपून लोकमत आपल्या बाजूला वळवण्याचा मोह सादातना आवरला नाही.

ही पार्श्वभूमी लक्षात घेतल्यावर त्याच्या ठळक हालचाली समजून येतील–

१) १९७१ मध्ये सादातानी जाहीर केले की, १९७१ साल म्हणजे निर्णायक वर्ष ठरेल ( Year of decision ) मात्र याचा अर्थ इस्राइलबरोबर युद्ध करणार की काही हिकमत लढवणार् हे त्यानी स्पष्ट केले नाही. हे साल तसेच गेले. मग लागलीच त्यांनी १९७२ हे ' अटळ युद्धाचे वर्ष ' म्हणून घोषित केले, पुन्हा १९७२ मध्येही काही घडले नाही ! सगळ्याना वाटायला लागले की ही नासरयुगाची पुनरावृत्ती होते आहे. पोकळ घोषणा देणारा नेता म्हणून सादात याचे वर्णन इस्राइलमध्येही होऊ लागले. अर्थात ह्या कृतिशून्य नेत्याच्या प्रतिमेचा उपयोग सादातना १९७३ च्या युद्धात झाला. कारण तेव्हा सादात यांनी एप्रिल १९७३ मध्ये दिलेल्या युद्ध सुरू करण्याच्या सूचक धमक्याकडे इस्राइलने दुर्लक्ष केले. ज्या ६-१० ७० रोजी इजिप्तने हल्ला केला, त्या दिवशी इस्राइली सैन्य पूर्ण गाफील होते !

(२) १९७२ मध्ये सादात यांनी जवळजवळ २०००० रशियन लष्करी सल्लागारांना हाकलून दिले. या त्याच्या कृतीमुळे जग आश्चर्यचकित झाले. अमेरिकेला असे वाटले की, रशियन सल्लागाराशिवाय इजिप्त इस्रायलबरोबर काही युद्ध करणार नाही, तेवढी त्याची कुवतच नाही. पुन्हा रशियनाना हाकलून देणारा सादात हा ' आपला माणूस आहे असे अमेरिकेला वाटावे व अमेरिकन लष्करी आणि आर्थिक मदत इजिप्तला चालू व्हावी असा त्याचा अंतःस्थ हेतू साध्य झाला.

रशियन सल्लागाराना परत पाठवण्यात आणखी एक कारण असे होते, की, निक्सन-ब्रेझनेव्ह यांची आंतरराष्ट्रीय सामंजस्य निर्माण करण्याची (डेटाट) धडपड चालू असल्याने ब्रेझनेव्ह यांना आता मध्यपूर्वेत काही ' कटकट ' नको होती. त्यामुळे त्याचे सल्लागार सादातना सारखा सल्ला देत होते की, तुमचे इजिप्शियन सैन्य इस्राइलशी मुकाबला करण्याच्या लायकीचे ' अजून ' नाही, तेव्हा तुम्ही लढाईच्या भानगडीत पडू नका ! म्हणजे रशियनाचे अस्तित्व हे सादातना दडपण वाटू लागले. ते नाहीसे झाल्यामुळे १९७३ पासून सादात स्वतंत्र कृती करण्यास मोकळे झाले.

(३) रशियनाचा आपल्यावर काहीच प्रभाव नाही हे इतके जाहीर ठसवून सादात यांनी कट्टर कम्युनिस्टविरोधी सौदी अरेबियाचे राजे फैजल आणि त्याचा पैसा याना जवळ केले. फैजल यानी इजिप्तला प्रतिवर्षी ४० कोटी डॉलर्स शस्त्रासाठी मदत म्हणून देऊ केले, शिवाय ५० कोटी डॉलर्सचे कर्ज ' मिराज ' विमान खरीदण्यासाठी दिले.

(४) लिबियाचा महत्त्वाकांक्षी व तडफदार नेता मुआमर गडाफी याला सादात यानी चार हात दूर ठेवले. गडाफी हे स्वतःला कडवा समजणारा मनुष्य. धर्मांधपणा व सनातनीपणा हे त्याच्या हाडींमासी खिळलेले. जहरी इस्राइलद्वेष व या गुणधर्मात सादात कमी आहेत असे समजून त्यांचा द्वेष गडाफीचा आणखी एक पैलू आहे.

## गडाफीची महत्त्वाकांक्षा

सादात अधिकारावर येतांच गडाफीनं त्याना ' आळशी ' बूर्झ्वा ' वगैरे विशेषणे वापरली आणि उघडच म्हटलेन् ' इजिप्त हा नेत्याविना देश आहे आणि मी देशाविना नेता आहे. ' याचा परिपाक म्हणजे गडाफीने सादातना लकडा लावला की, इजिप्त व लिबिया याचे एकत्रीकरण करावे. सप्टेंबर १९७३ ला सुरुवातीला कोणतीही पूर्वसूचना न देता गडाफी कैरोला आला. सादातना पुरेपूर माहीत होते की, इजिप्त-लिबिया याचा सामीलनामा म्हणजे गडाफीच्या हातात सर्व सत्ता देणे; पण सादात गडाफीला पूर्ण दुखवू शकत नव्हते. कारण जवळजवळ दीड लाख इजिप्शियन कामगार लिबियात कामावर आहेत. त्याना गडाफी कधीही हाकलून देऊ शकत होता. म्हणून सादात यानी गडाफीबरोबर एक मोघम जाहीरनामा काढून त्याच्यावर सही केली आणि गडाफीला तात्पुरते गप्प बसवले. जाहीरनाम्यात एवढेच म्हटले होते की, एका नव्या एकत्रित अरब राष्ट्राचा जन्म होतो आहे

गडाफीविषयी दाखवलेला अविश्वास सादातना उपयोगी पडला. कारण सादातना सतत इस्राइलबरोबर युद्ध करायला प्रवृत्त करणाऱ्या गडाफीने १९७३ च्या युद्धात (जे ऑक्टोबरमध्ये झाले) इजिप्तला काडीचीही मदत केली नाही. गडाफीची महत्त्वाकांक्षा नासरप्रमाणे इजिप्तपासून पाकिस्तानपर्यंत एक 'पॅन-मुस्लिम ब्लॉक' निर्माण करण्याची होती; (अजूनही आहे!) या ब्लॉकचे पुढारीपण अर्थातच खुद्द गडाफीच करणार. हे सर्व माहीत असल्यामुळे गडाफीला दूर ठेवणे हे सादातना महत्त्वाचे होते.

(४) इस्राइलमध्ये ज्यूंना 'यॉम किप्पूर' हा सण चालू असताना, सर्व इस्राइली सैन्य गाफील असताना ६ ऑक्टोबर १९७३ रोजी सादात यांनी सीरियाच्या मदतीने इस्राइलवर प्रचंड हल्ला चढवला. इजिप्शियन सैन्य सुएझ कालवा ओलांडून गेले, तर सीरियाने गोलान हाइट्सवर मुसंडी मारली.

ह्या युद्धात खूप गोष्टी इजिप्त आणि सादात ह्यांच्या बाजूच्या होत्या. (१) १९६७ च्या युद्धाने झालेले सर्व नुकसान भरून काढून इजिप्त व सीरिया यांनी आपल्या सेना अद्ययावत शस्त्रांनी सुसज्ज केल्या होत्या. (२) इस्राइली सैन्य गाफील होते. आश्चर्याच्या धक्क्याचा फायदा इजिप्शियन सैन्याला पुरेपूर मिळाला. (३) इस्राइलीविरुद्ध अरबाचे संख्याधिक्य १२ : १ असे जबरदस्त होते. (४) इजिप्शियन सैन्य १९६७ चा कलंक *पुसण्याच्या निश्चयाने युद्धात* उतरले होते. नासर यांच्या मृत्यूनंतर लष्करातील बढत्या, मानमरातब या गोष्टीत काहीही ढवळाढवळ न करण्याचे धोरण सादात यांनी अवलंबिले होते, यामुळे लष्करातला असंतोष निघून गेला होता. इजिप्शियन सैन्य अत्यंत शिस्तीत लढले. (५) इजिप्तकडे रशियाने दिलेली SAM–6 ही अत्याधुनिक क्षेपणास्त्रे होती. त्यांनी इस्राइलची जवळजवळ १०० विमाने पाडली.

इतक्या गोष्टी अनुकूल असूनही इस्राइलने अरबांचा पुनश्च मोठा पराभव केला. किंबहुना युनोने युद्धबंदी पुकारली नसती तर सादाताची 'तिसरी सेना' पूर्ण गारद होत होती. एक वेळ अशी होती की, इस्राइली सेना आणि कैरो याच्यामध्ये फक्त ४७ इजिप्शियन रणगाडे होते!

मात्र एवढे झाले की, इस्राइलला १९६७ च्या मानाने १९७३ च्या युद्धात फार प्रचंड किंमत मोजावी लागली. इजिप्शियन सैन्य शौर्याने लढल्यामुळे हे घडू शकले. इस्राइलची १०० विमाने नष्ट झाली आणि २५०० सैनिक मृत्युमुखी पडले. इजिप्तचे जवळजवळ चौपट सैनिक कामी आले तरी अवघ्या ३६ लाख लोकसंख्येच्या इस्राइलला २५०० मृत्यूचा फटका जास्त झोंबला. इस्राइलचे नुकसान जबरदस्त झाले. युद्धकैदी इजिप्तने पकडले. पहिले तीन दिवस तरी इस्राइली सेना पळ काढत होती–या सगळ्या घटनांमुळे इजिप्शियन सेनेचा व लोकांचा हरवलेला आत्मविश्वास त्यांना परत सापडला, तोच सादात यांच्यात प्रतिबिंबित झाला!

या युद्धावरून सादात यांनी महत्त्वाचे निष्कर्ष काढले.

(१) अरबाचा इस्राइलबरोबर लढताना भोवणारा न्यूनगंड आता नाहीसा झाला आहे. १९४८, १९५६, १९६७ आणि १९७३ च्या युद्धात इजिप्शियन सैन्याची प्रतिष्ठा आणि शक्ती प्रस्थापित झाली आहे. इस्राइलबरोबर समोरासमोर बरोबरीच्या पार्श्वभूमीवर बोलणी करण्याइतके मनोधैर्य इजिप्शियनांमध्ये आता आले आहे.

(२) सर्व गोष्टी अनुकूल असूनही आपण इस्राइलचा पराभव करू शकत नाही, तर मग आपले १९६७ च्या युद्धात गमावलेले भूप्रदेश परत मिळविण्यासाठी युद्ध हा मार्ग मुळातच चुकीचा आहे. युद्धाचा मार्ग सोडून दिल्यावर उरला एकच मार्ग; तो म्हणजे वाटाघाटीचा. या मार्गाला अडचण होती ती त्रिसूत्री नकाराची. हे नकार सोडून देण्याचा चंग हे युद्ध संपता–संपताच सादात यांनी बांधला असावा.

युद्धबंदी जाहीर होताच प्रथमच इजिप्शियन व इस्राइली सेनाधिकारी समोरासमोर बसले. त्यांनी हस्तांदोलन केले आणि युद्धबंदीचा तपशील मुक्रर केला. लगोलग अमेरिका आणि सोव्हिएट युनियन यांनी झपाट्याने २१ डिसेंबर १९७३ रोजी जिनिव्हाला शांतता परिषद भरवली. या परिषदेने स्पृहणीय यश मिळवले. इस्राइल व इजिप्त यांच्या सेना अलग करण्याबद्दल समझोता झाला. सीरियाने मात्र जिनिव्हाला आपले प्रतिनिधी पाठवले नाहीत. इस्राइलबरोबर बसायचे कसे!–छे अब्रह्मण्यम!

## किसिंजरचे आगमन

या वेळी मध्यपूर्वेच्या राजकारणात एक नवीन वैयक्तिक स्पर्श जाणवू लागला–तो म्हणजे अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री हेन्री किसिंजर यांचं मिस्किल, खट्याळ कुशाग्र व्यक्तिमत्त्व! किसिंजर हे राजकीय विचारात कदाचित् प्रतिगामी असतील. 'छोट्या'पेक्षा 'बड्यां'चे प्रेम त्यांना जास्त असेल. भारत–पाकिस्तानसारख्या कूटप्रश्नात त्यांनी विकृत विचारसरणी दाखवली असेल; मात्र एवढे खरे की, मध्यपूर्वेत त्यांना आमिष दाखवून म्हणा; शब्दांची फिरवाफिरव करून म्हणा; धाकदपटशा दाखवून म्हणा; पण अनेक असाध्य गोष्टी स्वतःच्या व्यक्तिमत्त्वाचा ठसा उमटवून साध्य करून दाखवल्या.

प्रथम किसिंजर यांनी जेरुसलेम–दमास्कस–कैरो अशा असंख्य वाऱ्या करून सीरियाबरोबरही ३१ मे १९७४ पर्यंत सैन्यविभागणीचा समझोता गोलान हाइट्सबद्दल घडवून आणला.

दुसरे म्हणजे ४ सप्टेंबर १९७५ ला जिनिव्हाला इजिप्त–इस्राइल यांचा दुसरा समझोता झाला. तो फलद्रूप करण्यासाठी परत किसिंजरनाच कैरो–जेरुसलेमला वारंवार जावे लागले.

या समझोत्यात इस्राइलने सिनाईचा काही प्रदेश सोडून दिला. इजिप्तच्या तेलखाणी परत केल्या. सादातनी सुएझ कालवा चालू केला, यामुळे इजिप्तचे उत्पन्न सुरू झाले.'

हे सर्व झाले, तरी मूलभूत संघर्ष संपलेला नव्हताच. सप्टेंबर १९७५ नंतर परत 'जैसे थे' परिस्थिती सुरू झाली. सप्टेंबर ७५ च्या समझोत्यात, इजिप्तने दिलेल्या राजकीय स्वरूपाच्या सवलतीच्या बदल्यात, इस्राइलने व्याप्तप्रदेश सोडायचा हे एक तत्त्व प्रस्थापित झाले.

आता यापुढे प्रश्न असा होता की, इस्राइलने अरबांचा आणखी प्रदेश सोडला, तर अरब राजकीय परतफेड कशी करणार?–ही परतफेड आता एकच म्हणजे इस्राइलला मान्यता देणे. हे करणे म्हणजे संघर्षच संपवणे! हे तर अजूनही अशक्यच दिसत होते.

अशा वातावरणात आपल्या अनपेक्षित व चमत्कृतिपूर्ण हाल-

चालीपैकी एक सादात यांनी ९ नोव्हेंबर १९७७ रोजी केली आणि जगाला स्तंभित करून सोडले. रेडिओवरून इजिप्शियन जनतेला उद्देशून त्यानी जाहीर केले, 'इस्राइलबरोबर शांतता प्रस्थापित करण्यासाठी जगाच्या अंतापर्यंत कुठेही जायला मी तयार आहे—अगदी इस्राइलच्या क्नेसेट (लोकसभा) पर्यंतसुद्धा!'

या ऐतिहासिक घोषणेला इस्राइलचे पंतप्रधान मेनाखेम बेगीन यांनी तावडतोब होकारात्मक प्रतिसाद दिला. १९ नोव्हेंबर १९७७ रोजी अध्यक्ष सादात जेरुसलेमला येऊन दाखल झाले! इस्राइली लोकसभेपुढे त्याचे भाषण झाले. बेगीन–सादात भेट म्हणजे एक अद्‌भुतरम्य घटना वाटावी अशीच होती आणि ती गाजलीही! मुख्य सुपरिणाम हा झाला की, अरब–इस्राइली संबंधातला सर्वात महत्त्वाचा मानसिक पूर्वग्रहाचा अडसर बाजूला झाला. ही नुसती सुरुवात होती. पुढे बेगीन–सादात यांच्या अनेक भेटीत काहीच निष्पन्न होईना. तेव्हा अमेरिकेचे अध्यक्ष जिमी कार्टर यानी पुढाकार घेऊन बेगीन आणि सादात या दोघाना अमेरिकेत कँप डेव्हिड येथे पाचारण केले. कार्टर यांच्या अहोरात्र प्रयत्नानंतर आणि मध्यस्थीतून सप्टेंबर १९७८ मध्ये 'कँप डेव्हिड समझोता' निर्माण झाला. त्याचेच पुढे मार्च १९७९ मध्ये इजिप्त–इस्राइली शांतता–करारात रूपातर झाले.

या कराराचे स्वागत इजिप्त–इस्राइल दोन्ही देशात भरपूर झाले. या कराराची प्रमुख कलमे अशी आहेत—

(१) इजिप्त व इस्राइलने एकमेकांविरुद्ध लष्करी बळाचा वापर करावयाचा नाही. इस्राइलवर इतर कोणत्या देशाने (उदा.सीरिया!) हल्ला केला तर इजिप्तने इस्राइलविरुद्ध युद्धात उतरायचे नाही.

(२) इस्राइलने इजिप्तचा व्यापलेला सिनाई प्रदेश १९८२ पर्यंत संपूर्ण परत करायचा. (गाझा पट्टीचा निर्णय मात्र ५ वर्षांनी होईल).

(३) गाझा पट्टी व जॉर्डनचा पश्चिम किनारा (जिथे जास्तीत जास्त पॅलेस्टिनी अरब राहतात) या दोन प्रदेशात अरबांना 'संपूर्ण' स्वायत्तता द्यायची. ही कोणत्या स्वरूपाची असेल, ते स्वरूप २६–५–१९८० पर्यंत इजिप्त व इस्राइल यानी वाटाघाटी करून ठरवायचे. (पाच वर्षांनी या प्रदेशाचा अंतिम निर्णय होईल.)

(४) इस्राइलने इजिप्तच्या तेलखाणी परत केल्यामुळे इस्राइलला तेलाचा पुरवठा बंद झाला. तो खंडित होऊ नये, म्हणून इजिप्तने आपले सर्व तेलाचे उत्पादन इस्राइलला विकले पाहिजे. आणखी म्हणजे इस्राइलला सतत तेल–पुरवठा होईल याची हमी अमेरिकेने दिली आहे. (इस्राइलला तेलपुरवठा मुख्यतः इराणचे शहा करीत असत. खोमेनी हे कट्टर इस्राइलविरोधी असल्यामुळे इराणचा मार्ग संपल्यातच जमा आहे.)

(५) इजिप्त–इस्राइल यांनी एकमेकांशी सांस्कृतिक, व्यावसायिक, संस्थात्मक, व्यक्तिगत, औपचारिक–अनौपचारिक असे सर्व संबंध जोडून ते दृढ करायचे.

(६) इजिप्तने इस्राइलला संपूर्ण राजनैतिक मान्यता द्यायची. परस्परांनी आपापल्या वकिलाती एकमेकाच्या राजधानीत उघडायच्या.

*या कलमांपैकी क्र १, ४, ५ आणि ६ ही कलमे संपूर्ण कार्यान्वित* झालेली आहेत. इस्राइलची वकिलात कैरोमध्ये आणि इजिप्तची वकिलात तेल आविव्हमध्ये सुरू झाली आहे. दोन्ही देशांत नियमित विमान–उड्डाणे सुरू झाली आहेत. इस्राइल–इजिप्त याच्या सीमा खुल्या झाल्या आहेत. त्यामुळे दोन्ही देशांत येणाऱ्या परदेशी पर्यटकांना एकमेकांच्या देशात मुक्तद्वार निर्माण झाले आहे. त्याच्यामुळे दोन्ही देशाना प्रचंड प्रमाणात परकीय चलन मिळू लागले आहे.

कलम क्रमांक २ ची–इस्राइलने सिनाई परत करणे–वाटचाल धीमी, पण ठरल्या वेळापत्रकाप्रमाणे सुरू आहे. १९८२ पर्यंत इजिप्तकडे सर्व सिनाई प्रदेश परत जाईल.

## स्वायत्तता–दोन अर्थ

वरवर पाहता सर्व समाधानकारक आहे!–पण ज्यामध्ये ह्या कराराची कसोटी लागणार आहे ते एकच कलम आहे क्र. ३ चे. हे कलम म्हणजे जॉर्डनचा पश्चिम किनारा आणि गाझा पट्टी या दोन्ही प्रदेशातल्या पॅलेस्टिनी अरबांना स्वायत्तता देण्याचे. इतर कलमांबद्दलही मोठाले मतभेद होऊ शकतील; मात्र ते कसे ना कसे सुटतील. स्वायत्ततेच्याबाबत मात्र सर्वच अनिश्चित आहे; २६–५–१९८० ही 'अंतिम' तारीख वाटाघाटीत काहीही प्रगती न होता उलटून गेली आहे.

'पॅलेस्टिनी अरबांना संपूर्ण स्वायत्तता' या शब्दसमूहाचा अर्थ इजिप्त आणि इस्राइल आपापल्या हितसंबंधाना पोषक असा लावीत आहेत हे प्रगती न होण्यामागचे मुख्य कारण आहे.

इजिप्त स्वायत्ततेचा असा अर्थ लावीत आहे की, स्थानिक पॅलेस्टिनी स्वायत्ततेमधून आपली विधानसभा निवडतील. राज्याला स्थैर्य आले की त्यातून शांतता निर्माण होईल, सुबत्ता पसरू लागेल. मग या पॅलेस्टिनीना पी. एल्. ओ. च्या या अतिरेकी वीरांबद्दलचे आणि यासर अराफात याच्याबद्दल आकर्षण कमी होईल. सुबत्ता आल्यावर सत्तेचा लोभ सुटेल. विधानसभेचे रूपांतर हळूहळू प्रातिनिधिक लोकसभेत होईल ही लोकसभा आपले नेते निवडून हळूहळू संरक्षणासकट सर्व जबाबदाऱ्या साभाळू लागतील. कदाचित पाच वर्षात यामधून स्वतंत्र आणि सार्वभौम पॅलेस्टिनी राष्ट्र निर्माण होईल! निर्मितीचे श्रेय सादात याना मिळेल.

इस्राइल लावत असलेला अर्थ याच्या अगदी उलट आहे. इस्राइलच्या मते इस्राइली सेना प्रचंड सुरक्षा–छत्राखाली असताना व इस्राइलच्या सार्वभौमत्वामुळे येणाऱ्या सुबत्तेमुळे व शांततेमुळे अल्पसंतुष्ट स्थानिक पॅलेस्टिनी अरबाना सैन्य, संरक्षण, परराष्ट्रसंबंध इत्यादीत काहीच रस वाटणार नाही! दहशतवादी पी. एल्. ओचा ते धिक्कार करतील आणि इस्राइलनं दिलेल्या मर्यादित स्वायत्ततेत स्थानिक सरकार, शिक्षण, दळणवळण, उद्योगधंदे, ड्रेनेज अशा बाबीवर आपले लक्ष केंद्रित करतील. म्हणजे इस्राइली तैनाती फौजा ठेवून हे पॅलेस्टिनी राष्ट्र इस्राइलचे अंकित राष्ट्र होईल! खुद्द इस्राइलमध्ये ३६ लाख पूर्ण लोकसंख्येपैकी जवळजवळ ६ लाख अरब आहेत–त्यापैकी जवळजवळ ५ लाख मुस्लिम व उरलेले अरब ख्रिश्चन आहेत. इतके ६ लाख अरब आज इस्राइली नागरिक म्हणून राहतातच आहेत, मग जॉर्डनच्या पश्चिम किनाऱ्यावरचे आणखी १० लाखही कदाचित इस्राइलच्या तैनातीत राहायला काय हरकत आहे?

आता प्रश्न असा पडतो की, इजिप्त व इस्राइल यांच्या पश्चिम किनाऱ्यावरच्या पॅलेस्टिनींबद्दल इतके दूरगामी मतभेद आहेत, तर शांतता कराराची इतर कलमे पूर्ण करून काय उपयोग? कधी ना कधी पॅलेस्टिनी प्रश्नावर मतभेद ठरलेलेच आहेत. याबद्दलची सद्यः-परिस्थिती इस्राइलचे माजी परराष्ट्रमंत्री श्री. आबा एबान यांनी यथार्थ कथन केली आहे. ते म्हणतात, 'आज इजिप्त–इस्राइल दोघांना माहीत आहे की, अमुक एक अंतर चालून गेल्यानंतर आपले भांडण होणारच आहे; मग तिथपर्यंत दोघांनी एकत्र चालायला काय हरकत आहे?' या परिस्थितीला कारणीभूत इस्राइलचे पंतप्रधान बेगीन हेच आहेत. कारण त्यांनी शांतता–करारात पॅलेस्टिनींच्या 'संपूर्ण स्वायत्ततेला' (Full autonomy) मान्यता दिली आहे. आता संपूर्ण स्वायत्तता आणि स्वातंत्र्य यांच्यात फरक करून स्वायत्ततेचा एकांगी अर्थ लावण्याचा त्यांचा फोल प्रयत्न चालू आहे.

२६ मे १९८० पर्यंत वाटाघाटीत प्रगती शून्य!

पी. एल्. ओ, सीरिया, अल्जेरिया, जॉर्डन इत्यादी अरब देशांनी इजिप्त–इस्राइल शांतता–कराराविरुद्ध 'नकारात्मक आघाडी' (Rejectionist Front) उघडली आहे. इजिप्तने अरब एकता (जी होती की नाही कुणाला माहीत?) मोडली व इस्त्राइलबरोबर वेगळा करार केला, म्हणून ही राष्ट्रे इजिप्तवर आग पाखडून आहेत. सौदी अरेबिया, लिबिया यांनी इजिप्तची मदत बंद केली आहे. इजिप्त अरब जगतात सकृद्दर्शनी तर एकटा पडला आहे. सुदान व ट्युनिशिया हे दोनच इजिप्तचे अरब जगतातले मित्र शिल्लक आहेत. त्यांचा अरब–इस्राइल लढ्याशी इतका जवळचा संबंध नाही.

या सर्व पार्श्वभूमीवरून पुढील दोन वर्षांतील घटनांचा अंदाज बांधता येईल–


(१) इतर अरब देशांनी इजिप्तला वाळीत टाकले असल्याची पर्वा सादात करणार नाहीत. कारण इस्राइलकडून आपला मुलूख परत मिळविण्याची किमया त्यांनी करून दाखविली असल्यामुळे जी किमया सीरिया व जॉर्डनला कधीच जमली नाही. त्यांचे अंतर्गत आसन स्थिर आहे. पुन्हा त्यांना माहीत आहे की, जोपर्यंत इजिप्त (सर्वांत मोठा अरब देश) इस्राइलशी युद्ध करीत नाही, तोपर्यंत इतर कोणतेही अरब राष्ट्र एकटयाने इस्राइलशी लढू शकणार नाही.

पश्चिम किनाऱ्यावरील पॅलेस्टिनींच्या 'स्वायत्त' सरकारबद्दल काहीही प्रगती झाली नाही, तर सादात अमेरिकेकडून इस्राइलवर-जास्त दबाव आणू शकतील. १९८१ मध्ये नवे राष्ट्राध्यक्ष अधिकारारूढ झाल्यावर ते इस्राइलवर दबाव आणतील.

(२) युरोपियन देश पी. एल्. ओ. ला मान्यता देऊ लागलेच आहेत; उदा. ऑस्ट्रिया, फ्रान्स, इंग्लंड व जर्मनी इजिप्त व इस्राइल-मधील स्वायत्तता-बोलणी फिसकटल्याचा दाखला देऊन हे देश अमेरिकेच्या मदतीने पी. एल. ओ. नेतृत्वाखाली सार्वभौम पॅलेस्टिनी राष्ट्र जॉर्डनच्या पश्चिम किनाऱ्यावर स्थापन करून ते इस्राइलवर लादण्याचा प्रयत्न होईल.

(३) पॅलेस्टिनी राष्ट्र सध्याचे इस्राइलमधले बेगीन सरकार कधीच कबूल करणार नाही. प्रसंगी बेगीन सरकार राजीनामा देईल. त्याची जागा जास्त मवाळ भूमिकेचे मजूर सरकार घेईल. आबा

अरब राष्ट्रांनी वेढलेला देश – इस्राइल




एबान व मोशे दायान हे दोघेही मवाळ गटातले समजले जातात. त्यांचे सरकार बहुतकरून पॅलेस्टिनी राष्ट्राला–दुसरा तरणोपायच उरला नाही, म्हणून–मान्यता देईल.

(५) सोव्हिएट रशियासह सर्व बडी राष्ट्रे इस्राइलच्या संरक्षणाची ग्वाही देतील. इस्राइल व इजिप्त दोन्ही अमेरिकेला लष्करी तळ उभारू देतील,

(६) या घडामोडी इस्राइलला रुचणार नाहीत. मात्र इस्राइलला त्या स्वीकाराव्याच लागतील.

## हेब्रान यामिट

याउलट स्वायत्ततविषयक बोलणी यशस्वी झाली ही शक्यता अगदी कमी दिसते–तर पी. एल. ओ, सीरिया, इराक, अल्जेरिया इत्यादी 'कडवी' अरब राष्ट्रे निष्प्रभ होतील. इजिप्त व इस्राइलचे

स्थान उंचावेल व युरोपियन राष्ट्रे पी. एल. ओ. चे सरकार आणण्याऐवजी इजिप्त–इस्राइलप्रणीत स्थानिक अरब सरकारला प्राधान्य देतील. हे इस्राइलचे यश समजावे लागेल.

मात्र ही *स्वायत्ततविषयक* बोलणी यशस्वी बोलणी करण्याची मनापासून इच्छा बेगीन सरकारला आहे असे दिसत नाही. आतापर्यंत आलेल्या उल्लेखाप्रमाणे ही अनिच्छा काही प्रमाणात रास्त आहे. पी. एल. ओ. चे हिंसक मार्ग, दहशतवादी कृत्ये आणि ज्यू-द्वेष हा इतिहास अगदी ताजा आहे. पण अशी ताठर भूमिका यापुढे किती वर्षे इस्राइल घेऊ शकेल हा खरा प्रश्न आहे. यामुळे दोन वर्षांत पी. एल. ओ. चे सरकार येण्याची शक्यता जास्त वाटते. ही शक्यता अप्रिय वाटत असेल, तर स्थानिक अरब नेत्यांना इस्राइलला विश्वासात घ्यावे लागेल आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे पश्चिम किनाऱ्यावर ज्यूंच्या वसाहती नव्याने निर्माण करण्याचा हेका इस्राइलला सोडावा लागेल!

हेब्रॉनचेच उदाहरण घेऊ. हे शहर जॉर्डनच्या पश्चिमेला आहे. १९६७ आधी जॉर्डनकडेच होते. इथला स्थानिक महापौर हा मवाळ विचारसरणीचा व इस्राइलविषयी सहानुभूती असलेला होता. त्याच्या रास्त विरोधाला न जुमानता बेगीन सरकारने ज्यूंच्या दहशतवादी संघटनेचे आहारी जाऊन हेब्रॉनमध्ये ज्यूंच्या वसाहती चालू करायला परवानगी दिली. या वसाहतीमुळे ज्यूचे आपल्या भूमीवर आक्रमण होत आहे ही भावना पॅलेस्टिनी अरबाच्या मनात जास्तच दृढ होत जाते. जिथे नव्हते, तिथे धार्मिक संघर्ष निर्माण होतात. या वसाहतींवर इस्राइल सरकार अफाट खर्च करीत आहे. अशा वसाहतीमागे लागून पश्चिम किनाऱ्यावरची जवळजवळ ३० टक्के जमीन इस्राइलने विकत तरी घेतली आहे किंवा जप्त तरी केली आहे!

गाझा पट्टीजवळच 'यामिट्' शहर ही अशीच इस्राइलने वसविलेली एक वसाहत. येथे आम्ही गेलो, तेव्हा तिथल्या रहिवाशांना नुकतेच समजलेले होते की, इजिप्तबरोबरच्या शांततांकराराप्रमाणे यामिट शहर संपूर्ण इजिप्तला परत जाणार आहे. तिथला 'ताल' नावाचा पन्नास वर्षांचा एक मनुष्य आमच्याशी मोकळेपणाने बोलला त्याच्या घरासाठी त्याने इस्राइल सरकारला २० लक्ष इस्राइली पौंड (सुमारे ४ लाख रुपये) मोजले आहेत. दहा वर्षे तो 'यामिट' मध्ये स्थिरावला होता. अक्षरशः वाळवंटातून निर्माण केलेले कोट्यवधि डॉलर्स खर्च करून वसवलेले हे शहर. अशी कित्येक इस्राइलने वसवली. त्यावर किती खर्च केला ते देवच जाणे! पुन्हा ही शहरे सोडावी लागतील, अशी पुसटशी कल्पनासुद्धा रहिवाशांना नव्हती. आता 'ताल' ला नुकसानभरपाई मिळेल, पर्यायी जागा मिळेल, पण त्याचा असंतोष कमी होणार नाही. काही ठिकाणी जागा मोकळ्या करण्यासाठी 'ताल' सारख्या रहिवाशांना इस्राइली सैनिकांनी बुकललं, तेव्हाच ते बाहेर पडले!

या वसाहतीचे वेड बेगीन सरकार गेल्याशिवाय कमी होण्याची शक्यता कमीच आहे. हेब्रानच्या महापौराने थोडा विरोध दाखवताच बेगीन सरकारने त्याला हद्दपार केले. प्रश्न हा आहे की, अशी ताठर भूमिका किती वर्षे चालेल? अरब तरी मानतील का आणि जग तरी मानेल का?

या वसाहतीशी निगडित असलेला आणि भावनात्मकदृष्ट्या अत्यंत नाजूक असलेला प्रश्न म्हणजे जेरुसलेमचा आहे. १९६७ च्या आधी पश्चिम जेरुसलेम इस्राइलकडे आणि पूर्व जेरुसलेम जॉर्डनकडे होते. इस्त्राइलने पूर्वभाग जिंकून दोन्ही भागाचे एकत्रीकरण केले आणि संपूर्ण जेरुसलेम ही इस्राइलची राजधानी म्हणून घोषित झाली. जेरुसलेमचे विभाजन कालत्रयी होऊ द्यायचे नाही हा इस्राइलचा निश्चय जगातली कुठलीही शक्ती मागे घेऊ शकत नाही. त्यातून पूर्वभागात इस्राइलने जवळजवळ ५५००० ज्यू लोकांच्या नव्या वस्त्या उभ्या केल्या आहेत. हेतू हा की, जेरुसलेम पूर्ण सुरक्षित व्हावे. ज्यूंच्या दृष्टीने जेरुसलेमला परत जाणे हे जणू मोक्ष मिळाल्याचेच लक्षण! त्यामुळे पूर्वभाग परत करणे म्हणजे प्रत्येक इस्राइलीचे दोन तुकडे करणे असेच ज्यू लोक समजतात. उलट अल् अक्सा मशीद, सुवर्णमदिर ह्या मुस्लिमांच्या पवित्र गोष्टी जेरुसलेममध्ये असल्यामुळे पी. एल. ओ. राष्ट्र किंवा अरबाचे 'स्वायत्त' राष्ट्र याची राजधानी जेरुसलेमच पाहिजे असा त्यांचा आग्रह राहणार. इजिप्तने शांतता–कराराच्या अंमलबजावणीत जेरुसलेमबद्दल अत्यंत विचित्र भूमिका घेतली आहे. इजिप्तने जाहीर केले आहे की, आम्ही जेरुसलेम ही इस्राइलची राजधानी म्हणून मानणार नाही! म्हणून त्यांनी वकिलात तेल अव्हिव्हला उघडली. म्हणजे इस्राइलला मान्यता पण राजधानीला नाही!

यामधून एक मार्ग आहे, तो म्हणजे जेरुसलेमचे विभाजन न करता इस्राइल व 'पॅलेस्टाइन' (?) सरकार दोन्हींची ती राजधानी करून शहराला आंतरराष्ट्रीय दर्जा द्यायचा. अर्थात् या घटनेप्रत यायला 'स्वायत्ततेचे' रूपांतर 'राष्ट्रात' होणार की 'विधानसभेत' होणार की रक्तपातामध्ये होणार या प्रश्नाचे उत्तर द्यावे लागेल. विधायक मार्ग काढायचा, तर इस्राइलला ताठर भूमिका सोडावीच लागेल. याला प्रतिसाद म्हणून पी. एल्. ओ. चे नेते बंदुका खाली ठेवून ज्यूबरोबर प्रेमाने राहायला तयार होतील का, हा प्रश्न सर्वांना निरुत्तर करणारा आहे.

आज पी. एल्. ओ. चे नेते उघडपणे म्हणतात, 'आज इस्राइलमध्ये ३० लाख ज्यू आणि ५॥ लाख अरब मुस्लिम आहेत. ५० वर्षांनी 'सुशिक्षित' आणि पुढारलेल्या ज्यूंची लोकसंख्या फारफार तर ४० लाख होईल. आमची मात्र ५॥ लाखाची. तेव्हा ५० लाख होईल. If they do not accept us, Time is running out for the Jewish State.'

(क्रमशः)

# पुस्तके

अजय आरोसकर

## कविता दशकाची
## 'तुटलेल्या' कवींची प्रामाणिक अभिव्यक्ती

दशकाची कविता. पाच संपादकांनी परिश्रमपूर्वक संपादित केलेली, दहा कवींची. एकूण कविता १००. नव्वद पाने कविता आहेत. चाळीस पाने चर्चा, रसग्रहण संपादकांनी तोल सांभाळून केले आहे. अनेक महत्त्वाचे प्रश्न उभे केले आहेत. कशाचेही आणि कोणाचेही समर्थन केलेले नाही. सध्या तरी अशा चर्चेची, अशा रसग्रहणाची जरुरी दिसते आहे. कवितेचे वाचन अधिक प्रमाणात होऊ लागेल तेव्हा फक्त कविता दिली तरी पुरे होईल. 'कविता दशकाची' सारखी पुस्तके ती स्थिती लौकर आणू शकतील. आणावी. यावी.

दहाही कवी 'तुटलेले' आहेत. काहींचे 'तुटलेपण' देखणे आहे, काहींचे समजू शकते, काहीचे भयानक आहे. जीवनाला रस देणारी मुळे केव्हा तुटली ? पाश्चिमात्य देशात ती क्रिया औद्योगिक क्रांतीपासून सुरू झाली आणि गेल्या महायुद्धानंतर तिचे स्वरूप भयानक झाले. दोन माणसांमधील नातेदेखील फार वेळ टिकत नाही. दुरावा वाढत आहे. एकाकीपणा सर्वत्र पसरला आहे.

धामणस्कर एकटेच पन्नाशी गाठलेले आहेत. त्यांची कविताही तशी सरळ, 'घर असलेल्यांची' आहे. बागेत पसरलेल्या कोवळ्या सूर्यप्रकाशासारखी प्रसन्न, घराचा सुवास असणारी पण थोडीशीच आहे. कोणालाही 'भुरळ पडावी,' 'पाडणारी' असे म्हटले असते; पण दया पवारांना ते पटणार नाही आणि त्यात दया पवारांचे चुकते आहे असेही नाही. स्वतः दया पवारांना त्यांच्या उत्स्फूर्त कवितेला दाद या पवईच्या आय आय. टी. च्या बुद्धिमान मुलांसमोर कोठे मिळाली? इथेच तर दुःख आहे. बुद्धिमान वेगळे, कष्ट करणारे वेगळे, नोकरदार वेगळे, मालक वेगळे आणि इतके वेगळे की वेगळेपणाची जाणीव सतत सलत रहावी इतके वेगळे ! बुद्धिमंतांना जबरदस्त आकर्षण अमेरिकन, रशियन, फ्रेंच, इराणी जीवनपद्धतीचे. तेथील वस्तूंचे. प्राचीन आफ्रिकन निग्रोंच्या खोल शिल्पकृतींचे आणि संगीताचे. त्यात त्यांना वन्य पशूंच्या डोळ्यांत दिसणारी खोल, भयानक, अशिक्षित रांगडी दृष्टी दिसते. एकूण यंत्रयुगाने (असे म्हणायचे; पण निश्चित एक वा अनेक करणे सांगता येणार नाहीत.) निर्माण केलेला एकाकीपणा घालविण्यासाठी, विसरण्यासाठी शोधलेली ही पळवाट आहे.

अशी कोणतीही पळवाट हे दहा कवी शोधत नाहीत. जे आहे ते क्रमप्राप्त आहे असे त्यांना वाटत नाही म्हणून स्वीकारलेले नाही; पण ते नष्ट करण्याचा मार्गही दिसत नाही म्हणून तुटलेले आहेत. तुटलेपणाचे समर्थन नाही. या कविता म्हणजे वेगवेगळे उद्गार आहेत. प्रत्येकजण तुटलेला आहे; पण प्रत्येकाची या जीवनाला प्रश्न घालण्याची पद्धत वेगळी आहे.

धामणस्करांना उत्तरे सापडलीत; पण ती कोणत्या प्रश्नांची तेच माहीत नाही. र. कृ. जोशी यांना प्रश्न आणि उत्तरे यांची फारशी चिंता नाही. ती अस्सल रूपात कशी मांडता येतील याच प्रयत्नात ते आहेत. शब्दांच्या अर्थाप्रमाणेच त्यांचा ध्वनी आणि रूप देखील अधिक महत्त्वाचे वाटते आणि त्यामुळे एक वेगळेच सौंदर्य त्यांनी मिळवण्यासाठी धडपड केलेली आहे.

गुरुनाथ सामंतांच्या प्रश्नांना उत्तरे नाहीत आणि हे त्यांना पक्के माहीत असून, ते, सतत ते प्रश्न विचारत बसले आहेत. 'गुरुनाथ बेंडरिडन होता' असे दूरस्थपणे म्हणतील. आता कवितेतील 'गुरुनाथ' आणि कविता लिहिणारा 'गुरुनाथ' एक की दोन हा प्रश्न देखील ते निरर्थक करून टाकतात. वसंत पाटणकर कोणालाच कसलेच प्रश्न विचारणार नाहीत. प्रश्न विचारण्यातीलच निरर्थकता त्यांना फार जाणवते. प्रश्न कोणाला विचारायचे ? सर्वच वस्तू परक्या वाटत आहेत. तुटलेपणा, एकाकीपणा सहन करण्यापलीकडे फारसे काही उरत नाही.

उत्तम कोळगावकरांचा 'गुराखी' कधी एकदा गाई हरवून बसला आहे. त्या त्याला कधीही पुन्हा भेटणार नाहीत आणि तरीही त्यांचा शोध संपणार नाही. हरवलेल्या गाईंच्या शोधात गुराखी स्वतःला हरवून बसला आहे !

कवठेकरांना उत्तरासाठी कैक हात पुढे करून झाडे सांगत आहेत; पण झाडांचे उत्तर पचवण्याची कुवत आपल्याजवळ नाही याची जाणीव त्यांना होते. कसलीही लबाडी न करता शर्यतीत उतरण्याची त्यांची सर्व तयारी होते आणि लक्षात येते की शर्यत करपलेली फुले आणि जळलेला मोहोर यामध्येच आहे. अशोक बागवे यांना चैतन्यहीन जगाची जाणीव होताना आपणही त्याच जगातले आहोत ही जाणीव भीतिदायक वाटते. अनिल द्रविड दहावे. पंचविशीत अस-

लेले स्त्रीचे अस्तित्व जीवनातील निरर्थक-तेला पूर्ण निरर्थक करू शकत नाही म्हणून गोंधळलेले. ◻

२ :

सामाजिक जीवनाचे भान आपल्याकडे एकूण कमीच. सामाजिक संदर्भाचा घोषा मात्र सारखा चाललेला आहे. त्याची कलात्मक जाण मात्र तो घोषा न करणाऱ्या कलावंतामध्येच थोड्याफार प्रमाणात दिसते. ती मर्ढेकरांच्या कवितेत दिसते. 'उध्वस्त विश्व' सारख्या गाडगिळांच्या कथात आहे, विजय तेंडुलकरांच्या नाटकात आहे. पूर्ण अर्थाने सामाजिक संदर्भ हरिभाऊ आपटे यांना काही प्रमाणात शक्य होता. ती गोष्ट मात्र आज अत्यंत अवघड झालेली आहे. समाजाचे इतके तुकडे झाले आहेत की त्या सर्वांना सामावून घेणे कलावंताला जवळजवळ अशक्य होऊन बसले आहे. पाश्चिमात्य देशात फ्रान्समधील बॅल्झॅकला वा रशियातील टॉलस्टायला ते जमले; कारण त्या वेळचा समाज हा आज आहे इतका गोंधळात टाकेल इतका विघटित नव्हता हरिभाऊंचा वाचक व त्याच्या कादंबऱ्यांतील समाजजीवन एकच होते त्यामुळे त्यांना ते जमले.

आजच्या पाश्चिमात्य देशातही कोणी बॅल्झॅक वा टॉलस्टाय नाही.

आणि मग उरते ती दिशाहीन अस्वस्थता. केवळ शुद्ध हुरहूर आणि ती हवी असेल तर ती सैगल वा मेहंदी हसनच्या आर्त आवाजात ऐकायला बरी वाटेल. गुरुनाथ सामंताची वा वसंत पाटणकरांची केवळ अस्वस्थ करणारी कविता कोण वाचील? ती ज्या वेळी मराठी वाचकवर्ग बहुसंख्येने वाचू शकेल, त्याला वाचावीशी वाटेल त्या वेळी साहित्याविषयीची खरी जाण निर्माण झाली असे समजावे.

गुरुनाथ सामंताची कविता अगतिकता व्यक्त करताना देखील हिंस्र होत नाही. प्रेमात भोगलेली असफलता इतक्या शारीरिक रूपात व्यक्त होऊ नये; पण ती त्यानी अशा काही समर्थ शब्दात व्यक्त केली आहे की, त्या शब्दसामर्थ्याकडेच लक्ष खिळून राहावे; पण या केवळ व्यक्तिगत मर्यादेला त्यापलीकडील जीवनाचा परिसस्पर्श होऊ शकला तर? 'वाळवंट' या त्याच्या कवितेत तो थोडासा होतो, पण असा स्पर्श लाभणे कोणाच्या हातात असते? गुरुनाथ सामंतानाही या मर्यादेची जाणीव असावी. ◻

३ :

'तो आणि ती'चे प्रेम वा प्रेमभंग नैसर्गिक. समाजाला मान्य असलेले. कोणाला आवडतील, कोणाला आवडणार नाहीत; पण निसर्गाची क्रूर थट्टा ज्यांच्या नशिबी आहे अशा समलिंगी लोकांचे–त्यात स्त्रियाचे एकमेकींचे शारीरिक आकर्षण कवितेत सरळसरळ व्यक्त झाले तर ते वाचताना अवघडल्यासारखे वाटले तर दोष कोणाचा? कशासाठी हा 'ओंगळ' वाटणारा स्पर्श सहन करायचा? इथे घरची कामे आणि कटकटी कमी आहेत म्हणून? रजनी परुळेकरांनी अशा ५० कवितांचा संग्रह केला तर किती जण त्यातील 'अभिव्यक्तीचे सौंदर्य' अनुभवण्यासाठी तो वाचतील? पण रजनी परुळेकराना थोड्या हातचलाखीने हेच प्रेम 'तो आणि ती'चे दाखविता आले असते आणि मग त्याची प्रेमकविता सर्वमान्य झाली असती; पण त्यांनी ही हातचलाखी केलेली नाही आणि केवळ रुचिपालट, वैचित्र्याची हौस, धाडसाचे आकर्षण अशासाठी त्यानी ही भूमिका घेतली आहे असे वाटत नाही. जीवन जसे आहे ते तसे व तितकेच दाखविणे ही भूमिका वाटते तितकी सोपी आणि निरुपद्रवी नाही. अखेरी जीवनाचा स्वीकार करावाच लागतो. मग ते शोकान्त असेल; निर्लज्जपणे स्वीकारलेले असेल; विकृतीच्या विकृत आवडीतून घेतलेले असेल; दुर्बलतेतून अंगावर पडलेले असेल–प्रश्न पडतो तो अशा आशयातून व्यक्त झालेली कविता किती श्रेष्ठ मानायची? सर्वच कलाकृतीची रचना बुद्धिपुरस्सर असते. अनेक वेळा त्या निर्मितीत हात फिरलेला असतो. केवळ रचनेचे कौतुक करण्यासाठी ही कविता वाचायची का? त्यातील आशयाला समाजाची मान्यता मिळेल का? अश्लील, ओंगळ वगैरे शब्द वापरावेत अशी रजनी परुळेकराची शब्दरचना नाही. त्यात बुद्धिपुरस्सर स्वीकारलेली धूसरता आहे, झाकलेले हेतू शोण होतील म्हणून झाकण्याचा प्रयत्न नाही; पण दुहेरी जीवन जगण्याची व्यथा आहे, त्यातून क्षीण का होईना पण एक कारुण्याचा स्पर्श आहे. शोकनाट्यातील धीरोदात्त नायकाच्या वाट्याला येणारा कारुण्यस्पर्श नाही आणि याची जाणीवही आहे. क्षुद्रतेची, असहाय्यतेची जाण कोठे तरी अधेमधे रेंगाळते. अनेक प्रश्न निर्माण व्हावेत इतकी समर्थ शब्दात लिहिलेली ही कविता आहे. ◻

४ :

कोणतेही मूल्य हे चिरंतन, शाश्वत नसते. प्रत्येक समाज आपली मूल्ये निर्माण करीत असतो. किंबहुना जीवनपद्धतीतूनच मूल्ये साकार होत असतात, निर्माण होत असतात. शास्त्रज्ञाना प्रिय आणि अत्यावश्यक असे जे सत्य ते मूल्य देखील चालू प्रचारसाधनांनी वेडंविद्रं करून टाकलेलं आहे. कोणे एके काळी राजे कर्तृत्ववान होते व त्यांच्या जीवनपद्धतीतून काही मूल्ये निर्माण झाली. खानदानी असे विशेषण निर्माण झाले पुढे हा एक वर्ग झाला व तो केवळ ऐतखाऊ चैनी बनला. ती मूल्ये संपली. पुढे, खूप पुढे मध्यमवर्ग निर्माण झाला. त्या वर्गाने काही मूल्ये रूढ केली. बरीच वर्षे–अगदी गेल्या महायुद्धापर्यंत या मूल्यांना अर्थ होता. आता हा वर्गही नष्ट होत आहे. जगभर त्या वर्गाची नाचक्की झाली आहे. त्याच्या मूल्याची कुचेष्टा चालू आहे. याच वर्गाने आतापर्यंत थोडीफार नीती साभाळण्याचा प्रयत्न केला; सर्व कलाचा खरा रसिक तोच होता; अभिजात संगीत असो, दलिताचे काव्य असो चांगले असेल त्याला दाद देणे, दिलखुलास दाद देणे त्यालाच माहीत होते. चागल्या गोष्टीची निगा राखणे, त्या जपणे, त्यांची चव इतरांना सांगणे हे सर्व तो स्वत:च्या खुषीसाठी करीत होता. सभ्याचार, आतून-बाहेरून सभ्याचार होता. पुढे त्यात ढोंगीपणा आला. तो खोटा झाला. आज मुद्दामहून जाडेभरडे ठिगळ लावलेले कपडे करणे हा एक शोक आहे. मुद्दाम म्हणून अर्वाच्य शिव्या असलेली भाषा बोलीभाषा होत आहे. मृदुता, नीटनेटकेपणा, सौजन्य, संयम हे टिंगल करण्याचे विषय झालेत. तरीही हेमंत जोगळेकर आपली कविता लिहीत आहेत. स्वच्छ, साधे कपडे घातलेली सभ्य कविता. विषय साधे आहेत. त्यात कसलाही तिरकसपणा नाही. प्रदर्शन नाही.

आनंद व्यक्त करण्याची हौस आहे. दु:खे सूचित केली जातात. त्यांची फार वाच्यता नाही. घर आहे, मुले आहेत, पत्नी आहे. ओळख करून देताना पत्नी का हसते असा प्रश्न पडतो. प्रश्न पडतात ते इतके नाजूक, सूक्ष्म. घरातील स्त्रीचा जो कोंडमारा होत असतो तो व्यक्त करताना कोठे आदळआपट नाही; पण अंतःकरणात जाऊन बोचावे, अस्वस्थ करावे असे आहे. नष्ट झालेल्या वा होऊ पाहणाऱ्या मध्यमवर्गीय संस्कृतीचे दर्शन ती अभिजात शालीनतेने देते. ¤

५ :

या संग्रहातील कवितांचे कार्यक्रम झाले तर काय काय होणे शक्य आहे असा विचार मनात येतो.

धामणस्कर आणि हेमंत जोगळेकरांची कविता बैठकीला निश्चित रंग भरील. र. कृ. जोशी यांची कविता वाचण्यास चांगला जाणकार तंत्रज्ञ लागेल. उदा. (सुरेश भट यांची कविता त्यांच्याच गळ्यातून ऐकावी आणि वसंत मानाजी डहाके याची कविता कमीत कमी त्यांनी स्वतः वाचू नये) गुरुनाथ सामंताची कविता जाणकार श्रोता असेल तरच नीट जमेल. रजनी परुळेकराच्या कविता वाचताना दंगाधोपा होणार नाही याची खात्री देता येणार नाही; पण त्याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट यातील प्रत्येक कविता स्वतः मनातच वाचण्यासारखी आहे. ती 'कंठाळी' नाही. कारण प्रत्येक कवी हा एकाकीपणे जगतो आहे. सर्वजण तुटलेले पतंग आहेत : काही देखणे, काही फाटलेले, काही उगीचच उडणारे... *

कविता दशकाची :
संपादक : मंगेश पाडगावकर,
विजया राजाध्यक्ष, शिरीष पै,
रमेश तेंडुलकर, दया पवार.
ग्रंथाली प्रकाशन.

## फिनिक्स निवड

# World War 3

(A Military projection founded on today's facts)
General Editor :
Shelford Bidwell
Hamlyn Paperbacks)
pages 312, £ 1·25.

पूर्व तयारी सर्व झालेली आहे. अधिकाधिक जहाल शस्त्रे शोधण्यासाठी अखंड संशोधन चालू आहे. कधीकधी ठिणग्याही उडत आहेत. एखादी ठिणगी कधी स्फोटक साठ्यावर पडेल त्याचा नेम नाही. तिसऱ्या विश्वयुद्धाची मानसिक पूर्वतयारी आहे. शस्त्रांचीही तयारी आहे. याचाच अर्थ असा आहे की, तिसरे महायुद्ध अटळ, अपरिहार्य आहे. एखादी बारीक तांत्रिक चूक, म्हाताऱ्या अमेरिकन व रशियन म्होरक्यावर येत असलेला प्रचंड ताण, अज्ञानेसुद्धा तिसऱ्या महायुद्धाचा वणवा पेटू शकेल. या विषयावर Fail Safe सारख्या अनेक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या आहेत. किंबहुना युद्ध या विषयावर जेवढे साहित्य लिहिले गेले असेल तेवढे दुसऱ्या कोणत्याच क्षेत्रात निघाले नसेल. हिटलरवर जेवढी पुस्तके निघाली आहेत, तेवढी फ्रॉइडवर निघाली आहेत का? नाही. आणि फ्रॉइडच्या पुस्तकांनी सबंध मानवजातीच्या विचारांची दिशाच बदलून टाकली.

युद्धशस्त्रे निर्माण करण्यासाठी व युद्ध सुरू असताना माणसाने जेवढी शक्कल लढवली असेल तेवढी त्याने इतर कोणत्याच क्षेत्रात लढवली नसेल. हीच शक्कल तर मानवजातीच्या कल्याणासाठी लढवली गेली असती तर महात्मा गांधींचे Every tear from every eye केव्हाच पुसले गेले असते. याउलट जणू सुपर पॉवर्सनी 'Our ambition is to make everyone, including ourselves, weep so copiously that oceans of human tears are created"—हेच आपले ब्रीदवाक्य केले आहे.

युद्धविषयक दुष्ट शस्त्रांची व इतर माहिती फार कमी प्रमाणात बाहेर पडते; पण या कमी माहितीवरूनसुद्धा माणूस हा प्राणी किती हुषार व किती दुष्ट असू शकतो याची पुरी कल्पना आपल्याला येते. या पुस्तकात असे लिहिले आहे की, गणकयंत्राचा या युद्धात अधिकाधिक वापर केला जात आहे. गणकयंत्राच्या नकाशाच्या कांटूसंने (आउटलाइन्सने) एक विशिष्ट प्रकारचे विमान खरोखरच प्रत्यक्षात त्या खऱ्या प्रदेशाच्या आउटलाइनवर उडू लागत. 'दुःखा, तू एक कान्टूर आहेस. सर्व दुःखी जीवाना सांगीत जा !' Our ambition is to wrench every tear from every eye. कॉम्प्युटरमुळे शत्रूच्या प्रदेशातील सॅटेलाइटने फार उंचीवरून घेतलेले फोटोसुद्धा छोटे छोटे तपशील दाखवू शकतात. काही दिवसांपूर्वी शनी या ग्रहाचा Computer enhanced फोटो टाइम मासिकात पाहिला होता.

हे पुस्तक प्रथम १९७८ मध्ये प्रसिद्ध झाले. त्यानतर त्याच्या दोन तीन आवृत्त्या निघाल्या या पुस्तकात वर्णन केलेल्या घटना ५ वर्षांच्या आत खऱ्या ठरू शकतील असे पुस्तकाच्या मागे लिहिले आहे. त्याचे कारण अधिकाधिक देशांच्या हातात अण्वस्त्रे बनवण्याची क्षमता येत आहे. परंपरागत शस्त्रे वापरण्यात व बनविण्यात रशिया पुढे आहे, तर पाश्चात्य देशांच्या अंदाजपत्रकात सतत घट होत असल्यामुळे ती सारखी नवीन नवीन क्षेपणशास्त्रे व अण्वस्त्रे बनवण्यात गुतली आहेत. आताच अफगाणिस्तान व इराण येथे घडलेल्या घटनेवरून आपण सर्व डायनामाइटवर बसलो आहोत हे उघड आहे. ठिणगी केव्हा पेट घेईल हे सागणे कठीण आहे. सामान्य माणसाचा विचार केला तर एक प्रकारची मनाची स्वयंचलित यंत्रणा काही लोकांना म्हणायला लावते, 'काय होणार आहे? सर्व ठीक होईल. बे ऑफ पीग्ज वेळेला काय झाले? आतापर्यंत प्रत्येक वेळेला The Crisis has solved itself. म्हणजे अण्विक शस्त्राच्या सर्वनाशी तांडवनृत्याची कल्पनाच इतकी भयंकर आहे की, ते होणारच नाही असे काही लोकाना वाटते. इतर

राहिलेल्या सामान्य लोकांच्या संवेदना-इतक्या बोथट झाल्या आहेत की, ' काय व्हायचं ते होईल ! ' एकदा आर. डी. लँग म्हणाले होते की, माणूस चारचौघां-सारखा वागला नाही, त्याने काही Originality दाखवली की तो eccentric किंवा वेडा समजला जातो. परंतु एका बटणा-द्वारे अणुअस्त्रांचं थैमान सुरू करण्याचे आदेश देणारे हे शहाणे व जबाबदार समजले जातात ! हे असे टॉप्सी–टर्वी जगातच होऊ शकते असे ते पुढे म्हणतात.

तिसऱ्या महायुद्धात पश्चिम जर्मनी हे रणांगण होईल, NATO व वॉर्सा पॅक्टची माणसं व शस्त्रं नॉर्थ वेस्ट युरोपमध्ये एक-मेकांवर डोळे वटारून उभी आहेत, इतर तळापेक्षा इथेच अण्वस्त्र व क्षेपणशस्त्रांचा ढीग पडला आहे !

अणुयुद्धात माणसे कशी मरतील याचे या पुस्तकात थंड विश्लेषण केले आहे. हजारो इतक्या तासात मरतील, इतर हजारो इतक्या आठवडयात मरतील, बाकीचे हळू-हळू काही महिन्यांत मरतील. काही भाजून मरतील, काही डायरियाने मरतील, काही ल्युकेमियाने मरतील, इतर काही वेगळ्या कॅन्सरच्या प्रकाराने मरतील! आणि हो ! अशी काही क्लीन वेपन्स निर्माण केली आहेत म्हणे–त्याने मालमत्ता सुरक्षित राहील, पण फक्त माणसेच मरतील ! Our ambition is to wrench every tear from every eye !

हे पुस्तक १२–१३ जनरल्सनी लिहिले आहे. यातील बऱ्याच लोकांना दुसऱ्या महायुद्धाचा व इतर लहान-मोठ्या युद्धांचा अनुभव आहे. या लोकांना तिसरे महायुद्ध अटळ वाटते. भारत किंवा चीन भविष्यात तिसरा सुपर पॉवर होऊ शकेल याची शक्यता नाकारता येणार नाही, असे संपादक शेलफॉर्ड बीडवेल म्हणतात. भारताची प्रचंड लोकसंख्या, अण्वस्त्रनिर्मितीची क्षमता व नॉन अलाइन्ड देशाचे नेतृत्व या तीन कारणामुळे आपला देश सुपर पॉवर होऊ शकतो ! पण ही शक्यता प्रत्यक्षात उतरण्याच्या आधीच अणुयुद्धात सर्वच किंवा बरेच जग नष्ट होईल, असे संपादकाला वाटते. संपादक बिडवेल पुढे म्हणतात की, युद्धाच्या सर्व इतर क्षेत्रांत रशिया पुष्कळ आघाडीवर आहे, त्यामुळे पाश्चात्य देश कुरापती किंवा कुरघोडी करण्यात पुढाकार घेत नाहीत. रशिया युद्धशास्त्रात थोडासा पुढे होता असे वाचले होते; पण संपादक शेलफोर्ड बिडवेल म्हणतात, ' The balance of military resources favours the Soviet Union and its client states so overhelmingly that offensive action by the West, whatever the provocation, would be a suicidal act. '

तिसऱ्या महायुद्धाची सुरुवात जरी पश्चिम जर्मनीमध्ये होईल तरी fall out मुळे लांबचे देश सुद्धा निकालात निघतील असे बिडवेल म्हणतात. हे तर अगदी उघडच आहे. वाऱ्यामुळे न्युक्लिअर फॉल आउट कुठे कुठे जाईल त्याचा नेम नाही. कदाचित त्या उष्णतेमुळे उत्तर – दक्षिण ध्रुवावरचा बर्फ वितळून महासागराच्या पाण्याची पातळी काही फुटांनी वाढली तरी जगातल्या पुष्कळशा किनारी प्रदेशात प्रलयाचे थैमान सुरू होईल !

नवीन नवीन अण्वस्त्राची निर्मिती करण्यासाठी चाचण्या घ्याव्या लागत नाहीत. हिरोशिमावर ज्या प्रकारचा अणुबाँब *टाकला होता त्याची आधी* चाचणी घेतली गेली नव्हती हे जर असे असेल तर Comprehensive Test Ban Treaty वगैरेंना काही अर्थ नाही.

नुसती अण्वस्त्रांची निर्मिती करण्याच्या क्षमतेला काही अर्थ नाही. अण्वस्त्रांची निर्मितीइतकीच महत्वाची गोष्ट म्हणजे डिलिव्हरी सिस्टीम.

अणुबाँब करण्याचे काम आता इतके सोपे झाले आहे की, एक– दीड लाख रुपये व योग्य तांत्रिक ज्ञान असलेल्याना एक अणुबाँब सहज करता येईल. एका माणसाने या विषयाच्या सर्व फाइल्स चाळून जवळजवळ एक बाँब तयारही करून दाखवला आहे.

इस्राइलकडे अणुबाँब करण्याची क्षमता आहे किंवा त्यांच्याकडे आत्ताच काही अणुबाँब आहेत असे CIA म्हणते. ७-४-१९७६ च्या टाइम्स ऑफ इंडियामध्ये अशी बातमी आली होती की, इस्राइलने योम किप्पूरच्या युद्धात हे १३ बाँब भूगर्भातील कारखान्यात ७८ तासात जुळवले ! जगात सर्वांत स्मार्ट जात कोणती ? इस्राइली आणि जपानीज्! जर प्रेसिडेंट कार्टरनी इराणमधल्या ओलिसांची सुटका करण्याचे काम इस्राइलला दिले असते तर कदाचित ते चोख झाले असते !

लायन्स क्लब, रोटेरियन्स, जेसिस वगैरे क्लब जॉइन करण्यात एक प्रकारची प्रतिष्ठा असते तसेच न्युक्लिअर क्लब जॉइन करण्यात सुद्धा एक प्रकारचा स्टेटस सिंबॉल असतो. नीतिमूल्ये बदलली आहेत. झपाट्याने बदलणाऱ्या जगाबरोबर झपाट्याने बदलले पाहिजे. मग Our ambition is to wrench every tear from every eye या ब्रीदवाक्यात चुकते कुठे ?

**—जे. एन. पोंडा**


**नवीन दाखल झालेली पुस्तके**

| | | रु. पैसे |
|---|---|---|
| १. | किर्लोस्कर कथा (भाग १, २, ३ व ४) (किर्लोस्कर मासिकातील उत्तमोत्तम कथा) संपादक : राम कोलारकर व मु. शं. किर्लोस्कर | |
| २. | उजेडाचं वेड ( कथासंग्रह ) अरविंद गोखले : | १५–०० |
| ३. | कोवळिबिरीची फुले ( लेखसंग्रह ) सौ. विमला जोशी : | १०–०० |
| ४. | मी मुंबईचा पोलिस ( पोलिसकथा ) अरविंद पटवर्धन : | ३५–०० |

**ENGLISH**

| | | |
|---|---|---|
| 1. | The Philadelphia Experiment ( On experiment in invisibility ) Charles Berlitz : | 00–95 |
| 2. | Sayings of The Ayatollah Khomeini ( Kranky, Zany quotation of the fanatic ) : | $ 2·25 |

¤ 25% of damage to books in Libraries is caused during transit. Use a polythene bag in transit and at home when the book is not in use.

**दि फिनिक्स लायब्ररी, ७२७ सदाशिव पोस्टासमोर, पुणे ३०.**

हिचकॉकच्या कथा । कथा तिसरी

स्वैर अनुवाद । रवींद्र गुर्जर

# चेटकीचा खेळ

दुर्बळ मनाच्या पुरुषांनी
आणि कमकुवत हृदयाच्या
स्त्रियांनी ही कथा
कृपया वाचू नये ...

त्यानं पिस्तुल पुन्हा ड्रॉवरमध्ये ठेवून दिलं आणि ड्रॉवर बंद केला.

नको, ही पद्धत फारशी चांगली नाही, त्यामुळे लुईझे क्षणात मोकळी होईल. हाल नाहीत, यातना नाहीत. या प्रकारे ती सुखात मेली तर सगळं तिथेच संपलं. या प्रकरणात कालावधी फार महत्त्वाचा आहे. दीर्घकाळ तिला यातना व्हाव्यात म्हणून डोकं लढवलं पाहिजे. मुख्य म्हणजे, त्याची सुरुवात कुठून करायची ? बघू या.'

बेडरूममध्ये आरशासमोर उभ्या असलेल्या त्या व्यतीनं अत्यंत काळजीपूर्वक हाताच्या बाहीची बटनं लावली. त्या दोन मजली इमारतीला लागून असलेल्या रस्त्यावर खेळणाऱ्या मुलाचे आवाज ऐकण्यासाठी त्यानं कान दिले. फुलांसारखी गोजिरवाणी मुलं !

मुलांच्या आवाजावरून कॅलेंडरचा दिवस कळू शकतो. त्याच्या कल्लोळावरून कोणती संध्याकाळ आहे, हे समजतं. वर्ष संपत आल्याचं लक्षात येत होतं. आक्टोबरचा अखेरचा दिवस. खाली मुलांचं स्नेहसम्मेलन ठरलं होतं. त्यांच्यासाठी शिजणाऱ्या पक्वान्नाचा घमघमाट सुटला होता.

छे ! गेले काही दिवस वातावरण जास्तच गढूळ झालं होतं. आक्टोबर महिना फार मनस्ताप देतो. आगीत तेलाची भर ! त्यानं आपला काळ्या रंगाचा बो ठाकठीक केला. हा जर वसंतऋतू असता तर गोष्ट वेगळी होती. त्यानं आरशात चेहरा न्याहाळला. अतिशय थंडपणे, निर्विकारपणे आजची रात्र अधिकच खायला उठली होती. उत्साह नाही, प्रसन्नता नाही, परिस्थिती सुधारण्याची शंकासुद्धा नाही !

हॉलमध्ये पावलं पडल्याचे नाजूक आवाज आले. 'ही माझी मेरियन. अवघी आठ वर्षांची निरागस बालिका. किती शांत तरी. कधी गडबड नाही, बडबड नाही. फक्त करड्या रंगाचे टक लावून बघणारे डोळे आणि कायम आश्चर्यचकित असलेला तिचा लहानसा चेहरा.' तो आठवू लागला. त्याची मुलगी सकाळ–संध्याकाळ चेहऱ्याला निरनिराळे मुखवटे लावून हिंडायची. त्याला सारखं विचारायची की सगळ्यात जास्त भयानक मुखवटा कोणता ? त्या दोघानी शेवटी असं ठरवलं होतं की कवटीचा मुखवटा सर्वांत भीतिदायक होता तो बघून झोप उडते आणि सगळ्याचा थरकाप उडतो. दोघांचं एकमत झालं होतं.

त्यानं पुन्हा एकदा आरशात स्वतःला निरखलं, आक्टोबर महिना त्याला कधीच आवडला नव्हता. अगदी लहानपणापासून. काहीएक कारण नसताना तो अनेक वेळा त्या दिवसात रडला होता, वर्षं मागे पडत गेली आणि तो अधिकच दुःखी होत गेला. पुन्हा वसंतऋतू आला म्हणजे हे औदासीन्य तेवढ्या काळापुरतं निघून जायचं आणि नंतर पुन्हा मानगुटीवर येऊन बसायचं.

आज मात्र अगदीच वेगळी गोष्ट होती. हे जीवघेणे दिवस लक्षावधी वर्षं संपणारच नाहीत, असं त्याला वाटू लागलं.

वसंत पुन्हा कधी येणारच नाही !

गेली संध्याकाळ तो मूकपणे अश्रू ढाळत होता. चेहऱ्यावर त्याचं चिन्हही दिसत नव्हतं; पण आतल्या आत तो एकसारखा रडत होता.

कसला तरी गोड पदार्थ उकळत असल्याचा वास दरवळत होता. लुईझेनं दारं खिडक्यावर सफरचंदं लटकावली होती. घराची खूपच सजावट केलेली होती. तिनं निरनिराळ्या खेळाची तयारी केली होती. फक्त मुलं घरात यायची खोटी होती. नंतर हैदोसदुल्ला चालणार होता. आनंदी चीत्कार आणि धावपळ, किंचाळणं.

सध्या घर शांत होतं. सर्व तयारीनिशी सज्ज होतं आणि त्याशिवाय त्या वातावरणात आणखी काही होतं.

आज सकाळपासून लुईझे त्याला सारखी टाळत होती. तो असेल त्या खोलीत ती कटाक्षानं पाऊल टाकत नव्हती. एक प्रकारे ती डिवचत होती. 'बघ माईक, मी किती कामात आहे. माझ्या खोलीत तू आलास की लगेच मला दुसरीकडचं काम आठवतं. मी तुझ्या वाऱ्यालाही उभी राहणार नाही !'

थोडा वेळ त्यानं तिच्याशी पोरकट खेळ करून पाहिला. मुद्दाम निमित्त काढून ती असेल तिथे जायचं. ती स्वयंपाकघरात असताना 'मला पाणी पाहिजे,' असं म्हणून तो तिथे गेला. तर ती 'हडळ' शेगडीवर सूप उकळून जात असताना 'अरेच्या, मी मेणबत्त्या लावायलाच विसरले !' असं म्हणून धावतच बाहेर निघून गेली. तिच्या मागोमाग तो 'माझा पाइप कुठाय ? असं म्हणून जाऊ लागला तेव्हा 'माझं सूप !' असं किंचाळून ती पुन्हा पहिल्या खोलीत परतली. 'मी तिकडे बघतो की !' त्यानं प्रयत्न केला. शेवटी ती जी पळाली ती बाथरूममध्ये आणि आतून तिनं दार बंद करून घेतलं !

तो विचित्रपणे हसून दाराबाहेर थाबला. तोंडातला पाइप केव्हाच विझून गेला होता. या खेळाचा त्याला खरोखर वीट आला. पण पाच मिनिटं तो तसाच रेंगून तिथं थांबला. बाथरूममधून कसलाच आवाज येत नव्हता आणि तो बाहेर ,उभा आहे, या भ्रामक कल्पनेनं तिला आतच बसून राहू दे, असा विचार करून तो वरच्या मजल्यावर निघून गेला.

वरती तो वाट बघत होता. शेवटी बाथरूमचं दार उघडल्याचा आवाज आला

आणि खाली काम सुरू झाल्याची हालचाल पुन्हा जाणवू लागली, जणू काही जंगलातील भीतीचं कारण नाहीसं होऊन तिथलं प्राणीजीवन पुन्हा सुरळीत सुरू व्हावं.

त्यानं बो ठीक केला आणि खाली हॉलमध्ये मुलीची धावपळ सुरू झाली. तो काळा कोट चढवत असताना मेरियन दारात हजर झाली. तिनं कवटीचा मुखवटा चढवला होता आणि अंगावर पायघोळ काळा वेष.

" पपा, मी कशी दिसते ? "

" सुरेख ! "

मुखवटयामधून तिचे फिकट काळे केस डोकावत होते. कवटीच्या दोन भोकांमधून तिचे निळे ढोळे चमकले. त्यानं उसासा टाकला. मेरियन आणि लुईझे, दोघीजणी शांतपणे त्याचा छळ करत होत्या. त्याच्या पौरुषाला डिवचत होत्या. त्याला खलनायक ठरवत होत्या.

लुईझेमध्ये कोणतं असं रसायन होतं कुणास ठाऊक ? पण त्यामुळं तिच्या पोटात वाढणारं बाळ आतल्या आतच बदलून जात जात, जन्माला आलं तेव्हा त्याच्यापेक्षा अगदीच वेगळं बनलं होतं. त्या मुलीचे डोळे वेगळे, चेहरा अगदीच निराळा, केस फिकट. काही काही वेळा त्याला शंका यायची की लुईझेनं केवळ कल्पनेच्या आधारावर मुलीला जन्म दिला असावा. निसर्गनियमाहून अगदीच निराळया पद्धतीनं. तिच्यातील बीजांड आणि त्याच्याबद्दल तिच्या मनात असलेली घृणा यांच्या संयोगानं ही मुलगी जन्माला आली असावी. त्याच्यावर जणू सूड उगवण्यासाठी तिला हवं तसं मूल तिनं निर्माण केलं होतं. त्यावर कळस म्हणजे तिनं डॉक्टरला आपल्या बाजूला वळवलं कारण त्या वेळी डॉक्टर मान हलवून म्हणाले होते की, 'सॉरी, मि. वाइल्ड! तुमच्या बायकोला पुन्हा मूल होणार नाही. तिला मुलगी झालेली आहे." त्यांनी बातमी दिली.

" पण मला मुलगा हवा होता! " माईक त्या वेळी म्हणाला होता. ही झाली आठ वर्षांपूर्वीची गोष्ट.

तो आता मेरियनला उचलून घेण्याच्या बेतात होता. तिच्याबद्दल त्याला एकदम दया वाटू लागली. तिला वडलांचं प्रेम कधीच मिळाल नाही फक्त हिडिसफिडिस करणाऱ्या निष्ठुर आईचं प्रेम आणि मुलीला त्याच्यापासून दूर ठेवण्यात ती यशस्वी झाली होती; पण तरीही त्याला मुलीच्या सान्निध्याचाही आनंद वाटत होता. मुलाची हौस भागली नसली तरीही त्याची कसलीही तक्रार नव्हती. बाकी सगळया गोष्टी ठीक असत्या तर त्यानं मुलीवरही खूप प्रेम केलं असतं; पण मुळात लुईझेला मूलच नको होतं. तिला प्रसूतीची फारच भीती वाटत होती. जेव्हा त्यानं तिच्यावर मूल लादलं, त्या रात्रीपासून पुढं वर्षभर, मुलीचा जन्म होईपर्यंत लुईझे घराच्या दुसऱ्या भागात त्याच्यापासून दूर राहिली होती. नको असलेल्या बाळाबरोबर आपणही मरून जावं अशी तिची इच्छा होती. मुलगा व्हावा म्हणून राक्षसी नवऱ्यानं शेवटी आपल्या बायकोला मारलं, हे जगाला दाखवून देण्याचं समाधान तिला हवं होतं.

पण ती जिवंत राहिली आणि वर विजयी ठरली तो ज्या दिवशी, हॉस्पिटलमध्ये आला तेव्हा तिचे डोळे थंड होते. 'मी जिवंत आहे', ते म्हणत होते, ' आणि मला मुलगीच झाली. बघ बघ' ! जेव्हा त्यानं हात पुढं केला तेव्हा विटाळ होऊ नये म्हणून ती घाईनं बाजूला सरकली. नव्यानं जन्मलेल्या गुलाबी मुलीशी उगीच काही तरी बोलू लागली. त्यात उपरोध इतका बेमालूमपणे भरला होता; त्याच्या बळजबरीला, स्वार्थीपणाला तीच शिक्षा योग्य होती.

आणि आता आक्टोबर पुन्हा आला होता. असे अनेक आक्टोबर गेले. त्या लांबलचक थंडीच्या काळात तुफान हिमवर्षावामुळं तो घरात कोंडला जात होता. त्यांच्यावर प्रेम न करणाऱ्या एका बाईच्या आणि मुलीच्या सोबत एकातवासाचं दु:ख भोगावं लागत होतं. अशी आठ वर्षं लोटली. हिवाळा संपला म्हणजे त्यातून सुटका व्हायची. सहलीला जाणं, मनमुराद भटकणं, एकटयानंच प्रवास करणं हे उपाय करता येत होते. ज्या माणसाचा घरात द्वेष होतो तो दुसरं करणार काय ?

हिवाळयात, झाडाच्या पानांबरोबर हे उपायही गळून पडायचे, सगळे रस्ते बंद ! निष्पर्ण वृक्षाप्रमाणे मुळं खुपसून एकाच जागी जखडून राहायचं. लोकांना घरी बोलावणं शक्य होतं; पण थंडीत कुणीच बाहेर पडत नाही अशा वेळी घर भयाण वाटतं. एकदा पैसे साठवून तो उबदार हवेच्या ठिकाणी गेला होता; पण ते नेहमी शक्य नव्हतं.

आठवा हिवाळा आला. तंग परिस्थितीनं परिसीमा गाठली होती. अधिक घुमसणं यापुढे असह्य होणार होतं. जणू त्याच्या अंगातली नस आणि नस आतल्या ॲसिडनं जळून गेली होती आणि आज रात्री भयानक स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही, असं त्याला वाटलं. एकदाच काय तो सोक्षमोक्ष लागेल!

खाली दाराची बेल कर्कश वाजू लागली. लुईझे बघायला गेली. मेरियन काही एक न बोलता बाल पाहुण्यांच्या स्वागतासाठी दाराकडे धावली– आणि मुलांच्या हास्यकल्लोळाचे आवाज येऊ लागले.

तो जिन्याच्या वरच्या पायरीवर येऊन उभा राहिला.

लुईझे मुलांच्यात उभी राहून हसत होती. ती उंच आणि नाजूक होती आणि मुलीसारखीच फिकट गोरी.

तो विचारात पडला. हे काय चाललंय ? किती वर्षे? जीवनच कंटाळवाणं झालंय का? नेमकं काय चुकलंय ? मुलीचा जन्म एवढं एकच कारण नाहीये. एकूण सगळयाच ताणांचा तो एकसंध परिणाम आहे. त्याचे द्वेष–मत्सर, धंद्यातलं अपयश आणि तसलीच सगळी घाण ! मग सरळ बॅग भरून आपणच गुपचुप निघून का जाऊ नये ? नाही लुईझेनं त्याला जेवढं दुःख दिलं त्याची परतफेड झाल्याशिवाय कुठंच जायचं नाही. हिशेब अगदी सीधा आहे. घटस्फोट घेतला तर तिला मुळीच दु.ख होणार नाही. त्यांच्यातलं शीतयुद्ध समाप्त होईल इतकंच. घटस्फोटामुळं तिला थोडा जरी आनंद होणार असेल तरी आपण जन्मभर वाटेल त्या परिस्थितीत तिच्याबरोबर राहायला तयार आहोत. तेव्हा तिला दुखवलंच पाहिजे ! काही तरी मार्ग निघेलच. मेरियनला तिच्यापासून तोडावं का ? अगदी कायदेशीरपणे ? बस्स, ठरलं. तसंच करावं. त्यामुळे तिला सर्वांत जास्त दु.ख होईल. मेरियनला तिच्याजवळून दूर करावं !

'हल्लो, छोटया मित्रानो !' तो रुद्र हास्य करत जिना उतरू लागला.

लुईझेनं वर बघितलं नाही.

'हाय् मि. वेल्डर !'

मुलं ओरडू लागली. तो खाली येत असलेला पाहून हात हलवू लागली.

दहा वाजेपर्यंत सगळे पाहुणे हजर झाले मुलांचे खेळ चालू झाले. त्याना खाऊ वाटण्यात आला. धावाधाव करून मुलं दमली. या सगळ्यात माईकचा मोठा पुढाकार होता. तो हसतमुखानं यजमानाची जबाबदारी साभाळत होता. लुईझे एका बाजूला पडल्यासारखी झाली. पार्टीत तिच्याकडून लोकाचं लक्ष त्यानं स्वत कडे खेचून आणलं होतं वीस मुलं आणि बारा पालक त्याच्यावर बेहद्द खूष झाले. माईकनं त्या प्रत्येकाची योग्य दखल घेतली. प्रत्येक खेळात भाग घेतला. सर्वांना खदखदा हसवलं. नंतर घरातले सगळे दिवे बंद करून त्यानं एकच मेणबत्ती हॉलमध्ये चालू ठेवली. तो मोठ्या आवाजात म्हणाला, 'थावा ! आता सगळेजण माझ्या मागोमाग या! तो तळघराकडे निघाला. मागोमाग सगळी पलटण जाऊ लागली.

पालकमंडळी एकमेकांशी चर्चा करत होती. माईकबद्दल त्याना भलतंच कौतुक वाटू लागलं. त्याची बायको किती नशीबवान आहे, असं ते म्हणू लागले. मुलांशी तो किती खेळीमेळीनं वागतो, वगैरे वगैरे.

मुलं गिल्ला करत माईकभोवती गोळा झाली.

'तळघरात जाऊ या !' तो ओरडला, 'तिथे चेटकिणीचं थडग आहे !'

घाबरल्याचा अभिनय करून तो म्हणाला, 'तिथे जे कुणी प्रवेश करतील त्याची कंबक्ती आहे !'

आईवडील गालातल्या गालात हसले.

हळहळू एकेक मुलगा अंधाऱ्या तळघरात जाऊ लागला. तो निरनिराळे आवाज काढून वातावरण तयार करत होता. काळोखात छोट्या मुलाची छाती धडधडू लागली. एकाच वेळी सगळेजण बोलत होते. मेरियन सोडून एकजात सगळे. पार्टीत तिचा फारसा आवाज आला नव्हता. तिचा सगळा आनंद; उत्साह आतल्या आत उड्या मारत होता. तोंड बंद ठेवून, चमकदार डोळ्यानी ती आपल्यासाठी चाललेल्या पार्टीत वावरत होती.

मुलाच्यामागोमाग पालक खाली उतरले. थोड्याशा नाखुषीनंच; पण मुलांचा हिरमोड होऊ नये म्हणून. मेरियन सगळ्यात शेवटी आत जाणार होती. लुईझे माईकची मदत न घेता गेली. त्यानं हात पुढं केला होता; पण तो वाकण्यापूर्वीच ती खाली अंधारात दिसेनाशी झाली.

वरचे दोन मजले रिकामे झाले त्या ठिकाणी मेणबत्त्याचा मंद प्रकाश पसरत होता.

मेरियन एकटीच उरली. 'चला आपण जाऊ या !' तो म्हणाला आणि तिला त्यानं वर उचललं.

तळघर प्रशस्त होतं. मोठा गोल करून सगळे बसले. त्या ठिकाणी हवेत ऊब होती. खुर्च्या भितीशी रचून ठेवल्या होत्या. वीस मुलं किंचाळत होती त्याचे पालक हसत होते. दोन मुलाच्यामध्ये एक मोठी व्यक्ती बसली होती. लुईझे पलीकडच्या टोकाला आणि माईक अलीकडे, जिन्याजवळ बसला. त्यानं डोळे फाडून बघितलं; पण काहीच दिसेना. यापुढचा कार्यक्रम पूर्ण अंधारात चालणार होता. संभाषण तोच एकटा करणार होता.

मुलाचा किलबिलाट. तळघरातील ओलसर सिमेंटचा वास आणि बाहेर ऑक्टोबरच्या वाऱ्याचा आवाज

'सगळे शात बसा !' माईक अंधारात ओरडला 'गडबड बद !'

हळूहळू शातता निर्माण झाली.

खोलीत काळाकुट्ट अंधार. प्रकाशाचा किरणही नाही. पापण्याची हालचाल मंदावली.

कपबशा फुटल्यासारखा खळकन् आवाज. त्यावर काही तरी धातू आपटल्याचा खणखणाट !

'चेटकी मेली !' माईकचा आवाज घुमला

'इऽऽऽइऽऽऽऽ!' मुलं किंचाळली.

'चेटकी ठार झाली. तिला मारून टाकलं. हा बघा सुरा, यानं तिला मारलं !'

त्यानं सुरा पुढं केला. प्रत्येकानं तो अंधारातच हातात घेऊन शेजाऱ्याला दिला. त्याचा गोल प्रवास सुरू झाला. कोणी खिदळत होतं, विचित्र आवाज येत होते. वडीलमंडळी काही तरी कुजबजत होती.

'चेटकीण शेवटी ठार झाली, हे पहा तिचं डोकं !' तो हळूच म्हणाला आणि एक वस्तू जवळच्या व्यक्तीकडे सरकवली.

'मला माहितीय् हा खेळ कसा खेळतात' एक मुलगा अधारात ओरडला, 'आइसबॉक्समध्ये ठेवलेली मोठी कोबडी काढायची आणि तिचा एकएक अवयव कापून ठेवायचा फक्त डोकं मातीचं करायचं, अन् मग ते फिरवायचं. दाताच्या जागी मक्याचे दाणे, डोळ्यांऐवजी संगमरवरी तुकडे वापरायचे. मला सगळे माहिती आहे तुम्ही घाबरू नका !'

'गप रे तू; सगळी गंमत घालवून टाकशील !' मुलगी म्हणाली.

'चेटकी त्रास द्यायला आली आत आणि हा तिचा हा'त!' माईक म्हणाला

'ईऽऽऽ!'

एकेक वस्तू फिरत राहिल्या. उकळत्या पाण्यातून काढलेल्या बटाट्याप्रमाणे कुणीही त्या 'वस्तू' फार वेळ हातात धरत नव्हते. काही मुलं त्याला हातच लावत नव्हती. किंचाळत होती कोणी भिऊन वर्तुळाच्यामध्ये जाऊन बसली.

'ओह्, हे कोबडीचे तुकडे आहेत,' एक मुलगा म्हणाला, 'तू इकडे ये, हेलन !'

एकेका हाता'तून चेटकीचे 'अवयव' जात राहिले मुलाच्या किंकाळ्या, पुन्हा नवी ओलसर चिकट वस्तू, पुन्हा ओरडाओरडा असा हा खेळ चालू राहिला.

'चेटकीचे तुकडे झाले. हे बघा तिचे हृदय आले !' माईक म्हणाला

मुलाचा थरकाप उडाला.

लुईझे पलीकडून म्हणाली, 'मेरियन, घाबरू नकोस; हा खोटा खोटा खेळ आहे.'

मेरियन काहीच बोलली नाही.

'ती मजेत आहे !' माईक म्हणाला. 'मुळीच घाबरलेली नाही.'

आता मुलंसुद्धा खेळात रमून गेली.

बाहेर वाऱ्याचा जोर वाढला आणि माईक तळघरी जिन्याच्या पायाथ्याशी उभा राहून बोलत राहिला. एकेक पदार्थ सरकवत राहिला.

'मेरियन' लुईझेनं पुन्हा हाक मारली. सगळे बडबडत होते.

'मेरियन !' लुईझे ओरडली.

सगळे गप्प झाले.

'मेरियन, तू कुठे आहेस ? 'तुला भीती वाटते का ?

मेरियनचं उत्तर आलं नाही.

तिचे वडील पायरीशी उभे होते.

MANOOS ( Marathi Weekly ) 75 Paise Regd. No. PNC-68

लुईझे पुन्हा ओरडली, ' मेरियन, तू कुठे आहेस ?'

उत्तर नाही. खोलीत पूर्ण स्तब्धता.

' मेरियन कुठे आहे ?' लुईझेनं विचारलं.

' ती इथे होती. ' एक मुलगा म्हणाला.

' कदाचित ती वर गेली असेल !'

' मेरियन !'

उत्तर नाहीच. फक्त गंभीर शांतता.

लुईझे किंचाळली. ' मेरियन, मेरियन !'

' दिवे लावा, दिवे !' मोठ्यांपैकी एकजण म्हणाला.

वस्तू फिरायच्या थांबल्या. मुलांच्या आणि पालकांच्या हातात चेटकीचे जे जे ' अवयव ' होते ते तसेच राहिले.

' नको,' लुईझे घुसमटून ओरडली. धडपडत उठून ती किंचाळत राहिली. ' नको. दिवे लावू नका, दिवे लावू नका ! देवा रे, माझ्या देवा ! कुणीही दिवे लावू नका, कृपा करा, मी नको म्हणतेय् ना, नको नको !' लुईझे आक्रोश करू लागली. त्याबरोबर सगळं तळघर गोठून गेलं.

कुणीच जागचं हललं नाही.

प्रत्येकजण अंधारात स्तब्ध बसून राहिला. वारे घोंघावत होते. हवेत सफरचंदाचा वास भरला होता. त्याच्या जोडीला हातातल्या वस्तूचा वास मिसळला. एक मुलगा म्हणाला, ' मी वर जाऊन बघतो !' आणि तो वरच्या मजल्यावर गेला. ' मेरियन, मेरियन !' अशा हाका मारत तो चार वेळा दोन्ही मजल्यांवर फिरला. शेवटी निराश होऊन पुन्हा तळघरात परतला. सगळं तळघर धडधडत्या हृदयानं वाट बघत होतं. ' ती कुठेच दिसत नाही !' अंधारातून आवाज आला.

नंतर...कुणा मूर्खानं दिवे लावले !

□

(मूळ लेखक : रे ब्रॅडबरी)

# चित्रपट

## जिद्द

**एक कसोटी—प्रेक्षकांच्या जिद्दीची, सहनशक्तीची**

' शिर्डी के साईबाबा ' आणि ' नवरा माझा ब्रह्मचारी ' या दोन चित्रपटांनंतर दिग्दर्शक दत्ता केशव, संगीतकार पांडुरंग दीक्षित, छायालेखक व निर्माते मधुसूदन मुकादम, या टीमचा गो. गं. पारखींच्या ' बन्सीभैया ' या कथेवर आधारित ' जिद्द ' हा नवीन चित्रपट प्रदर्शित झाला.

या चित्रपटाला जिद्द नाव न देता ' खूळ ' असे नाव दिले असते, तर अधिक शोभून दिसले असते. कारण चित्रपटातील प्रत्येकजण कोणत्या ना कोणत्या खूळाला कवटाळून बसलेला आहे. आपण आसरा दिलेल्या तमासगिरीचा अपमान केल्याने बायको, मुलगा व भरला संसार यांच्याकडे परत न येण्याचे बापूभैयाचे खूळ, आपल्या नवऱ्याच्या तबला वादनाने आपल्या नांदत्या संसाराचा इस्कोट झाला म्हणून पोराला तबल्याशिवाय मोठा करण्याचे कोंडाबाईचे खूळ. तबलावादनातच नाव कमावून मोठे मोठे होण्याचे बन्सीचे खूळ. अशा सगळ्या बालिश खुळखुळ्या खुळांनी संपूर्ण चित्रपट खिळखिळा झाला आहे. ज्या प्रकारे भावनेच्या भरात ही वा चित्रपटातील अन्य पात्रे वेगवेगळी ध्येये स्वीकारतात वा निरनिराळ्या गोष्टींचा त्याग करतात ते पेटलेले जिद्दबाज स्वभाव न वाटता क्षणैक भावना विवशतेमुळे निर्माण झालेला लहरीपणा वाटतो आणि म्हणूनच त्यातून निर्माण होणारी पुढची प्रसंगमालिका खोटी वाटायला लागते. शिवाय देवपार्टीविरुद्ध राक्षसपार्टी यांच्या संघर्षापासून ' साठा उत्तरांची कहाणी पाचा उत्तरी सुफळ संपूर्ण' अशा गोड शेवटापर्यंत सर्व गोष्टींचा रतीब—त्यात दुःख, ताटातूट असते, त्याग इत्यादींची धार जरा जास्त घातलेली—भरलेल्या आहेतच.

चित्रपटात श्रीराम लागू, जयश्री गडकर, उषा चव्हाण, निळू फुले इत्यादी बड्या मोहोरांबद्दल वा अन्य खुर्द्यांबद्दल वाया गेला म्हणून वाईट वाटले; पण संजय जोग नावाच्या नवीनच आलेल्या ढब्बू पैशाचे मात्र हसू आले. दहावीत शिकणाऱ्या 'हुशार' पोराच्या वर्गातील अन्य मुले पाहिल्यावर एक तर इतरांनी इयत्ता गाळल्या किंवा या ' हुशार ' पोराने प्रत्येक इयत्तेतील मुक्काम वाढवला एवढे दोनच निष्कर्ष काढता येतात. अभिनय कसा नसावा, याचे त्याने अत्यंत सुरेख दर्शन चित्रपटात सुरुवातीपासून शेवटपर्यंत घडविले.

चित्रपटातील ढोलकीची जुगलबंदी दोनतीन मॉडर्न ठसकेबाज लावण्या आणि त्या वेळची उषा चव्हाण यांची आकर्षक नृत्ये एवढाच संगीताचा उल्लेखनीय भाग.

बाकी मोलाने राबणाऱ्या कोंडाबाईच्या अंगावरील कोरीकरकरीत पातळे, तबल्याच्या आवाजाशी न जुळणाऱ्या हातांच्या हालचाली इत्यादी बारकावे तपासण्याइतकी चित्रपटाची लायकीही नाही.

संपूर्ण चित्रपट बघणे म्हणजे प्रेक्षकांच्या जिद्दीची आणि सहनशक्तीची कसोटीच आहे.

**—सदानंद बोरसे**